
डॉ. नितीन मोरे
तोच चंद्रमा...

# तोच चंद्रमा..

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# तोच चंद्रमा..

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# तोच चंद्रमा..

लेखक  :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३१ मार्च २०२०


©esahity Pratishthan®2020

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे यांची ईसाहित्यसंपदा:

1. चक्रमादित्याचा दरबार १(नाटक)
2. चक्रमादित्याचा दरबार २(नाटक)
3. केल्याने शीर्षासन,(विनोद)
4. नाच जमूरे नाच,(विनोद)
5. अहम ब्रह्मास्मि, (विनोद)
6. मच्छर टाईम्स, (विनोद)
7. संवादोनी प्रकटावे (विनोद)
8. या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )
9. प्रेमातुराणां (नाटक)
10. सांगतो ऐका (एकपात्री)
11. प्रिय पत्रास (पत्रे)
12. शिभ्रष्टाचार! (विनोद)
13. आधुनिक कहाण्या (विनोद)
14. अवलोकन..अनुभव..मनोव्यापार (नाटक)
15. राग दरबारी (एकांकिका )
16. वाळूतल्या रेघा (विनोद)
17. संधी साधू (नाटक )
18. न.बा.च्या (प्रेम) कविता (कविता)
19. व्यक्ती आणि कथा - ठेंग्यादादा.. पेद्रू.. अँड्र्यू इ.
20. प्रीतीची 'प्रेम'कथा (कादंबरी)
21. ऐसा ही होता है!
22. तोच चंद्रमा..









www.esahity.com

## डॉ. नितीन मोरे यांच्या पुस्तकांच्या लिंक्स

नाटके

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ragdarabari_nitinmore.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sangato_aika_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramadityacha_darbar__nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramaditya_2_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/prematuranam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ya_kolhatakaranchya_gharat_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sandhisaadhoo_nitin_more.pdf

विनोदी साहित्य

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/adhunik_kahanya_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/valutil_regha_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bhrashtachar_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/machchhar_times_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/nach_jamure_nach_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aham_brahmasmi_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kelyane_shirshasan_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/samvadoni_prakatave_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahh_nitin_more.pdf

इतर

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/letters_nitin_more.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/na_ba_kavita_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vyaktikatha_nitin_more.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/preetichi_premkatha_nitin_more.pdf


राग दरबारी
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



डॉ. नितीन मोरे
वाळूतील
रेघा


डॉ. नितीन मोरे
न.वा.च्या(प्रेम)कविता








डॉ. नितीन मोरे
संधी साधू


डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या


डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार


डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,

डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
प्रेमातुराणां

डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार

डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स

डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात

डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२

डॉ. नितीन मोरे
प्रकटावे

डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका

डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

# अर्पणपत्रिका

स्वप्न पहाणाऱ्या

प्रत्येक तरुणास हे अवॉर्ड आहे.

**डॉ. नितीन मोरे**



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत.

त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली.

सामान्यत: आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे बाविसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

# बाविसाव्या पुस्तकाच्या निमित्ताने ..

अमृताते पैजा जिंकणारी आपली माय मराठी.. तिची सरकार दरबारी उपेक्षा ही आता नवीन बाब राहिली नाही. पण भाषा जगते नि तगते ती सर्वसामान्यांच्या वापरामुळे. ई साहित्य हे काम 'नेटा'ने करत आहे आणि ही भाषेच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाची बाब आहे.

एकूणच पुस्तक व्यवहार हा नव्या लेखकाच्या दृष्टीने एक कठीण भाग असतो. लिहिणे कदाचित सोपे पण ते प्रसिद्ध करून वाचकाच्या हाती ते पोहोचवणे कठीण असा अनुभव सगळयाच होतकरूंना आलेला असणार. हे एखाद्या नोकरी शोधणाऱ्या तरूणासारखे आहे.. अनुभव नाही म्हणून नोकरी नाही नि ती नाही म्हणून अनुभव नाही! प्रथितयश प्रकाशन संस्था नवीन पुस्तकांकडे कुठल्याही कारणाने का होईना कानाडोळा करत असताना अशा लेखकांनी आपले लिखाण कसे प्रसिद्ध करावे? ई साहित्यने हा प्रश्न सोडवला आहे.

पुस्तक प्रकाशन हा महागडा उद्योग आहे. त्यात परत प्रकाशकांचा अपारदर्शक व्यवहार (अर्थातच काही सन्माननीय अपवाद ) .. कागद, छपाई, वितरण, विक्री आणि त्या सगळयांचे हिशेब या सगळयांना फाटा देत नवीन तंत्रज्ञानाचा वापर करत ई पुस्तके प्रकाशित करणे ही भाषा व्यवहाराच्या दृष्टीने एक महत्त्वाची बाब आहे. आणि त्याबद्दल ई साहित्य टीमचे अभिनंदन करायलाच हवे. त्यामुळे कित्येक नव्या लेखकांना वाचकांसमोर येण्यास मदत झाली आहे.

माझी शाळा म्हणजे गोरेगावची अ.भि.गोरेगावकर इंग्लिश स्कूल. शाळेने आम्हाला घडवले हे खरे.  दामोदर सामंत सर आम्हांला मराठी शिकवत. त्यांच्या मराठीच्या वर्गामुळेच भाषेचे सौंदर्य समजत गेले. भाषा महत्त्वाची खरीच. तिच्यामुळेच संवाद साधला जातो नि तिच्यामुळेच विसंवाद ही होऊ शकतो. दैनंदिन जीवनातही भाषा सर्व काही व्यापून असते. तीच

भाषा जेव्हा लिखाणात वापरली जाते तेव्हा तिच्या सौंदर्याची भुरळ साहित्य वाचनात पडत राहतेच. मेडिकलच्या पुढील शिक्षणात भाषा एक विषय म्हणून मागे पडला. शास्त्रीय शिक्षणात भाषेचे काम विशेष नसले तरी भाषेचा उपयोग होतोच सगळीकडे. अगदी पेशंट्सच्या हिस्टरी टेकिंगसाठीही. भाषा वेगवेगळया पद्धतीने बोलत पेशंट्सकडून माहिती काढणे हे कठीण काम. खरेतर सर्वात कठीण मेडिकल शिक्षणात काही असेल तर हे हिस्टरी टेकिंग. विविध शैक्षणिक पातळीवरील रूग्ण, त्यांची बोलण्याची नि आपले सिम्पट्म्स सांगण्याची पद्धत वेगळी. त्यातून हवी ती माहिती काढून घेणे हे खरे कौशल्याचे काम. येथे भाषेचे बारकावे उपयोगी पडतात. अर्थात साहित्यिक भाषेची गरज नसते त्यासाठी पण संवाद साधला जाणे महत्त्वाचे.

लिखाणाची आवड मला अगदी लहानपणापासूनची. शाळेत भित्तीपत्रके असायची त्यात काही ना काही लिहिलेले आठवते अजूनही. कॉलेजात मराठी वाङ्मय मंडळाच्या बोर्डावरहीमध्येमध्ये लिखाण चाले. खरेतर वाचनाची प्रचंड हौस होती शाळेत असताना. मे महिन्याच्या सुट्टीत दर दिवशी एक या प्रमाणे पुस्तके वाचल्याची आठवतात मला. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात तशी हजारो पुस्तके असल्याने ती उपलब्धही व्हायची सहज. त्या वाचनात कादंबऱ्या, कथा, चरित्रे, आत्मचरित्रे, ऐतिहासिक पुस्तके असे सारे काही असायचे. वाचून तसे काहीतरी लिहायचा प्रयत्न व्हायचा. आणि त्या शाळकरी वयात काहीतरी मोठेपणाचा आव आणत गंभीर काही लिहायचा प्रयत्न व्हायचा. मला वाटते नववीत असताना असेल.. गदिमा गेले नि शाळेत त्यांच्यावर निबंध लिहायला सांगितलेला बाईंनी. तो एकेकाने वाचायचा सगळयांसमोर. मला आठवतेय, भारी भारी नि कठीण शब्द निवडून लिहिलेला तो निबंध मी. अजून आठवते मला, तो वाचला मी आणि शेवटी माझ्याच लक्षात आले, भाषेचे सौंदर्य तिच्यातल्या कठीण शब्दांत नि वाक्यांत नाही, क्लिष्टपणात तर नाहीच नाही, तर साध्या, सोप्या आणि त्या त्या ठिकाणी बसू शकणाऱ्या चपखल शब्दांत आहे. पुढेही काहीही लिहित असे मी. एका कुठल्याशा क्षणी वीस तीस कवितांचा संग्रह लिहून काढलेला ही आठवतोय. 'मृत्युंजय'

वाचल्यावर त्या धर्तीवर चक्क कादंबरी लिहायला घेतलेली त्या वयात! दोन तीन पानानंतर तो उत्साह मावळला हे खरे.. हे सारे लिखाण पुढे रद्दीत जायचे तसे गेलेच. पण लिहिण्याची 'ऊर्मी' टिकून राहिली .. ऊर्मी म्हटले की कसे भारी वाटते म्हणून तो शब्द, नाहीतर खरेतर लिहिण्याची हौसच म्हणायला हवे!

आधी आधी लिहायचो त्याचे विषय नक्की आठवत नाहीत, पण ते नक्कीच काहीतरी गंभीर भाषेत असायचे. पुढे डॉक्टरकीच्या प्रॅक्टिसमध्ये पंधरा एक वर्षे लिहिणे वगैरे बंदच होते. मेडिकलच्या चरकात पिळून घेताना असे काही सुचणे अशक्यच हे ज्याने असे शिक्षण घेतले त्यास नक्कीच पटावे. पण लिहिण्याची सुप्त इच्छा कदाचित मनात निद्रिस्त असावी. साधारण आठेक वर्षे झाली असतील वसईतल्या प्रॅक्टिसला आणि त्या इच्छेला जाग आली अचानक.. एके दिवशी अचानक सकाळी एक कथा सुचली. रात्री बसून ती लिहून काढली. आणि कौतुकाने स्वतःच वाचून काढली. कालपर्यंत जगात नसलेली पात्रे निर्माण केल्याचा आनंद होता म्हणा किंवा स्वकौतुक वाटत होते म्हणा. आजही ती कथा माझ्याकडे तशीच आहे पडून. आता वाचताना ती अर्धकच्ची असल्याचे जाणवते .. जुन्या साडीचा ड्रेस शिवावा तसे या गोष्टीला नुकतेच एकांकिकेचे स्वरूप दिले आहे मी! ही गोष्ट विनोदी होती. आणि यापुढे विनोदीच लिहावे.. गंभीर लिहावे तर तेही विनोदाच्याच प्रकारात अशा पद्धतीने लिखाण सुरू झाले. ते २००५ चे वर्ष होते. हळूहळू लिहिलेले गोळा होत गेले. 'वाचकाच्या शोधात एक लेखक' या उपर प्रगती नव्हतीच. लिहिलेले पेपर सांभाळणे एक मोठे काम होऊन बसले. पुढे लॅपटॉपवर लिहिणे सुरू झाल्याने ते एक काम सोपे झाले. पण साचणाऱ्या लेखांचे करायचे तरी काय? काही गोष्टी लिहिल्या. दिवाळी अंकांना पाठवल्या. बहुतेकांनी त्या छापल्या नाहीतच. कुणी छापल्या त्यांनी तो अंक देखील कधी पाठवला नाही. त्यामुळे बिन माहितीतल्या अंकांना गोष्ट पाठवणेच बंद केले मी. झाले इतकेच की प्रकाशनाच्या प्रतिक्षेची रांग वाढत चालली. त्यातल्या त्यात लॅपटॉपमुळे कागदाची रद्दी जमत

नव्हती इतकेच समाधान! पुढे वसईच्याच दोन दिवाळी अंकांत कथा येऊ लागल्या. आणि एके दिवशी ई साहित्यचा शोध लागला.


लिखाण हा एक माझ्यासाठी विरंगुळा आहे, छंद आहे. एखादी गोष्ट लिहून हातावेगळी झाली की पुढे काही दिवस हुरहुर लागून राहते. नवीन काही सुचले तर ठीक नाहीतर उदासीनता यायला लागते. लक्षणे ही ठीक नाहीत हे खरे, पण गेल्या काही वर्षात तरी न सुचल्याचे दिवस आले नाहीत. आशा आहे, पुढेही न येवोत. लिहिण्याचा हा स्वांत सुखाय उपक्रम म्हणा की उपद्व्याप म्हणा ई साहित्य कृपेने सर्वांपर्यंत पोहोचतोय नि कुणी वाचक मिळेल का वाचक अशी याचना करत फिरावे लागत नाही यातच आनंद आहे!

आधीचेच लिहिलेले माझ्याकडे खूप काही होते. पहिले पुस्तक चक्रमादित्याचा दरबार प्रसिद्ध झाले. पाठोपाठ अजूनही पुस्तके आली. प्रसिद्ध होताहेत म्हटल्यावर लिहिण्याचा उत्साह अजून वाढला. त्यातून एकांकिका नि नाटके लिहून झाली. अगदी कादंबरीही झाली.

ई साहित्य असे लिखाण प्रसिद्ध करतेय, तेही सुंदर रीतीने आणि कलात्मक मुखपृष्ठासहित. आणि ते पुस्तक जगभरात कुठेही पोहोचते क्षणार्धात. यापेक्षा लिहिणाऱ्याला काय हवे असणार?

ई साहित्यने मराठी भाषेचा झेंडा साता समुद्रापार रोवलेला आहेच. तो झेंडा आणि त्याहूनही महत्त्वाचा मायमराठी भाषेचा झेंडा असाच डौलाने फडकत राहो हीच इच्छा.

डॉ. नितीन मोरे



# तोच चंद्रमा..

# *तोच चंद्रमा..*

*मी आणि मोनामी दोघे आमच्या जायंट टेलिस्कोपमागे होतो.*

*"मोनू, ती बघ पृथ्वी.. आणि आपले जुने घर.."*

*"बघू दे माला .. तिते राह्यचा तू बाबा..?"*

*"हो. आणि त्या रस्ताच्या बाजूला बिल्डिंग आहे ना ती माझी शाळा.."*

*"मंजे, तू शाळेत पण जायचा.. मंजे तुला शंबरपर्यंत आकडे पण येतात बाबा?"*

*"हो गं मोनुली.. सोनुली. दिसतेय ना शाळा.."*

*"परत बघू माला.. हे रे काय बाबा..?"*

*"काय झाले.. अगं ते घर माझे.."*

*"तू टेलिस्कोप हलवलायस बाबा.. हा चांदोबा आहे..*

*आणि तितले एक घर दिसते माला.."*

*"हो गं छकुली.. "*

*"मंजे तू तिते पण राह्यचा.."*

*"हो गं मोनुली.. चांदोबावरचे घर आहे ते.. दहा वर्षांपूर्वीचे.."*

*"पण मी नाही पाहिली ते? मी कदीच तिते नाही गेली?"*

*"नाही गं, मोनू, तू तेव्हा नव्हतीसच ना.. मग कशी जाणार?"*

*"तू असाच आहेस बाबा.. आईला घेऊन गेला पण मला नाही .. मी कट्टी आहे तुझ्याशी बाबा..पण मला घेऊन जाशील तिकडे.. पुथ्वीवर नि चंद्रावर .. आपल्या घरी? नाहीतर कट्टी मी.."*

*ती कट्टी घेत फुरंगटून बसली..*

*.. मी तिला काय सांगणार होतो?*

..........................................................................

१

## *चंद्रावर ..*

२५ डिसेंबर २१०१.

'मूनलाईट स्पेस सर्विसेसचे चांद्रयान एके ५१२१ चे कॅप्टन आणि क्रू आपले आभार मानत आहोत. लवकरच आपण गांधीनिवास चंद्रस्थानकावर उतरणार आहोत. आपल्या यानखुर्चीच्या पट्ट्या बांधून ठेवा. सॉफ्टलँडिंगच्या वेळी सर्वांनी खुर्चीवर बसून रहावे. कोणीही आपल्या सॅटेलाईट फोनवर पुढील सूचना मिळेपर्यंत बोलू नये. आशा आहे आपली यात्रा सुखद झाली असावी. पुढील चांद्रयात्रेसाठी आम्हाला संधी मिळावी अशी प्रार्थना आहे.'

मूनलाईट स्पेस सर्विसेस.. भारतातल्या अनेक चंद्र ते पृथ्वी यान सर्विसपैकी एक. म्हणजे गेली पंधरा वीस वर्षे रेग्युलर सेवा सुरू आहेत त्यांच्या. अनेक जण त्यानंतर आले. आता रहदारी वाढलीय तशी. काही पर्यटन म्हणून जातात तर काही कामानिमित्त. भारतातल्या रियल इस्टेट किंमती परवडत नाहीशा झाल्या नि काही कॉर्पोरेट्सनी आपली ऑफिसेस चंद्रावर शिफ्ट केली. जाणे येणे पकडले वर्षातून एकदा तरी स्वस्त पडते ते. त्यात आता इंटरनेटचे जाळे अवकाशात पण उपलब्ध असल्याने फार कुठे जायची गरज नाही. अगदी क्षणार्धात कुठेही संपर्क ..

ऑडिओ आणि व्हिडिओ देखील. इतका संपर्क तर पृथ्वीवरही नीट होत नाही. अवकाशात असल्याने अडथळे नाहीत. थोडा दिवसरात्रीचा गोंधळ सोडला तर चंद्रावरचे ऑफिस सगळ्यांना सोयीचे.

खूप वर्षांपूर्वी म्हणे असे चंद्रावर कुणी जात येत नसत.मध्ये एक जुना पेपर वाचला .. त्यात तर भारताचे चांद्रयान उतरता उतरता हरवले असले काही लिहिलेले त्यात. वर आम्ही हिंमत न हरता आमचे प्रयत्न सुरूच ठेवू असे कुणी शास्त्रज्ञ म्हणाला म्हणे! वाचावे ते नवलच. आता तर पृथ्वी नि चंद्रावर नियमित सेवा देणारी उड्डाण याने आहेत. मी आलो ते 'मूनलाईट ट्रॅव्हल्स' त्यात नंबर वन. बाकीपण आहेत काही. अगदी सरकारी 'स्पेस इंडिया' पण. मागे 'एअर इंडिया' नावाची सरकारी विमान कंपनी होती तशी. ती डुबली कधीच. आता स्पेस इंडिया शेवटच्या घटका मोजतेय म्हणे!

गमंत बघा ना.

दीडेकशे वर्षांपूर्वी म्हणे भारतातून अमेरिकेत पोहोचायला काही महिने लागायचे म्हणे ..बोटीत बसून. मग विमाने आली. तरी चोवीस तास लागायचे म्हणे अमेरीकेत जायला. आता सात आठ तासात अमेरिका.. वेग वाढला विमानांचा. झाले एवढेच की घर्षणामुळे विमानास होणारा अवरोध कमी केला म्हणे शास्त्रज्ञांनी. आजूबाजूस निर्वात पोकळी.. त्यातून वाट काढणारे विमान. त्यामुळे वेग वाढला म्हणे. हे फक्त ऐकून मी. शास्त्र नि माझा संबंध दूरदूरचा. मी थोडासा म्युझिशियन. गिटार वाजवणारा. आणि बाकी कॉमर्सचा विद्यार्थी मी. शास्त्रीय गोष्टी शिरत नाहीत डोक्यात लगेच. तर ते असू देत. सांगत त्या चांद्रयानाच्या वेगाबद्दल होतो. अगदी सुरूवातीला चांद्रयान म्हणे काही महिने घ्यायचे चंद्रावर पोहोचायला. पृथ्वीचे गुरूत्वाकर्षण भेदायलाच खूप वेळ लागायचा यानाला. मग अवकाशात झेप.. चाळीस लाख किलोमीटरचे अंतर. पुढे यातही प्रगती झाली. अवकाशात अवरोध नसल्याचा फायदा लक्षात आला शास्त्रज्ञांना. त्यामुळे सुपर ल्युमिनरी स्पीडमध्ये यान जास्तीत जास्त आठवड्यात चंद्रावर. हल्ली तर चार दिवस ही खूप काही यानांसाठी. मी आलो त्या यानाला मात्र सात दिवस लागले. तेवढया वेळेसाठी

सारे प्रवासी एका ठिकाणी बसून होते. प्रत्येकाला दिवसात तीन चार वेळा दहा मिनिटे चालायला मिळायची. मग त्यात देहधर्म उरकून घ्या.. चालून घ्या.. नाहीतर पायाच्या रक्तवाहिन्यांत रक्ताच्या गुठळ्या होतात म्हणे. म्हणून तसे सारे आळीपाळीने उठत नि सांगितलेला व्यायाम करत. मी ही केला. अवकाशात त्या यानात जेवणही मोजकेच मिळायचे. ते पोटातला काही भाग भरायला उपयोगी पडले तरी भूक मी म्हणायची. पण इलाज नव्हताच. आठवडाभर जेमतेम पुरेल इतक्याच खाद्याचे वजन पेलवले त्या यानाला. कारण ही इकॉनॉमी सहल. एका रॉयल सहलीत पोटभर जेवण, एका यानात सहा किंवा आठ यात्री.. पण भाडे चौपट! त्या भाड्याहून हे अर्धपोटी राहणे परवडले.

शेवटचे सॉफ्ट लँडिंग तर भारी होते. आमच्या यानातून एक भाग सुटा झाला.. ज्यात आम्ही सारे होतो.. हलकेच तो भाग गाडी चालावी तसा चार चाकांवर उतरला. आणि समोरच्या रनवे वर हळूहळू उतरत थांबला. फार पूर्वी म्हणे हाच भाग जमायचा नाही शास्त्रज्ञांना. पण आता हे रूटिन झाले असावे. कारण आम्ही उतरलो तर पोटातील पाणीही नाही हलले. पाणी म्हटले मी, कारण पोटात खरोखर फक्त पाणीच होते!

आम्ही सारे प्रवासी घडीचे उतरलो. ते 'इंडिया मून स्पेस स्टेशन' होते. आजूबाजूला कडक थंडी. यानाच्या सुट्या भागातून बाहेर पडल्यावर गुरूत्वाकर्षणाच्या अभावाने चालणे थोडे कठीण. पृथ्वीवर चंद्रावर चालणे शिकवण्याचे सिम्युलेशन क्लासेस सुरू होऊनही आता दहा वर्षे झालीत. तीन महिन्याचे कम्पलसरी ट्रेनिंग. काही त्यात चालूबाजी करून खोटे सर्टिफिकेट मिळवतात आपल्या देशाला शोभेल असे.. पण मी मात्र तो कोर्स सीरियसली केलेला. शिकलेलो ते आठवले नि तरंगत चालू लागलो. स्पेस स्टेशनपासून काही अंतरावर पार्किंगमध्ये आई बाबा आलेले.

चंद्रावर उतरल्याने अंग शहारले होते. 'चांदोबा चांदोबा भागलास का..' नि 'चंद्र होता साक्षीला' असली गाणी गुणगुणत निघालो. तरंगत! हिंदी सिनेमात अशा वेळी हीरो ला कुणी तरूणी भेटते.. मग चंद्र होता साक्षीला म्हणत त्यांची स्टोरी घडते.. वा घडवली जाते!

मला कुणी इथे भेटेल का?

वयाच्या पंचविशीत तसे काही वाटणे स्वाभाविकच होते! अर्थात तसे काही घडणे या चंद्रभूमीवर अशक्यच होते म्हणा!

## २

### *मामाच्या गावाला!*

आमचे सॉफ्ट लँडिंग झाले ते इंडिया मून स्टेशन होते.. गांधीनिवास नावाचे.. इंडिया मून म्हणायचे कारण असे पाच सहा देश अजून आहेत ज्यांची अशी अवकाश स्थानके आहेत. ती त्या त्या देशाच्या नावे ओळखली जातात. म्हणजे चीनचे 'चायना मून' तर युएसएचे 'मून अमेरिका' .. जपानी 'मून जापान' वगैरे. सुरक्षा व्यवस्था अगदी कडक आहे इथे. कुणी कुठल्याही देशात जाण्यासाठी स्पेस व्हिसा आहे. पण तो इकडे चंद्रावर आल्यावर. तिकडून डायरेक्ट इतर देशात जायला परवानगी नाही. अर्थात पृथ्वीप्रमाणे भरमसाट देश नाहीत इथे हे खरे. लोकवस्ती हल्ली वाढलीय पण पृथ्वीइतकी नाही. फक्त चंद्रावर कित्येक खनिजे इतकी मुबलक नि स्वस्तात नि जास्त कुठल्या देशांशी स्पर्धा न करता मिळाल्याने चंद्रावर आपल्या वसाहती स्थापन करण्याची नवनवीन देशांत पृथ्वीवर अहमहमिका चालते. तरीही इथल्या वातावरणात काही थोडेच देश तग धरून आहेत इकडे. त्यांनी इकडे आपल्या वसाहती वसवल्या आहेत. मग त्यात सरकारी नि खाजगी ऑफिसेस आली नि त्यामागोमाग लोकवस्ती आली. विविध देश आहेत इकडे आणि ते एकमेकांशी सहकार्य करत असले तरी लोक जिथून तिथून सारखेच. कारण हल्लीच मून अमेरिका आणि चायना मूनमध्ये चकमकीच्या झाल्याच्या बातम्या आलेल्यात म्हणे इथे! कुठेही जा लोक भांडणं काही सोडत नाहीत! आता बातम्या म्हटले मी म्हणजे इथे वृत्तपत्रे आली.. टीव्ही स्टेशन आले.. सारे आले इथे. शेवटी काय कर्ता करविता तोच माणूस .. पृथ्वीवरूनच तर आलेला. कुठल्याही ग्रहाला पृथ्वीसारखाच करेल नाही तर काय? आणि असेही चंद्र उपग्रहच आहे

पृथ्वीचा.. त्यामुळे तर अजूनच! तर इथे पृथ्वीवरचे सारे आले आहे. फक्त ते गुरूत्वाकर्षण सोडून. मला खात्री आहे, कमी गुरूत्वाकर्षणाचा अडथळा दूर करून व्यवस्थित चालण्यासाठी काहीतरी उपाय निघेलच काही वर्षांत.. मग तेव्हा लोक म्हणतील, विश्वास बसत नाही आपण असे तरंगत चालायचो तेव्हा!

गांधीनिवास स्टेशनवर आई नि बाबा हजर होते घ्यायला. दोघांच्याही अंगात तोच स्पेस सूट. बाबा बिचारे यान स्वतः चालवत आलेले.. हो यानच! गाडी चारचाकी झटकन चालत नाही इथे. तो यानाचा भाग त्याच्या अंगभूत वेगाने लँड झाला म्हणून चालतो, तसे काही बाकी गाड्यांना नाही शक्य होत. तेथे यानच उडवावे लागते. बाबांनी स्वतः शिकून घेतलेले ते.

त्यांना इथे येऊन चार वर्षे झाली. सरकारी नोकरी. बदलीची. इथे आले तेव्हा खास चंद्र रहिवास भत्ता मिळायला लागला त्यांना. तीन एक वर्षे राहून मागच्या वर्षी आलेले घरी. म्हणजे पृथ्वीवर. आज वर्षानंतर त्यांना भेटत होतो त्यांना मी.. तशी नोकरी चांगली होती, फक्त चंद्रावर अजून पर्यंत तितकीशी वस्ती नसल्यामुळे थोडे एकटेपण जाणवायचे त्यांना. म्हणून मगमध्ये आई इकडेच येऊन सेटल झालेली. रोज रात्री मला सॅटेलाईट फोन यायचा त्यांचा. हल्ली हल्ली तर व्हिडिओ कॉल पण. आणि आज मी प्रत्यक्ष येऊन पोहोचलो होतो इथे. गाडी चालत नाही त्यावर उपाय म्हणून हे लोकल यान चालवतात सारे इथे. लवकरच चांद्रभारत सरकार तिथे सरकारी याने सुरू करणार होते, पब्लिक ट्रान्सपोर्ट म्हणून. पण तोवर फक्त ही खाजगी याने चालताहेत.

मला पाहताच आई म्हणाली, "किती वाळलास रे!" वाळलो वगैरे काही नव्हतो मी, पण हे हृदय कसे आईचे, आणि काय! असेही माझा स्पेस सूट म्हणजे अंगापेक्षा बोंगा मोठा! त्यात मी वाळलेला कसा दिसलो असेन? एक शक्य आहे.. चंद्रावर वजन एक षष्ठ्यांश कमी भरते म्हणे..

त्यामुळे असेल कदाचित! बाबा म्हणाले, "अरे पोहोचलास नीट. फक्त तो प्रवासाचा आठवडा म्हणजे कंटाळा येतो. बाहेर काहीच दिसत नाही. तरी हल्ली बरोबर काही प्रवासी तरी असतात, मी आलो प्रथम तेव्हा एकटाच.. तेही एक महिना लागलेला तेव्हा. वेड लागायची पाळी येते. पण इथे आल्यावर बरे वाटते एकदम!"

मला आमच्या अंबरनाथच्या मोठ्या घराची आठवण झाली. जाता येता ट्रेनमध्ये पिट्ट्या पडायचा आमचा.. पण एकदा पोहोचलो की सगळी हिरवाई, सुंदर रस्ते नि अगदी कृत्रिम तळी त्यातल्या खऱ्या खुऱ्या बदकांसकट! आलो की प्रवास विसरायला व्हायचा तसेच हे सारे! चंद्रावर आलो की शीण गायब! अंधार होता, त्यामुळे नीट दिसत नव्हते आजूबाजूला. पण इथे येण्याचा आनंदच मोठा होता. यानात बसून निघालो आम्ही. सवयीप्रमाणे असावे, बाबा म्हणाले, "अंबर, पट्टा बांध रे.. इट्स मँडेटरी!" मी बाहेर ट्रॅफिक पोलिस आहे का पाहात होतो, बाबांना कळले असावे, म्हणाले, "पोलिस नाही रे.. पण अरे पट्टा बांधल्याशिवाय हे यान सुरूच नाही होत! आपल्याकडेही हे करता येईल पण मग नियम मोडल्याबद्दल दंड कसा करणार नि त्याबदल्यात मांडवली कशी करणार?"

पट्टा बांधण्याबद्दल बाबांनी तोंडाचा पट्टा सोडलेला अगदी! बहुधा सगळीकडे उलट असते, आई बोल बोल बोलते नि वडील मितभाषी असतात.. आमच्याकडे अगदी उलट! बाबांच्यापेक्षा आईचा वर्ड आऊटपुट पंचवीस टक्के असावा!

बाबा बोलत होते.. यानाला ऑटो पायलट मोडवर टाकून. यानात पत्ता टाकला की ते आपोआप तिथे पोहोचते. फक्त सुरू करणे नि बंद करणे इतकेच काम पायलटला. त्यामुळे बाबा बोलत होते नि मी ऐकत होतो.

"इथे सारे काही आहे बघ. आता तर आपले लोकही आलेत. टीव्ही आहे, सॅटेलाईट रेडिओ नि फोन आहेत. फक्त रहाण्याची पद्धत वेगळी. बाहेर असताना हा सूट फक्त स्पेशल बाथरूममध्येच उतरवायचा. नाहीतर घराच्या आत."

मला ऐकून माहिती असलेलेच बाबा ऐकवत होते. त्यांची सरकारी वसाहत थोडी दूर असावी. कारण बऱ्यापैकी वेळ लागला यानाला.

"इतके दूर आहे घर बाबा?"

"अरे, स्पेस स्टेशन वस्तीपासून दूरच असते. किमान दहा किलोमीटर. पोहोचूच आपण. सरकारी वसाहत आहे. ती अजूनच लांब आहे. तशा प्रायव्हेट वसाहती होताहेत इथे. आपल्याकडचे लोढा नि गुंदेचा यांच्या प्रायव्हेट वसाहतींची कामे चाललीयेत इथे.."

बाबा बोलत होते..

चंद्राबद्दल काय काय ऐकलेले. लहानपणी चंदामामा म्हणायचो त्या मामाच्या गावाला प्रत्यक्षात मी पोहोचलेलो.. म्हणजे आईच्या माहेरीस की! म्हणून असेल गेल्यावर्षी आई इथे यायला तयार झाली की काय सहज?

आणि आज मी इथे? माझाच माझ्यावर विश्वास बसत नव्हता.

३

## रॉबिन

यान थांबले. थांबले म्हणजे गती शून्यावर आली. बाजूची शटर उघडली. आम्ही उतरलो. समोर एक तंबूरूपी घर होते. आतून एक जण बाहेर आला.

"अरे, तू? बरा झालास?" बाबा म्हणाले.

"हो.. मी स्वतःला ऑटो रिपेअर करून घेतले सर. आता ठणठणीत आहे. तुम्हाला त्यामुळे स्वतः यान चालवावे लागले.. सॉरी.."

"अरे, डोन्ट वरी, ते काय ऑटो मोडवर चालते. तू बरा आहेस ना?"

"यस्सर.. मी ऑटो मोडमध्ये ॲनालाईझ केले स्वतःला. थोडासा प्रोग्रामिंगमध्ये गोंधळ होता.. गाॅट मायसेल्फ करेक्टेड."

"अरे रॉबिन, हा माझा मुलगा, अंबर.."

रॉबिनने हस्तांदोलनासाठी हात पुढे केला. त्याचा हात बऱ्यापैकी थंडगार होता.

"अंबर हा रॉबिन, आपला ह्युमनॉईड, ही इज अ स्पेशल रोबो. अरे सरकारी नोकरीत वरच्या ग्रेडवर असलेल्यांना मिळतात असे स्पेशल ह्युमनॉईडस्. बट ही इज अवर ओन.. नॉट अ गव्हर्नमेंट एम्प्लॉई. पण इथे आम्ही त्यांना रोबोस् नाही म्हणत. दे आर ह्युमन लाइक.. होय की नाही रॉबिन?"

"यस्सर.."

"ही इज प्रोग्राम्ड फॉर होल डे.. अख्ख्या दिवसात रॉबिन करतो सारे काम."

"सांगाल ते?"

"नाही .. त्याला सांगावेच लागत नाही. ही इज सुपर इंटलिजंट!"

"वा! चांगलाच आहे!"

"आणि गप्पा देखील मारतो तो. आपला मूड बघून. यू वोन्ट बिलिव्ह, आपला मूड ओळखतो तो नुसते पाहून.. त्याच्या अल्गॉरिदममध्ये आहे सारे फीड केलेले. खरे सांगू तर याची सोबत होती म्हणून पहिली तीन वर्षे निघाली नीट. आता तुझी आई आलीय तर ठीक. पण इकडे शांतता जीवघेणी वाटते कधी कधी. अशा वेळी साथीला असा रॉबिनसारखा कुणी असणे म्हणजे वरदान आहे रे."

"अंबर, काय घेणार? चहा, कॉफी?"

रॉबिनने मला विचारले. "साहेब आणि मॅडम, तुमच्या साठीही आणतोय.."

"अरे, रॉबिन, अंबरबद्दल काल तुझ्या प्रोग्राममध्ये टाकायला विसरलो मी?"

"नाही सर, तुम्ही टाकलंयत.. मला माहितीय अंबरला कॉफी हवीय विथ एक्स्ट्रा शुगर.. पण त्याला ह्युमन अनुभव द्यावा म्हणून विचारले. अगदीच मेकॅनिकल फील नको यायला त्याला म्हणून. खरेतर कॉफी तयारच आहे. फक्त साखर टाकायची बाकी आहे. आणतो."

रॉबिन ऐटीत आत गेला. हा ह्युमनॉईड कसला चांगलाच ह्युमन होता!

"अरे रॉबिन सारा स्वयंपाक करतो, घर आवरतो, मी आले ना तर किती धक्का बसला त्याचे काम पाहून. अगदी परफेक्ट काम त्याचे."

"वा! म्हणजे तिथल्यासारखे नोकर नकोत शोधायला."

"अरे, ते खरे काम नाही रॉबिनचे. इकडे सूर्य धुळीची वादळे झाली की बाहेर फक्त रॉबिनच जातो.. म्हणजे सगळीकडे फक्त रोबोज बाहेर जाऊ शकतात. आपल्याला घरातच बसायला लागते."

सूर्यधूळीचे वादळ.. हे मी वाचले होते. चंद्रावर असे सूर्य किरण नि रेडिएशन म्हणजे माणसाच्या रोगांना नि कॅन्सरला निमंत्रण. त्यापासून बचाव करायचा तर रोबोहून योग्य अजून कोण?

"आणि अजून.. मेटेरॉईडस्.. कुठून येऊन आदळतील नेम नाही. म्हणून ही तंबूसारखी घरे बनवलीत इकडे. या रॉबिन सारख्या रोबोंशिवाय कठीण आहे इकडे."

मला वाचलेले आठवले, म्हणजे इकडे येण्याआधी मला झेपेल इतका अभ्यास केलेला मी. त्यात काही समजले, बरेचसे डोक्यावरून गेले. पण समजले त्यात हे एक होते, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मनुष्यवत यंत्र मानव.. अगदी दिसा-बोलायला माणसासारखे असणारे रोबोट्स.. ही विज्ञानाची गेल्या काही वर्षांतली झेप आहे. त्यातून जणू अगदी उत्क्रांत होत

आजचा हा यंत्र मानव जन्माला घातलाय माणसाने.. माणसासाठी.

रॉबिन ट्रेमध्ये चहा कॉफी घेऊन आला. आणि चंदा ब्रँडची मारी बिस्किटे. मला मारी बिस्किटेच आवडतात हे बाबांनी फीड केले असणार त्याच्यात. पूर्वी सिनेमात रोबोस् एकसुरी बोलताना दाखवायचे. हा रॉबिन मराठी नि इंग्रजी अस्खलित बोलतोय. त्यात आवाजाचे व्यवस्थित चढउतार आहेत. हवे तिथे थांबतो तो, स्वल्पविराम घेतल्यासारखा. त्याचे प्रोग्रामिंग तसे केले असले तरीमध्येच त्याने मला चहा की कॉफी म्हणत आपल्या मानवी बुद्धिमत्तेचीही चुणूक दाखवलेली. मानवी बुद्धीचाच हा यांत्रिक चमत्कार होता. त्याच्याकडे कौतुकाने पाहात म्हणालो मी, "रॉबिन, तुझी न माझी जोडी जमेल.. मस्त! हाय फ्रेंड.."

रॉबिन म्हणाला, "हाय! अंबर. आपण मित्र म्हणून राहू शकतो. अर्थात मी माझी कामे तर करत राहिनच. पण मला ही कुणी मित्र असेल तर बरे वाटेल. मित्राकडेच आपण सारे शेअर करू शकतो. आणि आज तू आलायस तर किती बरे वाटतेय म्हणून सांगू. आय अॅम रियली हॅपी."

"अरे रॉबिन, तुला कुणी मित्र नाही हे माझ्या कधीच लक्षात आले नव्हते राजा. आता अंबर आलाय, चांगली कंपनी मिळेल तुला."

"होय सर. खरेय तुमचे. म्हणून म्हणालो ना, मी आज खूप खूश आहे. अर्थात तो बाजूच्या मिश्रांकडचा केविन माझा दोस्त आहे. पण एक मानवी दोस्त असण्याची मजाच वेगळी."

"एक विचारू बाबा.. या रॉबिनचे वय काय?"

"रॉबिन आणि वय?"

"अर्थात ..मी सांगतो.. रॉबिन की नाही तरूण आहे..  माझ्यासारखा.."

"का?"

"सिंपल .. मैत्री समवयाच्या लोकांत होते .. सो इफ वुई आर फ्रेंडस्.."

"आमची वये सारखी असली पाहिजेत.. वा! अंबर, आवडले लॉजिक मला!"

रॉबिन टाळी देत म्हणाला.

"थ्यांक्स रॉबिन. तू खरेच तरूण आहेस.. यंग अँड डायनॅमिक.. आणि डॅशिंग!"

"आणि हँडसम ही.. हे विसरू नकोस अंबर."

"हुं खरंय! आई तू काहीच बोलत नाही आहेस ती?"

"तुझे बाबा बोलू देतील तर ना! पण एका वर्षानंतर तुला पाहून बरे वाटतेय रे. आज माझ्या हातून बनवून खाऊ घालते तुला."

"यस मॅडम. त्याच्या आवडीच्या गोष्टींसाठी लागणारे सामान तयार ठेवलेय मी. मला वाटलेच होते तुम्ही स्वतः बनवून खाऊ घालाल त्याला ते. मी आहेच मदतीला."

"थँक्स रॉबिन. चल, अंबर मी पटपट थालिपीठ बनवते, भुकेला असशील."

"हो ना, या इकॉनॉमी क्लासमध्ये आठवडाभर पाणी पिऊन पोट भरावे लागले."

"लकी आहेस तू, मी पहिल्यांदा आलो तर यानातले पाणीही चौथ्या दिवशीच संपलेले.." बाबा म्हणाले.

"चल, लवकर तयार हो. मी बनवते खायला तुझ्यासाठी." आई ऑर्डर सोडल्याच्या सुरात म्हणाली.

"हो मॅडम, मी स्पेशल काऊ मिल्क लोणी आणून ठेवलेय.. थालिपिठाबरोबर खायला. यू लाईक दॅट नो माय फ्रेंड.. रॉबिन मला विचारत होता.."

"यस डिअर रॉबिन.. आय लाईक इट.."

४

## *कृत्रिम बागेत*

दोन आठवड्यात मी बऱ्यापैकी रूळलो होतो चंद्रावरच्या आमच्या घरात. जेटलॅग मधून बाहेर यायला तेवढा वेळ तरी लागतोच. तरीही मेलॅटोनिनच्या गोळ्या घेत होतो. बॉडी क्लॉक सेट झालेले आता. इकडे सलग चौदा तासाचा दिवस नि चौदाची रात्र. मी पोहोचलो तो चांद्रदिवस होता. दिवस म्हटले की प्रचंड उष्णता.. इकडे सारी घड्याळे पृथ्वीवरच्या वेळानुसार ॲडजस्ट केलेली. त्यामुळे बारा तास झाले.. सहा वाजले.. की संध्याकाळ झाली असे समजायचे. मग अंधार पडो न पडो! घराच्या आत खास अंधाऱ्या खोल्यांची रचना केली जाते इथे. चौदा दिवसांच्या रात्रीत तर बारा तास अती तीव्र दिवे लावून दिवस केला जातो! अशी चांदरात कवी कल्पनेत किती रोमँटिक वाटते.. पण शेवटी कविकल्पनाच ती!

अजून घराबाहेर पडलो नव्हतो मी. त्या तंबूत सुरक्षित होतो. आई दिवसभर काय करत असेल गेले एक वर्ष? विचारले तर म्हणाली, "कंटाळा नाही येत मला. इकडे मून टीव्हीवर एकूणच प्रोग्राम चांगले असतात. नि रॉबिनमुळे घरच्या कामाचे टेन्शन नाही. मग माझा जुना छंद आठवला. लिहित बसते. . एक पुस्तक लिहायला घेतलेय..तोच चंद्रमा नभात.. त्यातच वेळ जातो खूप. पृथ्वीवर प्रकाशित होणारे इकडून लिहिलेले पहिले पुस्तक असेल ते! म्हणजे ललित साहित्य हां. बाकी शास्त्रीय पुस्तके आहेत बरीच!"

मला गंमत वाटली. आईला लिहायची हौस आहे हे माहिती होते मला. पण हा छंद पुरा करायला तिला इकडे यावे लागावे? आणि म्हणजे तिकडे पृथ्वीवर असे रॉबिनसारखे रोबो आले तर कित्येकांना आपापली स्वप्ने पुरी करायला वेळ मिळेल?

मी मात्र आता बसून बसून कंटाळलो. कुठे जावे? अजून आठवड्यानंतर मला जॉबसाठी इंटरव्ह्यूला जायचे होते. तोवर असाच बसून नि झोपून काढत होतो वेळ. रॉबिन होता, तो खाऊपिऊ घालायचा. सॅटेलाईट फोनवरून पृथ्वीवरच्या मित्रांना फोन केले काही. पण थोडाच वेळ. सॅटेलाईट फोनमध्ये अजून इनकमिंगला पैसे लागतात. त्यामुळे कोणाला किती आणि कशाला पाडा खर्चात?

संध्याकाळी बसला होतो असाच तर पाठून रॉबिन आला.

"येस ब्रो.. अंबर. हाऊ आर यू? झोप झालेली दिसतेय."

"हो रे. हा जेट लॅग.. तुला बरंय.. नो जेट लॅग.. नथिंग!"

"खरंय, मग आज काय प्लॅन?"

"काही नाही."

"थांब.."

रॉबिनने आपल्याजवळच्या मशीनीत काहीतरी पाहिले, म्हणाला, "चल. ऑल क्लियर. आज इकडे हवामान साफ. वेबसाईटने सांगितलेय. माणसांना बाहेर पडायला हरकत नाही."

रॉबिन आनंदाने सांगत होता नि मी विचार करत होतो.. आपल्याकडे हा मनुष्य जन्म मोठ्या कष्टाने मिळतो म्हणतात ना तसा हा ह्युमनॉईड जन्मही पुण्यवानांना मिळत असावा. मी म्हणालोही त्याला, "बेटा, हा जन्म भाग्यवंतांनाच मिळतो बरे!"

त्यावर रॉबिनने काय म्हणावे? म्हणाला, "भाग्यवंत म्हणजे काय?"

"अरे पुण्यवान!"

"म्हणजे?"

"म्हणजे या किंवा मागील जन्मी चांगले काम केले असेल असा .."

"म्हणजे?  मागचा जन्म?"

तो आणि मी सुद्धा गोंधळणे साहजिकच होते. बोलूनचालून रॉबिन ह्युमनॉईड होता. माणूस नव्हता! आणि मी त्याला पृथ्वीवरचे आणि तेही पापपुण्याचे .. ते ही कुणीही कधी न सिद्ध केलेले नियम लावू पाहात होतो! आणि ते ही कोणाला .. तर एका विज्ञानाने निर्माण केलेल्या रोबोला! अर्थात हे रॉबिन किती मानवी वाटत होता याचेच प्रतीक होते!

आम्ही निघालो बाहेर. आज चंद्रावरची पहिली सफर. काही दशकांपूर्वी आर्मस्ट्रॉंगने चंद्रावर टाकलेल्या पहिल्या पावलानंतर किती प्रगती केलीय मानवी विज्ञानाने. आणि तरीही माणसाला अनाकलनीय अजूनही कितीतरी गोष्टी बाकी आहेत! बाबा आधी, म्हणजे पृथ्वीवर असताना आध्यात्मिक गप्पा मारत, त्यात ही हेच असे, सारे काही अथांग आहे. अनंत आहे! त्यात हे अनादि, अनंत, अथांग, दुस्तर, भवसागर असले अनघड, अवजड नि बोजड शब्द असत.. आणि त्या गप्पांतील मला अगम्य असेच सारे होते. त्यामुळे मी त्यातील काहीच अंगास चिटकवून घेतले नव्हते. इकडे आल्यावर मात्र बाबांनी ते अध्यात्म बाजूला ठेऊन दिले असावे. आणि आता विज्ञानात पण हेच.. माणसाला जगाबद्दल फारच थोडे ठाऊक आहे अजूनही! म्हणजे हिमनगाचे टोक म्हणता यावे इतपत! तेही विज्ञानाने इतकी प्रगती केली असूनही.

तर आम्ही निघालो. समोरच्याच रस्त्याच्या कडेला एक मोठी बाग होती.

"चल बसूया इथे." रॉबिन म्हणाला.

समोर झाडे, हिरवीगार. मधूनच कारंजी. आणि चक्क बदके नि कोंबड्या देखील!

आम्ही जाऊन बसलो. असली बाग बनवणे, तेही चंद्रावर?

माझ्या चेहऱ्यावरचे प्रश्नचिन्ह वाचत रॉबिन म्हणाला,

"छान आहे ना सारे?"

"हुं. मस्तच. कोण काळजी घेते यांची? नाही बाग म्हटली म्हणजे .."

"फसलास ना? अरे ऑल आर्टिफिशियल. हे उडणारे पक्षी, बदक नि कोंबड्या पण. नथिंग इज रियल. ही झाडे पण नकली आहेत.. पक्षी आणि प्राणी पण."

"ही कारंजी?"

"पाणी खरेय बाबा!"

जीवन म्हणून संबोधतो ते पाणीच माणसाला प्रयोगशाळेत बनवता आले तर? इतक्या सगळया शोधांहून भारी शोध असेल तो! नक्कीच. म्हणजे मग कुठल्याही ग्रहावरून जाऊन बसायला मोकळा माणूस. एक पाणी बनवा, नि दुसरा ऑक्सिजन! ऑक्सिजन वरून आठवले, चंद्रावर तसे वातावरण विरळच. त्यात माणसाला ऑक्सिजन कसा मिळणार? पण इकडे आल्यावर पाहिले मी, जिकडेतिकडे मोठमोठया ऑक्सिजनच्या टाक्या. तिथून रोज आवश्यक तितका प्राणवायू सोडला जातो. घरोघरी त्याचे कनेक्शन्स. आपल्याकडे स्वयंपाकाचा गॅस येतो तसा प्राणवायू येतो घरी. आणि बाहेर तो असाच सोडून दिला जातो वातावरणात श्वासोच्छवासासाठी. पूर्वी कुठेतरी वाचलेले आठवले मला, झाडे ऑक्सिजन निर्माण करतात .. इकडे झाडे नाहीत खरी पण मानवी मेंदूची पाळेमुळे मात्र पार खोलवर गेलीत हे खरे!

रॉबिन बसलेला. मी त्याच्याकडे पाहात बसलेलो. या रॉबिनला पण मन असेल का? कितीही प्रगत यंत्रमानव झाला तरी त्याला त्याच्या बनवित्या धन्याहून प्रगती करता येईल? बुद्धिमत्ता

कृत्रिम म्हटली तर, कृत्रिम बुद्धी जन्मजात बुद्धीवर मात करेल कधी? आणि या ह्युमनॉईडसचे काय? यांना कधी माणसासारखे जगता येईल? म्हणजे कितीही प्रगत झाले तरी?

बहुधा आठवडाभराचा प्रवास नि तेवढाच जेट लॅग, यामुळे मी सैरभैर विचार करत होतो की काय कोण जाणे. त्यामुळे मी बोलत जास्त नव्हतो. मनात विचारांचे काहूर. बहुधा चेहऱ्यावर दिसत असावे.

मी गप्प गप्प पाहून रॉबिन म्हणाला, "तू कसला विचार करतोयस? तसा तू जास्त टेन्शनमध्ये नाहीस म्हणजे तुझ्या मेंदूची मी रिडिंग घेऊन सांगतोय असे. पण विचार करतोयस कसला तरी."

"हुं. तुझाच."

"माझा? म्हणजे?"

"रॉबिन, तू असा तरूण आणि हुशार. आणि हँडसम."

"मग? म्हणजे अशा वेळी थ्यांक्स फॉर कॉम्प्लिमेंटस् म्हणावे असे आहे प्रोग्राममध्ये पण तुला मी माझ्या ह्युमन ब्रेन इंटरफेज वरून विचारतोय मी. माझा कसला विचार?"

"ह्युमन ब्रेन इंटरफेज?"

"यस.. सारे काही प्रोग्राम केलेय आत माझ्या.. त्यात काही उत्स्फूर्तपणाही प्रोग्राम केला गेलाय. तो वापरून मानवी मेंदू सारखे काही वेळेस वागू शकतो आम्ही.. तर कसला विचार करतोयस? तो ही माझा?"

"हाच! तारूण्य सुलभ!"

"एक सेकंद!"

त्याने हातातले मोबाईल सारखे मशीन हाताळले काही क्षण .. बहुधा तारूण्यसुलभ म्हणजे नक्की काय हे शोधले असावे.. नि मग एकाएकी म्हणाला,

"हां. कळले तू म्हणतोस ते. त्याचे काय आहे.. अरे मी ह्युमन नाही. ह्युमनॉईडच आहे. आय हॅव नो सच फॅकल्टीज इन माय ब्रेन! आयॅम नॉट प्रोग्राम्ड दॅट वे.."

विचार करा.. ह्युमनॉईड आपापसात प्रेमात पडू लागले तर. ही ह्युमनॉईड आणि शी ह्युमनॉईडच्या जमतील जोड्या! असा विचार करत मी म्हणालो,

"पण इफ वुई प्रोग्राम इट?"

"बापरे! हॅवॉक! म्हणजे नक्की काय होईल माहित नाही मला. पण तुला पाहून सांगू एक?"

"बोल."

"तुझ्या मेंदूत इकडे कुणी भेटेल तुला.. त्या टीव्हीवर दाखवतात तशी प्रेमकथेची नायिका .. याचा विचार होतोय! राईट ऑर नॉट?"

रॉबिन माझा मित्र होता. नि तो म्हणाला ते ही खोटे नव्हते. माझा पृथ्वीवरचा भूतकाळ मागे सोडून

आलेलो मी. कॉलेजच्या तिसऱ्या वर्षातली वर्षा काळे.. तिची नि माझी एकतर्फी प्रेमकथा संपवून आलेलो इकडे मी. आणि हा त्या जखमेवरच्या खपल्या काढतोय की काय? पण नाही, हे ह्युमनॉईड या बाबतीत माणसाहून जास्त ह्यूमन असावेत. उगाच कुणाला डिवचणे वा टोचून बोलणे त्यांच्या स्वभावात नसावे. रॉबिन माझ्या मेंदूच्या मॅपिंग मधूनच बोलत असणार! आणि ते जास्त चुकू शकत नाही हे खरे! तेव्हा हे लपवून ठेवण्यात शहाणपण नव्हते हे खरे.

५

## *जुनी कहाणी*

त्या चंद्रावरच्या कृत्रिम बागेत हा असा कृत्रिम मानव समोर नि मी माझ्या अकृत्रिम भावना त्याला सांगतोय. म्हणजे त्या माझ्या जुन्या लव्हस्टोरीनी सुरूवात करायला हवी!

"तुला लव्हस्टोरी म्हणजे काय हे तर ठाऊक असेल ना रॉबिन?"

"ऑफकोर्स! आधी नव्हते माहिती पण आता टीव्हीवरच्या सिरीयल्स बघून शिकतोय मी!"

"म्हणजे? तू टीव्ही बघतोस?"

"अर्थात. घरी असलो की. त्यात सीरियलचा मुख्य विषयच असतो तो. प्रेमकथा. ती मुख्य कथा तरी असते नाहीतर कुठल्याही कथेचा साईड भाग तरी. एवढे कळलेय मला. अर्थात हे प्रेम म्हणजे काय हे नाही मला ठाऊक!"

"मी सांगायचा प्रयत्न करू का? मला वाटतेय तुला काही प्रमाणात ठाऊक आहे ते.."

"मला? मला ठाऊक आहे हे मलाच ठाऊक नाही?"

"होय.. ऐक हां.."

"बोल.. ब्रो."

"मी आलो तेव्हा तुला वाटले होते ना की आई माझ्यासाठी स्वतः जेवण बनवेल.. ते का वाटले तुला? अर्थातच तुला आईचे प्रेम कळले असणार .. एवढेच नाही.. आई वडील आणि त्यांचा  मुलगा.. ही नाती सुद्धा."

"नाती?"

रॉबिन हातातील मशीनमध्ये शोधत क्षणार्धात म्हणाला, "ओह.. किथ अँड कीन्स.. एवढे शिकलो आहे मी! तरीही .."

"मला एक सांग, तू बाबांकडे चार वर्षे झालीत आहेस.. त्यांना काही झाले तर तुला काय वाटेल .."

"काय अंबर.. काहीही बोलतोस तू. शुभ बोल तर म्हणे!"

"हेच! हेच ते प्रेम. अफेक्शन. लव्ह.."

"पण सिरीयलमध्ये .."

"तो तरूण आणि तरूणींतला प्रेमकथेचा वेगळा भाग झाला. ते ही प्रेमच. खरे सांगू आज वाटतेय.. हे जगच प्रेमावर चालते सारे. तुला ते गाणे माहितीय.. साँसोंपे नहीं, कदमोंपे नहीं.. मोहब्बत पे चलती है दुनिया.."

रॉबिन आपल्या हातातल्या मशीन कडे पाहात म्हणाला, "ओह! मोहब्बत.. म्हणजे प्रेम!"

"छान आहे रे हे.." मी त्या मशीनकडे पाहात म्हणालो, "सगळया भाषांतले शब्द आहेत यात?"

"नाही .. सगळयाच नाही.. आम्ही ज्यांच्याकडे कामाला आहोत ती आणि त्याच्याशी संलग्न भाषा.. म्हणजे मराठी संस्कृतातून आलीय.. तिच्यासारखी हिंदी, गुजराती .. हिंदी आली तर थोडे उर्दू .."

"छान. तर सांगत होतो ते प्रेमाबद्दल .. तरूण वयातील प्रेम हे अ‍ॅट्रॅक्शन.. इनफॅच्युएशन.. नि मग प्रेम .."

"ती थियरी सोड अंबर ब्रो.. गो अहेड विथ युवर ओन लव्हस्टोरी! मला आवडेल ऐकायला .."

"हुं.. राईट यू आर. लोकांना आवडतात प्रेमकथा. पण रोबोंनाही आवडू लागल्या म्हणजे .."

"खरेय तुझे.. पण वुई आर नेक्स्ट जेन रोबोस.. ह्युमनॉईड्स .. ते सोड. टेल युवर स्टोरी!"

"विश आय हॅड समथिंग टू टेल डिअर! रॉबिन, मी म्हणतो म्हणून लव्हस्टोरी! आणि ब्रेकअप!"

"म्हणजे?"

"माझा ब्रेकअप झाला.. विदाऊट एनी लव्हस्टोरी!"

"म्हणजे?"

"म्हणजे ऐक.. आमची एक ज्युन होती.."

"ज्युन?"

"ज्युनिअर रे.. शाॅर्टफॉर्ममध्ये ज्युन. तर मी सेकंड इयरला होतो. ती फर्स्ट. वर्षा काळे. छान होती. गोड म्हणावी अशी .. गायची छान. आवडायची मला."

"मग?"

"काही नाही. मी लायब्ररीत बसून पाहात राहायचो. तिच्यामागे एकदा नकळत तिच्या घरापर्यंतही जाऊन आलो. तिची सगळी माहिती होती माझ्याकडे. नाव, गाव, पत्ता, फोन नंबर .. वगैरे इन्क्लुडिंग वाढदिवस .."

"वाढदिवस म्हणजे बर्थडे.. राईट?"

"यस्स.. दोन अडीच वर्षे स्वप्ने पाहिली तिची."

"मग?"

"मग काही नाही! दोन चार वेळा बोललो असेन तिच्याशी. पण तेवढयाने काय होतेय?"

"मग अजून बोलायचं ना?"

"छे रे! माझा स्वभाव आड येतो. मी तसा मुलखाचा लाजाळू."

"लाजाळू .. हां शाय!"

"यस्स."

"पण म्हणून काय झाले. तू सोडून दिलेस तिला?"

"सोडून? पकडले कधी तर सोडेन? पुढे काहीच घडले नाही. कॉलेज संपले नि स्टोरी संपली. वन सायडेड. म्हटले ना.. मी म्हणतो म्हणून तिला प्रेमकथा नि ब्रेकअप म्हणायचे."

"पण टेल मी ब्रो.. हे शाय.. लाजाळूपण.. शब्द करेक्ट आहे ना.. कशाला. मनात आहे ते सांगून टाकायचे!"

"नि ती नाही म्हणाली तर?"

"ओह ब्रदर.. व्हॉट लॉजिक.. असेही ती कुठे हो म्हणालीय तुला?"

"हुं, तेही खरंच."

"तर हे शायबिय असणे.. कान्ट अन्डरस्टँड.."

"अरे, तुला नाही कळणार.. तो प्रोग्राम टाकला तर कदाचित कळेल तुला."

"ते ही खरेच ब्रो. पण एक झाले आता.. यू हॅव अ क्लीन स्लेट राईट?"

"हुं.."

"अरे, रोजचा दिवस नवा. काल गेला भूतकाळात. असेही पृथ्वी सोडून आलायस.. आता इथे नवीन कहाणी .."

"आम्ही लहान होतो ना तेव्हा खेळताना म्हणायचो, नवा भिडू नवे राज्य .. तसे नवी जागा नवी स्टोरी!"

"अंबर ब्रदर, जस्ट डू इट. आणि विसरू नकोस.. युवर फ्रेंड रॉबिन इज देअर विथ यू!"

"ओह! थ्यांक्स! चल. उशीर होईल. आई वाट पाहेल घरी."

"चल."

आम्ही निघालो. बोलता बोलता त्याला मी लहानपणीच्या आठवणी सांगू लागलो. आई आणि बाबा .. माझी मोठी बहीण.. आता लग्न होऊन सासरी नांदणारी.. सगळयाबद्दल. लहानपणीच्या भांडणांबद्दल.. तर रॉबिन म्हणाला,

"ओह! आय मिस दिस.. ह्युमनॉईड्स विल नेव्हर हॅव चाईल्डहूड.. विश कुड हॅव.."

"खरेय रॉबिन ब्रो."

रस्त्यात शेजारच्या घरातील रोबो भेटली. क्युरी. शेजारील वर्मांच्याकडे असते ती.

"हाय! क्युरी.. कहां चली?"

"इधरही यार. थोडा काम है.. वेदर ऑल क्लियर है पर शर्माके घरवाले थोडा आलसी हैं.. नॉट दॅट आय माईंड गोईंग आऊट.. पर आदमियोंको थोडा तो एक्सरसाईझ चाहिए ना? गुड फॉर देअर हेल्थ."

"हुं..सही बात है क्युरी .. चल. चलता हूं.."

"अरे रॉब, हू इज धिस बॉय? कभी देखा नहीं?"

"अरे क्युरी..  नया ही है यहां.. ये हमारे सर का बेटा.. अंबर.. अबही आया है.. अर्थसे."

"हाय! वॉव! हाऊ डू यू फाईंड इट हिअर?"

क्यूरीने 'हाय' म्हणत हस्तांदोलन केले. रॉबिन नि क्युरी दोघांच्या हाताचा स्पर्श एकसारखाच होता! थंडगार!

"थोडी आदत डाल रहा हूं.. वहांसे अलग है ना सब.." मी म्हणालो.

"चलो मादाम क्युरी .. हम निकलते हैं.."

रॉबिन म्हणाला नि आम्ही निघालो. उगाच रॉबिनची ताणावी म्हणून म्हणालो, "क्युरी इज युवर गर्लफ्रेंड?"

"हा! हा! इतना हमारा नसीब कहां?"

"वॉव! रोबो लोग भी नसीब की बातें करने लगे आजकल?"

"हा! हा! नसीब! पण तुझ्या कहाण्या ऐकून वाटतेय.. विश वुई आय हॅड वन इन अवर प्रोग्राम!"

"काय? नसीब?"

"काय काय विचारतोयस.. गर्लफ्रेंड यार!"

"वा! रॉबिन इज बिकमिंग रोमँटिक.. आज टीव्हीवरफफ न्यूज येणार बघ.. ब्रेकिंग न्यूज.. ह्युमनॉईड फॉलिंग इन लव्ह! आज चांदपर घटी सत्य कहानी.. रॉबिन नामके एक ह्युमनॉईड ने किया क्युरी नामक दुसरे शी ह्युमनॉईडको प्रपोज..देखते रहिए हमारा स्पेशल रिपोर्ट.. सिर्फ चांद अब तक पर.."

"गुड इमॅजिनेशन यार.. "

"नॉट इमॅजिनेशन.. इट्स कॉल्ड फँटसी.."

"व्हॉट एव्हर डिअर.. फँटास्टिक फँटसी.. आता अंबर ब्रदर घरी चला.. युवर मदर इज वेटिंग!"

६

## *पुन्हा रॉबिन*

घरी आलो तर आई वाट पाहात होती. उगाच. आई लोकांची ही सवयच असावी. पोर बाहेर पडले.. करा काळजी. लहानपणापासूनच पाहिलेय मी. आईच्या गळयातला ताईत मी. मला हवे ते आई देत असेच. लाडावले होते तिने मला कदाचित पण मीच बिघडणाऱ्यांतला नव्हतो. म्हणून मी बिघडलो नसावा! आई आम्हाला सोडून इथे वर्षभर आधी कशी आली असेल? मला आश्चर्य वाटायचे. पण बहुधा बाबांची इकडे एकटेपणाची निकड कळली असावी तिला. त्यामुळे चक्क चंद्रावर चालण्याची कसरतही शिकायला तयार झाली असणार ती.

आम्ही आलो तर म्हणाली, "खूप वेळ झाला रे.."

"हुं. बागेत बसलो होतो. गप्पा मारत. ती कृत्रिम बाग आहे ना तिकडे."

"छान आहे ती बाग. नंतर त्याला ती दुसरी बाग पण दाखव. दूर आहे ती. पण छान आहे."

"होय मॅडम, तिथे यान घेऊन जाईन एकदा."

"चांगलीच गट्टी जमलेली दिसतेय तुमची.. रॉबिन, काय म्हणत होता हा अंबर.."

आता रॉबिनला सत्यवचनाचा झटका येइतो की काय? खरा माणूस असता तर खरा चिमटा काढला असता.. पण या ह्युमनॉईडला काय काढणार चिमटा.. मी बोललेले सारे टेप झाले असेल त्याच्या मेमरीत, ते रिवाईंड ही करेल तो. पण हा हुशार निघाला ..

"काही नाही मॅडम. नवीन आहे तो. जरा बागेत बसून बाहेरचे जग बघत होतो.. इकडतिकडच्या गप्पा."

रॉबिनने तो लव्हस्टोरीचा मजकूर गाळला म्हणजे चांगलाच हुशार आहे हा! मी नि:श्वास टाकलेला त्याला कळला असावा. माझ्याकडे बघून त्याने चक्क डोळा मारला! हे ही आहे की काय त्याच्यात प्रोग्राम्ड?

एकूण हा लव्हेबल होता रॉबिन! अंगभूत हुशारी आहे त्याच्यात.. प्रोग्राम्ड!

बाबा आज ऑफिसातच रात्रभर राहणार होते. तसा संदेश आला त्यांचा. चायना मून नि मून अमेरिका मधले भांडण म्हणे! त्यामुळे इकडे रेड अॅलर्ट. असला अॅलर्ट कधी कधी चार पाच दिवसही असतो म्हणे. म्हणजे तेवढे दिवस ऑफिसातच बसून राहायचे. सरकारी ऑफिस म्हटले की हे सारे आलेच. तरीही प्रायव्हेट मधल्या जॉबपेक्षा इथे सुविधा जास्त. उदाहरणच द्यायचे तर अर्थातच हा रॉबिन! हा सरकारी अधिकाऱ्यांनाच मिळतो सहज.

मी विचार करायला लागलो. पुढच्या आठवड्यात इकडे लोढा आणि गुंदेचा बिल्डरकडे इंटरव्हयू माझा. प्रायव्हेट जॉबच. डायरेक्ट सरकारी नोकरीत रिक्रूटमेंट नाही होत इकडून. म्हणजे कुणी पृथ्वीवरून नेमणूक करून आला तर सरकारी नोकरीत! बोलून चालून सरकारीच ती नोकरी. तिच्यात घुसणे कठीणच असणार! आता मला ती प्रायव्हेट नोकरी मिळेल ना? अकाउंट्सचे काम. मी कॉमर्स फर्स्ट क्लासवाला. आणि असून असून असे किती जण चंद्रावर पोहोचले असणार नोकरीसाठी? तरीही गाफील राहून नाही चालणार. उद्यापासून थोडातरी अभ्यास केला पाहिजे. तशा नोट्स मी माझ्या कॉम्पमध्ये कंप्रेस्ड करून आणल्यात सगळ्या. फक्त आता मूड आला की

झाले. अभ्यासाबाबतचा हा उद्या माझा कधी उगवेल कुणास ठाऊक! तरीही विचार करत पडून राहिलो. इकडे तंबूत एक बरे असते. उगाच त्या स्पेससूटचे जंजाळ वागवावे लागत नाही अंगावर. नाहीतर बाहेर गेलेलो तर त्या स्पेससूटचे धूड अंगावर बाळगत कंटाळलेलो. ह्या रॉबिनचे बरे.. बिनधास्त फिरत असतो कुठेही.

विचार करून गंमत वाटली मला. आज रॉबिनला माझा हेवा वाटत होता.. माझ्या लहानपणाविषयी. आणि आता मला त्याचा वाटतोय! इंग्रजीत 'ग्रास इज ग्रीनर ऑन द अदर साईड' म्हणतात त्याची आठवण झाली! आणि एखाद्या ह्युमनने ह्युमनॉईडचा हेवा करावा हे म्हणजे जरा अति झाले नाही? काही असो.. असे झाले खरे! आणि त्याला कारण ही चंद्रावरची परिस्थिती होती! आणि गंमत म्हणजे मी आलो नसतो इथे तर रॉबिन भेटलाच नसता हेवा वाटायला! म्हणजे हेवा वाटणे ही गोष्ट स्थल, काल नि व्यक्ती सापेक्ष असते तर! विचार करून अशी सत्ये हाती लागतात तर! यांनाच विचार मौक्तिके म्हणतात की काय?

रात्री कॉम्प उघडून बसलो तर पाठोपाठ रॉबिन. म्हणाला, "ब्रो.. शो मी द अर्थ फोटोज्.."

"म्हणजे? तुझ्या त्या मशिनीत सारे काही दिसते ना?"

"नाही रे, ते जनरल असतात, तुझ्या घरचे.. कॉलेजचे.. मित्रांचे.. आणि अर्थात मैत्रिणींचे दाखव की.."

"वा! मैत्रिणी? चांगलाच बिघडलास तू रॉबिन .. कुठे प्रोग्राम चेंज तर नाही ना झाला ब्रेन मधला तुझ्या?"

"मी आणि ब्रेन?"

"आणि काय तर.. आईने विचारले तर बरे सारे काही वगळून सांगितलेस.. ब्रेन नाहीतर काय आहे?"

"हुं.. ब्रेन नाही ब्रो.. इट वॉज फेस रीडिंग! मॅडम बोलत होत्या ना तेव्हा मी तुझ्याकडे पाहात होतो.. आय कुड रीड दॅट.. तुला वाटत होते आईला हे सारे नाही सांगू.. आय डोन्ट हॅव ओन माईंड.. बट कॅन रीड माईंड्स! आहे की नाही गंमत!"

"आहे! एक क्षण वाटले की तू सारे साग्रसंगीत सांगतोस की काय!"

रॉबिन साग्रंसगीतावर अडकला असावा.

"म्युझिक? इथे म्युझिकचा काय संबंध? संगीत ..?"

"अरे रॉबिन, साग्रसंगीत.. नॉट ओन्ली संगीत .. साग्रंसगीत म्हणजे इन फुल डिटेल्स!"

"ओह.. ओके. नाही तुझा चेहरा वाचून मी नाही सांगितले काही.."

"इट मीन्स.. मी नसताना तुला काही विचारले असते तर.."

"आय डोन्ट नो.. तुला सांगितले मी.. आय डोन्ट हॅव ओन माईंड यार!"

हे म्हणजे टेन्शन. माझ्या फेस रिडिंग वर ठरणार हा काय डिटेल्स सांगणार ते! तरी त्याला फोटो दाखवत बसलो. आपल्याकडचे दिवाळी नि होळीचे सण.. त्याचे फोटो.. वाढदिवसाच्या औक्षणाचे नि रक्षाबंधनाचे फोटो.. कॉलेज डे नि कॉलेज कट्ट्यावरचे फोटो.. काय काय नि कसे काय समजावून सांगणार होतो मी त्याला? तरी जमेल तितपत सांगितले मी. तो ही आपली प्रोग्राम्ड मुंडी हलवत राहिला! आणि कदाचित मानवजातीचा त्याच्या नसलेल्या मनात हेवा करत राहिला असावा!

काही असो, अभ्यास मागे राहिला नि तो उद्यावर ढकलून आम्ही इकड तिकडच्या गप्पा मारत बसलो. विचार केला तर वाटले, रॉबिन इकडे नसता तर? कुणाशी एवढा बोलू शकलो असतो? पृथ्वी बाहेर आयुष्य घालवायचे तर बोलायला कुणी हवे! आणखी एक आठवले मला, काही ग्रहांवर तर वातावरणच नाही म्हणे.. म्हणजे जिवंत राहण्याचा प्रश्न तर आहेच.. पण त्याहून कठीण.. जिवंत राहिलो जरी तरी आवाजाला एक ठिकाणाहून दुसरीकडे जायला माध्यम लागते म्हणे.. हवा हवीच! तीच नसेल तर बोललेले ऐकू जाणार कसे कुणाला? थोडक्यात हा चंद्र महत्वाचा.. त्याच्यावरचे जे आहे ते वातावरण महत्वाचे.. रॉबिन महत्त्वाचा .. त्याच्याशी बोलणे महत्त्वाचे .. पण आता रॉबिनच सगळयात महत्त्वाचा.. ज्याच्याशी संवाद साधता येईल असा!

७

## *पार्टी!*

दोनएक दिवस गेले. बाबांचा रेड अ‍ॅलर्ट संपला एकदाचा. तिकडे ऑफिसात बसून कंटाळले म्हणावे, तर आले घरी तेव्हा एकदम खुशीत होते.

"काय अंबू.. अंबुजा सिमेंट .. हाऊ आर यू?"

बाबांची ही जुनी सवय होती.. अंबर नावाचा जमेल तितक्या पद्धतीने अपभ्रंश करायचे खुशीत आले की. कधी अंबुजा, कधी आंबोळी तर कधी आंबिल.. अंबाबाई .. अंबालिका.. कधी समानार्थी शब्दांनी मारायचे हाक.. ख.. आकाश.. नभ.. गगन.. स्काय वगैरे! असे झाले की समजावे, त्यांचा मूड चांगला आहे!

"मी काय.. मजेत आहे. इंटरव्ह्यूची तयारी करतोय."

"गुड. आज संध्याकाळी तयार रहा.. रॉबिन .."

"यस्सर.."

"अरे आज वेलकम पार्टी आहे ह्या अंबीहळदीची. बी रेडी!"

"यस्सर .."

पृथ्वीवरून नवीन कोणी आले की अशी पार्टी होते म्हणे. ग्रँड वेलकम ऑन द मून! मून लँडिंग पार्टी म्हणतात तिला. मून लँडिंग नंतर आता तीन एक आठवडे उलटून गेलेले. रॉबिनला माझ्या मनातले लक्षात आले असावे ..

"अरे ब्रो.. यू नीड दॅट मच टाईम टू ॲक्लमटाईझ! त्यानंतरच होते ही पार्टी. सगळे सरकारी मून इंडियातले येतील तिथे!"

"ओ के! आज संध्याकाळी."

"तू पण तयार रहा.."

बाबांनी आईला सांगितले. आई आपल्या लिहिण्यातून डोके वर काढत म्हणाली, "हो.. खूप दिवसांत बाहेर नाही पडले घराच्या.. जाऊयात. ते घारपुरे आहेत की गेले परत?"

"घारपुरे? अगं ते कधीच परत गेले पृथ्वीवर. इकडचे सगळ्यांना मानवते थोडीच? तू अशी ॲडजस्ट झालीस म्हणून ठीक पण सगळेच नाही करून घेत."

"हुं. त्यात काय एवढे. तिकडे काय नि इकडे काय.. उलट इकडे लिहायला वेळ मिळतोय मला. दहा भाग झालेत लिहून."

"वा! लेखिका बाई. मराठी साहित्याला हे माझे योगदान म्हणावे लागेल.."

"वा! लिहिते आई.. आणि क्रेडिट तुमचे?"

"अर्थात अंबू.. मी चंद्रावर आलो नसतो तर तिने लिहिले असते का सारे?"

"वा! व्हॉट ए लॉजिक! पण आईचे पुस्तक झाले की मी पण वाचेन. आयॅम इगरली वेटिंग. मीन व्हाईल आई काही अडले तर विचार.. आय ॲम देअर!"

मी गंमतीत म्हणालो. मला पण उत्सुकता होती काय लिहित असेल ती याची. पण पूर्ण झाल्यावाचून ती वाचायला देतच नाही. त्यात ती एक रफ.. मग मॉडिफाइड.. मग रेक्टिफाइड.. मग फायनल ड्राफ्ट बनवते. लिहायला इतका वेळ लागावा आजच्या या सुपर फास्ट युगात?

दुपारी मला एकटाच पाहून रॉबिन बसला समोर..

"अंबर ब्रदर.. पार्टी .. मजाय तुझी"

"मजा.. माझी?"

"अर्थात. म्हणजे एक संधी आहे.."

"कशाची?"

"तीच.. न्यू बिगिनिंग! अरे इकडे कमीत कमी दहा मुली आहेत तुझ्या वयाच्या.. चान्स आहे. आणि तुझ्यासारखे एलिजिबल बॅचलर्स कुठेत इकडे?"

मी काही बोललो नाही पण रॉबिन म्हणाला त्यात तथ्य होतेच. पण उगाच मला काही फरक पडत नाही हे दाखवायला म्हणालो,

"ओ रॉबिन डिअर, तुझी ती क्युरी पण येईल ना? म्हणून खूश दिसतोयस!"

मला वाटले, प्रोग्राम्ड असता तर लाजला असता रॉबिन!

"हुं.. जनाब अपना देखो पहले.. नोकरी पुढच्या आठवड्यात मिळेल.. छोकरी मिळते का पहा आजपासून.."

रॉबिन एखादा मित्र बोलावा तसा बोलत होता माझ्याशी.

"हे बघ.. अजून एक.. त्या दिवशी तुला टेन्शन आले ना.. की तू नसताना मी मॅडमना सारे सांगेन.. तर मी ऑटो प्रोग्राम चेंज करून मॉडिफाय केलाय.."

"म्हणजे?"

"माझ्या ह्युमन ब्रेन इंटरफेजवर टाकून ठेवलेय हे.."

"काय?"

"हेच.. कुठल्याही मुलीबद्दल तू काही बोलशील किंवा आपले जे बोलणे होईल ते फक्त रेकॉर्ड होईल.. रिवांईड नाही होणार!"

"म्हणजे?"

"तू ट्यूबलाईट आहेस काय?"

"ट्यूबलाईट? रॉबिन तू हा शब्द कुठे शिकलास? तुझ्या मशिनीत ट्यूबलाईटचा असा अर्थ नसणारच.."

"ब्रो, डोन्ट फरगेट.. त्यादिवशी तूच शिकवलास हा शब्द मला! डोन्ट बी लाइक विसराळू विनू.. नाऊ डोन्ट आस्क मी.."

"आय नो.. मीच तुला हा शब्दही शिकवला.. ओके.."

"तर.. नाऊ यू कॅन टेल मी एव्हरीथिंग.. मी ते सीक्रेट ठेवेन!"

"वॉव! रॉबिन यू आर अ डार्लिंग!"

"सो.. तयार हो. मस्त जॅकेट घाल. नि जीन्स. यू शुड लुक डॅशिंग.."

"डॅशिंग आणि स्पेससुटात? अरे संध्याकाळी स्पेससूटच घालायचाय.. जास्त तयारीची गरजच नाही ना?"

"अरे नो नो.. तिकडे पार्टी हॉल आहे.. इट्स लाईक होम. स्पेससूट काढून ठेवायचा तिकडे. बघशीलच पोरी कशा नटूनथटून येतील त्या!"

"आणि तुझी क्युरी पण?"

"हा! हा! क्युरी येईल, मार्था येईल, आणि केविन नि कोपर्निकस पण येईल!"

"हे कोण?"

"अर्थात माझे काँटेपररीस्.. माय फेलो ह्युमनॉईड्स!"

"वा! ते ही तुझ्या सारखेच आहेत?"

"तुला सांगू .. माणसांच्या दुनियेत असतील कुणी उच्च नि खालचा.. आमच्या इथे ऑल आर इक्कल! उगाच भेदाभेद नाही आमच्यात!"

बोलता बोलता रॉबिनने मानवजातीला असा चिमटा काढावा ना? रॉबिनला बरे ठाऊक हे सारे.. आणि त्यात चुकीचे ते काय होते? माणूस वागतोच असा.. बहुतेकदा!

संध्याकाळी पार्टीत चांगलीच गर्दी होती. म्हणजे आपल्या पृथ्वीच्या मानाने काहीच नाही पण इकडे आल्यावर सारे कसे मोकळे बघायची सवय झालेली त्या मानाने गर्दी म्हणावी.

हॉल म्हणजे एक मोठाला तंबू होता. बाहेर स्पेससूट काढायला भली मोठी जागा. आणि आत तंबू सारख्या जागेत पार्टीचा हॉल. सुंदर सजावट.मध्ये कारंजी, झुंबरं आणि विविध रंगांचे दिवे. आत थंडी असेल तर हीटर नि उष्ण हवा असेल तर एअर कुलिंगची सोय. अशी गेट टुगेदरे क्वचित होत असावीत. कारण झाडून सारे आले असावेत पार्टीला असे गर्दी पाहून वाटत होते. तेवढेच सगळयांना बाहेर पडायला मिळत असावे.. तेही चांगले चुंगले कपडे घालून. नाहीतर स्पेस सुटाखाली कोणी काय घातले असावे.. त्याने काय फरक पडणार होता? त्यामुळे ठेवणीतले कपडे घालून लोक येत होते. बहुतेक एकेकटे. काही आपल्या बायकोला घेऊन. नि अगदीच थोडे, ज्यांच्या बरोबर त्यांची मुले असतील इथे.

"अंबर ब्रदर, इथे यंग हँडसम आणि एलिजिबल बॅचलर तूच एकटा. मला विचार .. मोजून दहा मुली आहेत. दोन महिन्यापूर्वी एक मुलगी आलीय.. पण ती लग्न करून शिफ्ट झालीय. बाकीच्या आहेत इथे.. बघशीलच तू.."

रॉबिन बोलत असतानाच पाठून हाक आली,

"अंबर राजपूत? तू इकडे?"

आवाज ओळखीचा होता नि अनपेक्षित होता. मागे वळून पाहण्याआधी छाती धडधडली माझी. कारण तो थेट वर्षाचा वाटला मला आवाज..

तसा वाटायला कारण होते.. कारण तो तिचाच आवाज होता.. चक्क वर्षा इथे?

"तू इथे? मी आश्चर्याने किंचाळलोच."

"दुनिया गोल आहे नाही?"

"हुं.. आहे.. असेल.. बट रॉंग उदाहरण.. आपण दुनियेच्या बाहेर आहोत.."

"खरेय. तर तो तू आहेस.. ज्याच्यासाठी आहे ही पार्टी! तुला पाहून किती आनंद झालाय सांगू.."

तीच वर्षा.. तशीच सुंदर.. माझ्यापुढे मलाच सांगतेय .. किती आनंद झालाय म्हणून! कॉलेजात असताना ही इतके बोलले नसू आम्ही. आणि तेव्हा बोलली असती तर कशाला उपद्व्याप केला असता इकडे येण्याचा?

खरे सांगतो, पुढच्या काही क्षणात मी जे काही केले त्याला मनात मांडे खाणेच म्हणता येईल. माझी नि तिची जोडी जमेल आता.. तशी स्पर्धाच नाही इकडे.. आणि बहुधा हेच विधीलिखित असावे.. नशिबात असलेल्या गोष्टी मिळतातच.. कुठल्याही पद्धतीने का होईना! कुठल्या कुठल्या पोथ्या पुराणात नि कुठल्याशा स्वामी नि बाबांनी सांगितलेले ते.. 'जे होणार ते

होणारच' अशा काही अर्थाचे वचन आठवून गेले मला. आता माझे मन त्या कारंज्यासारखे थुईथुई नाचायला लागणार तितक्यात वर्षा म्हणाली,

"हल्लीच शिफ्ट झालेय इकडे. लग्नानंतर!"

बोलता बोलता ती मंगळसूत्राशी चाळा करत होती!

माझ्या मनातले मांडे मी पटकन् खाऊन संपवले. अशा वेळी बोलावे तर काय बोलावे? मी दूर कुठे तरी एक माणूस उभा होता त्याला हात केला.. आणि वर्षाला 'एक्स्यूज मी प्लीज' म्हणून निघून गेलो. असे काही होईल असे स्वप्नातही पाहिले नसते मी. आजवरचा ब्रेकअपच्या बँडेज करकरून बांधलेल्या पट्ट्या उघड्या होणार .. जखम भळाभळा वाहणार की काय परत? मी निघालेला पाहून रॉबिन मागोमाग आला,

"व्हॉट्स मॅटर ब्रो?"

मी रडवेला होता होता सावरलो.

"नंतर सांगतो तुला .."

"एक मिनिट यार.. ही अँटीरूम आहे.. कमॉन. इथे कुणी येणार नाही .. तू खूपच अपसेट दिसतोयस.."

आम्ही त्या रूममध्ये शिरलो. मी रॉबिनला काय घडले ते सांगितले तसा तो हसत सुटला ..

"व्हॉट यार.. तू क्लोज करून आलेला तो चाप्टर .. व्हाय आर यू ओपनिंग इट अगेन..आता डबल हार्टब्रेक? दॅट्स नॉट डन .. यू नीड टू स्टार्ट न्यू चॅप्टर यार.."

"पण रॉबिन .."

"यू आर नॉन सेन्स.. मूव्ह ऑन यार. असा रडतोंड्या गेलास तर असलेल्या दहा पोरी पण बघणार नाहीत तुझ्याकडे.."

रॉबिन म्हणाला त्यात तथ्य होते. असेही मी वर्षा प्रकरण विसरून गेलेलो. खरेतर त्यात प्रकरण म्हणावे असे काही नव्हतेच. तरीही ती दोन मिनिटे .. मनात मांडे खाण्याची.. चांगलीच महाग पडली मला. त्या दोन मिनिटांत मी उगाच विद्ध झाल्यासारखा विव्हळू लागलो. खरेतर माझे उद्दिष्ट होते आता येणाऱ्या साऱ्या जणी मिळून पाहाणे. आणि निर्णय घेणे. त्यात हातून जी गेलीय तिच्यामागे रडण्यात काय अर्थ होता? वन शुडन्ट क्राय ओव्हर उतू गेलेले दूध. मी एकाएकी उठून म्हणालो, "रॉबिन ब्रदर.. यू आर राईट! तू म्हणतोस तेच खरे आणि तेच बरे.. चल जाऊ बाहेर!"

पार्टीत आता अजून लोक आलेले. ऑफिशियली घोषणा होईल म्हणे.. वेलकम टू न्यू कमर मि.अंबर राजपूत.. मग कुणी गाणे गाईल.. कुणी नृत्य सादर करेल.. काही अजून कार्यक्रम.. मग जेवण!

सारे यथासांग झाले. माझ्या नावाची घोषणा होताच मी स्टेजवर गेलो.. वर्षाने मला खालून चिअर अप केले! आणि बाकी मुली माझ्याकडे पाहात होत्या.. हे मी चोरून पाहून घेतले.. वर्षाने चक्क गाणेही गायले .. 'तुम जो मिल गये हो.. तो ये लगता है.. ये जहां मिल गया!' हेच ती तेव्हा माझ्याकडे पाहून म्हणाली असती तर? जेवण्याच्या वेळात बाकी तीन चार मुली भेटल्या. बऱ्यात तशा. सायली, ज्योती आणि विद्या. तिन्ही मराठी. चौथी होती एल्ली .. गोव्याची. चांगलीय पण कोंकणी कळतेय कुठे मला? अर्थात चौघींकडे पाहूनही कुछ कुछ होता है नाही झाले मला.. त्यातल्या त्यात सायली आवडली मला, ती वर्षाची मैत्रीण म्हणून. अर्थात इथे येऊन झालेली. तिच्याशी ओळख करून देताना वर्षा म्हणाली,"मीट धिस स्डुडियस बॉय फ्रॉम माय कॉलेज.. ह्याचे अभ्यास सोडून कशात लक्ष असेल तर शपथ! ही वॉज मोस्ट वाँटेड अमंग अस गर्ल्स.. पण या भोळ्या शंकराचे कुठे लक्ष असेल तर ना!"

बाप रे! ह्यालाच इंग्रजीत 'इन्सल्ट टू इंज्युरी' म्हणत असावेत का? म्हणजे कदाचित वर्षा देखील? की आता हे उगीच हरभऱ्याच्या झाडावर चढवणे? काश! पण काही असले तरी आता त्याचा उपयोग नव्हताच. माझ्या नव्या फिलॉसॉफर गुरूचे, म्हणजे रॉबिनचे ऐकून भूतकाळाचे भूत गाडलेलेच बरे!

पार्टी चांगली झाली. बाबा तिकडे सीनियर. त्यामुळे त्यांना आणि आईला खास मान होता. मी नवा म्हणून लोकांचे माझ्याकडे लक्ष होते. आणि.. रॉबिनही माझ्यावर नजर ठेऊन होता!

बाकी काहीही होवो, पार्टीचे माझ्यासाठी फलित इतकेच.. काही पोरी विचार करण्याजोग्या आहेत. पण नथिंग ॲट फर्स्ट साईट! रात्री बराच वेळ बसून होतो. पार्टीत घडलेले आठवत. रॉबिन कसा काय नाही आला? मला आश्चर्य वाटले. कदाचित थकला असेल.. त्यांच्यात पण थकतात का कुणी? कोण जाणे.

दुसऱ्या दिवशी सकाळी बाबा गेले ऑफिसात नि रॉबिन उगवला.

"हाय ब्रो! हाऊ आर यू? उठलायस की अजूनही स्वप्ने पाहतोयस.. कोण मग? सायली की एल्ली?"

"चूप. कुठे होतास? मला वाटले तूच स्वप्न पाहत झोपलास की काय.. मादाम क्युरीची. बट रॉबिन शी इज गुड यार.. काय जोडी शोभेल.. आय टेल यू.."

"ब्रदर .. वेक अप.. रात्री काय झाले तुला ठाऊक नसेल.. पण तुझी जोडी इथल्याच कुणाशी जमवण्याबद्दल साहेब बोलत होते. ते माझ्याकडून सगळी माहिती घेत होते.."

"सगळी?"

"म्हणजे इकडच्या सगळया मुलींची!"

"मग?"

"मग काय.. मी दिली!"

"कुणाकुणाची?"

"घाबरू नकोस.. वर्षाराणी सोडून .."

"चूप.. तू दुष्ट आहेस का रे थोडासा?"

"थोडा नाही .. खूप. पण मी तुझे ब्रेन मॅपिंग केले काल तिथेच .."

"व्हॉट?"

"यस्स.. माय कन्क्लूजन इज.. यातल्या कुठल्याही मुलीबद्दल तुला तसे काही वाटलेले नाहीये.. ॲम आय राईट?"

"तू काय क्रा ॅस चेक करतोयस? बट यू आर राईट डिअर रॉबिन! आणि मी पण केले तुझे ब्रेन मॅपिंग .. त्यात क्युरीला पाहून कुछ कुछ होता है रॉबिन भय्याला.."

रॉबिन हातातल्या मशिनीवर पाहू लागला.

"ओह! बट आयॅम नॉट फ्रॉम यूपी? देन व्हाय भय्या?"

प्रसंगनिष्ठ विनोद म्हणून हा चांगला होता विनोद!

त्याला जास्त न समजवता म्हणालो, "इ का बात करत हो तुम रॉबिन भइया .. हमरी समज मा नाही आवत.."

रॉबिन गोंधळला चक्क! त्याच्या हातचे मशीन त्याला कसली मदत करतेय या हिंदी भाषांतराला!

थोडक्यात पार्टीचे रामायण संपले. रामाची सीता कोण हे ठाऊक होते सर्वांना.. पण माझ्या घरातले चंद्रावर माझ्यासाठी चांदणी शोधत होते!

आणि मी?

लवकरच येणाऱ्या इंटरव्ह्यू मधून एक नोकरी! छोकरी विल फॉलो!

८

## इंटरव्ह्यू

आठवडा उलटून गेलामध्ये. म्हणजे पार्टी नंतर. दोन तीन वेळा बाहेर गेलो मी. एकदा बागेत .. एकदा असेच भटकत.. नि काहीवेळा अख्ख्या रेसिडेंशियल कॉलनीत. उगाच वर्षा कुठे भेटतेय का ते पहायला. हे चूक आहे हे कळत होते मला पण वळत नव्हते.

शेवटी मला एकट्याला गाठून रॉबिन ने कानउघडणी केली..

"ब्रो, व्हॉट आर यू अप टू?"

"कुठे काय? मी जस्ट इकडे तिकडे हिंडतोय.."

"अंबर, डिअर, डोन्ट लाय टू मी. तू मला नाही फसवू शकत आणि स्वत:ला ही. हे बघ तुला नव्याने सुरूवात करावीच लागेल. ज्या गावाला जायचेच नाही त्याचे तिकिट काढतोच कशाला? ज्या गोष्टीचा लॉजिकल शेवट माहित आहे ती गोष्ट का करावी?"

"खरेय.."

"तू फक्त बोलतोस.. आणि परत ये रे माझ्या मागल्या."

"वा! मराठी म्हणी पण शिकलास.. छान! प्रगती आहे!"

"ते ठीक. विषय बदलू नकोस ब्रो.. उगाच खड्ड्यात पडशील!"

"यू आर राईट रॉबिन. तू म्हणतोस ते खरेच. आय प्रॉमिस, या पुढे वर्षा प्रकरण शंभर टक्के बंद. पडदा.."

"पडदा म्हणजे?"

"कर्टन्स!"

"ओह!"

"पण थ्यांक्स रॉबिन, त्या मशिनीत न शोधता डायरेक्ट मला विचारलेस.."

"हुं.. उगाच भय्या सारखा अर्थाचा अनर्थ नको म्हणून!"

थोडक्यात त्या नंतर मी वर्षाला डोक्यातून हद्दपार केले. इतके की ती समोर आली तरी एक ओळखीची व्यक्ती असावी इतपतच मनात विचार येतील.. ही पुढची गोष्ट. पण एकदा ती समोर असताना रॉबिनने ब्रेन मॅपिंग करून कन्फर्म केले ते! असो. तर माझ्यापुढचे मुख्य काम म्हणजे इन्टरव्ह्यू! लोढा आणि गुंदेचा बिल्डर्स कडे. प्रायव्हेट जॉब असला तरी इकडे पगार चांगला. आणि अजूनतरी आपल्यासारखी काँपिटिशन नाही .. आपल्यासारखी म्हणजे पृथ्वीसारखी!

लोढा नि गुंदेचाचे ऑफिस म्हणजे एक मोठा तंबू होता. बाहेर स्पेससूट काढून ठेवा. आत विस्तीर्ण ऑफिस. आत टीव्हीवर त्यांच्या विविध प्रोजेक्ट्सवर

आधारित फिल्म सुरू. लोढा नि गुंदेचा चंद्रावरचे पहिले बिल्डर्स म्हणून त्यांच्या प्रोजेक्टची नावे 'आर्मस्ट्रॉंग प्रोजेक्ट'ने सुरू होणारी. म्हणजे आर्मस्ट्रॉंग हेवन्स.. आर्मस्ट्रॉंग मूनलाईट .. आर्मस्ट्रॉंग गार्डन्स वगैरे. या चंद्रावर एकही झाड उगवत नसताना हे गार्डन्स वगैरे नाव ठेवणे म्हणजे जरा अतिच होते पण बिल्डरच्या व्यवसायास शोभेलसे होते! ऑफिसात स्टाफहून जास्त ह्युमनॉईड्स. आत गेलो तर गेटवर वेलकम म्हणणारा नि तिथे वाट पाहात असताना कपात चहा आणून देणारा.. दोघेही रोबोच.

इतक्यात एक हर्ली नावाचा बॅज लावलेली मुलगी बाहेर आली,

"अंबर राजपूत?"

"यस.."

"फॉर इंटरव्ह्यू?"

"यस मॅडम."

"वेट फॉर अ व्हाईल."

म्हणून ती आत गेली. मुलगीच होती ती. रोबो नव्हती.

मी वाट पाहता पाहता आर्मस्ट्राँग प्रोजेक्ट्स पाहू लागलो. पृथ्वीवरचे प्रोजेक्ट्स करून झाले म्हणून लोढा नि गुंदेचा इकडे शिफ्ट झालेले दिसतायत.

त्या हर्लीने मला मग बोलावून घेतले आतल्या केबिनमध्ये.

"प्लीज बी सीटेड.. सर विल बी देअर इन अ मोमेंट!"

तिचे इंग्रजी उच्चार पॉलिश्ड होते अगदी पृथ्वीवरून आल्यासारखे. खरेतर हा विचार चुकीचा. इकडचा प्रत्येक जण तिकडूनच आलाय ना! गेल्या चार वर्षात इकडे कुणीही आलेय ते तिकडूनच की नाही?

थोड्या वेळातच एक साहेबी पोशाखातला कुणी येऊन बसला. मि. कृष्णन नाव त्याचे, ते नंतर कळले मला. लोढा नि गुंदेचा म्हणे नव्या प्रोजेक्ट्सच्या परवानगीसाठी दिल्लीला गेलेत. जमीन जुमला नि बिल्डर म्हटले की राजकारण्यांशी संबंध यायलाच पाहिजे त्यांचा! मग तो चंद्रावरचा बिल्डर का असेना!

"यस यंग मॅन. गुड मॉर्निंग."

"मॉर्निंग सर.."

मग जुजबी माहिती झाली विचारून. माझी सर्टिफिकेटस् पुरेशी स्ट्राँग असावीत म्हणून की काय विषय सोडून प्रश्न आले.. त्यात महत्त्वाचा .. 'इथे कशासाठी आलायस?'

इथे म्हणजे चंद्रावर!

माझे आईवडीलच इथे आहेत म्हटल्यावर खूश झाले ते. कधीपासून जॉईन होणार हा प्रश्न आला नि मला धक्का बसला. म्हणजे बघता बघता एक एज्युकेटेड अनएम्प्लॉइड आता एम्प्लॉइड झालाय! बघता बघता बेरोजगारी कमी झालीय.. एकाने. म्हणजे रोजगार निर्मितीसाठी पृथ्वीवरच्यांनी इथे यायला हरकत नाही!

म्हणजे नोकरी मिळाली, कुणाचा वशीला नाही की ओळख नाही .. पगार चांगला, आणि जेवण ऑफिसचेच.. वा! काय टर्मस आणि कंडिशन्स!

आपल्या बेरोजगारीचे दोन चार दिवस एंजॉय करावे म्हणून म्हटले दोन दिवसांनी जॉईन व्हावे. तसे मि. कृष्णन म्हणाले, "बाय ऑल मीन्स यंग बॉय. सी यू आफ्टर टू डेज. यू रिपोर्ट टू मी डायरेक्टली."

"यस सर.."

मी म्हणालो नि आनंदात निघालो. घरी सांगायला हवे.. ज्या नोकरीसाठी आलोय इथवर ती मिळालीय मला. आनंदाच्या भरात तंबू बाहेर पडू लागलो तर चारी बाजूनी 'सूट ॲलर्ट' म्हणत तंबूचे दरवाजे धाडकन् बंद झाले. आतून सगळे रोबोज नि ती हर्लीपण बाहेर आले. मी उत्साहाच्या भरात सूटशिवाय बाहेर पडत होतो! मी वरमून सर्वांना 'सॉरी' म्हणालो नि गुपचाप सूट घालायला लागलो. उगाच कुणीतरी 'नया है वह' म्हटल्याचा भास झाला मला. पण तिकडे दुर्लक्ष करत मी सुटात शिरलो.. हेच खरेय.. हे अंगाबोंगा सूट आपण घालायचे नसतात, तर त्याच्या आत आपल्याला जायचे असते!

घरी आलो नि ही गूड न्यूज दिली सगळयांना. आता नुसताच सुशिक्षित नव्हे तर नोकरीला लागलो होतो.. कमावता झालेलो! या गोष्टीचा अर्थ कसा निघावा? इंग्रजीत रिपरकशन्स म्हणतात तसे परिणाम काय व्हावेत? ते मला रॉबिनने दुसऱ्याच दिवशी सांगितले!

झाले काय की सकाळी आम्ही त्या कृत्रिम बागेत गेलेलो. पाय नि मन दोन्ही मोकळे करायला .. थोडी व्याकरणीय चूक.. हे दोन्ही मोकळे मला करायचे होते.. रॉबिन्याला काय.. मन असेल तर मोकळे करेल ना!

तर दोघे आम्ही त्या बागेत बसलेलो..

"काँग्रॅट्स बॉस, यू आर नाऊ अ पार्ट ऑफ वर्किंग मेन्स असोसिएशन ऑफ मून इंडिया .."

"थ्यँक्स यार. असे खरोखरीच काही असोसिएशन आहे की उगाच काही लपेट?"

"आहे.. लपेटचा अर्थ मी शोधत नाही पण आय कॅन मेक आऊट फ्रॉम द कॉंटेक्स्ट. आणि एक अजून.. तुझा स्वोर्न फ्रेंड त्याचा अध्यक्ष आहे!"

"स्वोर्न फ्रेंड? रॉंग इंग्लिश यार. यू मीन एनिमी?"

"नो.. तुझ्या एक्स वर्षाचा नवरा.. मि. रघुवीर सीताराम  कांदळगावकर .."

"तुला कसे माहिती?"

"नाऊ यू आर अंडर एस्टिमेटिंग मी.. या चंद्रावरचे.. कमीत कमी मून इंडिया वरचे.. नाहीतर अगदीच काही नाहीतर या मून इंडियाच्या इस्टर्न भागातले मला माहिती नाही... असे काय असेल?"

"किंवा या बागेतले.. किंवा आपल्या घरातले.. "

"ओह! डियर ब्रो.. ताणू नकोस आणि डोन्ट चॅलेंज मी!"

"ओह! तर सांग हू इज हर्ली? नाही माहिती तर हरली .. नाही हरलास सांग!"

"ओह! द्याट गर्ल! ती तुझ्या त्या बिल्डरच्या ऑफिसात आहे. पण ती चायनाहून आलीय."

"चायनीज?"

"नाही. इंडियन. आधी मून चायनाच्या ऑफिसात होती. आता इकडे शिफ्ट झालीय."

"म्हणजे?"

"अरे लोढाचे एक ऑफिस होते तिकडे, ते चायनीज पॉलिसीमुळे बंद पडले नि इकडे ही हर्ली आली. तारीख सांगू ती कधी आली त्याची?"

"नको. धन्य धन्य तो रॉबिन.. जशी दोऱ्याने भरली बॉबिन.. तसा ब्रेन तुझा.. सॉरी नो ब्रेन .. पण जे काही आहे ते धन्य आहे तुझे! थ्यांक्स फॉर इन्फो.."

"यू आर वेलकम.. तर सांगायची गोड गोष्ट अशी.. त्या असोसिएशनचा तू प्रेस्टीजियस मेंबर होशील आता."

"ओके.."

"ओके नाही. काल रात्रभर तुझे आई आणि बाबा प्लॅनिंग करत होते.."

"कसले?"

"मी एक सीरियलमध्ये ऐकलेला डायलॉग बोलू?"

"विचारतोयस काय.. बोल.. बिनधास्त."

"आई म्हणाली, अजी सुनते हो, बेटा अब सयाना हो गया है.. पढालिखा है.. नौकरी भी है.. उसके हाथ अब पीले किए जाए .."

"म्हणजे?"

"त्या सायलीबद्दल विचार करताहेत ते. त्यांनी तिच्याशी बोलताना पाहिले तुला."

"सायली? पण मला ती काय.."

"आवडत नाही .. एवढेच ना? आवडेल हळूहळू!"

"रॉबिन, मला काय वाटते ना.. ती अशी आवडली पाहिजे की बघता बरोबर वाटले पाहिजे .. हीच ती आणि तीच ही!"

"ते ठीक आहे. पण या चंद्रावर तुझ्यासाठी अजून चा ॅईस कुठून मिळणार तुला?"

"मिळेल. तुला कशी मार्था आहे, क्युरी आहे.. झालेच तर मॅग्ना आगे आणि हॅझेल पण!"

"वा! कुठून माहिती तुला?"

"तुला काय वाटले तूच माझ्यावर नजर ठेवतोस? मी पण तेच करतो. लाजू नकोस .. सांग, ॲम आय लाईंग?"

"तू ना कहर आहेस यार.."

"पण काल कृष्ण कन्हय्या कुठे चालला होतास? होत्या ना या सगळ्या गोपिकांबरोबर?"

"जाऊ देत. पण ते लक्षात ठेव. लवकरच दोनाचे चार हात.. आणि यू मेक अ रेकॉर्ड.."

"रेकॉर्ड?"

"येस. तुझे हे चंद्रावरचे पहिले लग्न असेल!"

"म्हणजे? इथेच की पृथ्वीवर जाऊन दुसरे? अरे एक मिळताना मारामार .. आणि दोन?"

"ओह! सॉरी. राँग डिक्शन. चंद्रावरचे तुझे लग्न हे इकडचे पहिलेच लग्न असेल! आणि वुई ह्युमनॉईडस आर डाईंग टू सी दॅट!"

"हे बघ रॉबिन, जब तक उसे देखकर दिल के तार नहीं छेडे जाते.. मैं शादी नहीं करूंगा!"

"ओके.. बॉस. सांगतो मी साहेबांना."

"काय?"

"तीन ली.. वन ऑफ लीस.. साय.. ली नाहीतर ए.. ल्ली नाहीतर ह.. र्ली?"

"चूप .. नन ऑफ द अबव्ह.."

"ओके. सांगतो.. यू डोन्ट वाँट टू गेट मॅरिड! एव्हर!"

"रॉबिन्या.. तुझ्या प्रोग्राममध्ये गडबड झालीय काहीतरी. तुझी जीभ फार लांब होत चाललीय..!"

"लाँग टंग?"

"यस.. तू फार टंग.. नाही टांग खेचायला लागलायस माझी!"

"हुं.. पण खोटंय का ते?"

उद्यापासून जॉईन व्हायचे.. माझ्या मेहनतीची पहिली कमाई! आणि मगच बनेन किसीका जमाई!

विचार करूनच आली जमाई म्हणजे जांभई!

## ९

## *ब्रुनी!*

नव्या नोकरीचा पहिला दिवस! सकाळ सकाळी  माझा खास टाय आणि जाकिट घालून ऑफिसात गेलो. कृष्णन माझी वाट पाहात असावेत.

"हॅलो यंग मॅन. वेलकम टू न्यू ऑफिस. लोढा आणि गुंदेचा बिल्डरच्या या ऑफिसात तुझे स्वागत आहे.

आज आपला खास दिवस. वेलकम टू द न्यू एम्प्लॉयी मि. अंबर राजपूत."

एवढे बोलून त्यांनी बेल वाजवली. त्याबरोबर ऑफिसातून सारा स्टाफ येऊन उभा राहिला. त्यात हर्ली तर होतीच आणि दोन मुलं नि चार मुली होत्या. बाकी सारे ह्युमनॉईड्स. सगळयांनी टाळया वाजवून स्वागत केले माझे. वेलकम स्पीच झाले. ऑफिसबद्दल नि कामाच्या पद्धतीबद्दल भाषणे झाली. मग समोसे आले.. चहा आला.. एक तास असा प्रोग्राम चालला. गप्पा झाल्या. हर्ली वगळता चार पोरी अजून होत्या. त्यांचे दर्शन झाले. ह्युमनॉईड्सची ओळख झाली. चांगले होते तेही, पण रॉबिन त्यांच्याहून खास वाटला मला. कदाचित माझा मित्र असल्यामुळे असेल. एकूण इकडचे वातावरण छान होते. आपल्याकडची कॉर्पोरेट ऑफिसेस पाहिलेल्या मला आवडले ते.. आणि ते तसे असणे अनपेक्षित होते. आपल्याकडे सगळे टारगेट ओरिएंटेड आणि घड्याळयाच्या काट्यावर.. खरेतर सेकंद काट्यावर चालणारे .. इकडे काम आहे, कामाची शिस्त ही आहे पण डोक्यावर टांगती तलवार नाही .. अर्थात हे पहिल्या दिवशीचे इंप्रेशन होते.. आणि तशी इकडून

तिकडून माहिती गोळा केलेली मी. मग घोषणा झाली, आज दुपारी माझ्या स्वागतासाठी खास पार्टी!

मला गंमत वाटली. त्या तिकडे म्हणजे पृथ्वीवर कुणी आले नि गेले तर कुणी दखल घेत नाही. आणि इकडे असे स्वागत. आणि असे स्वागत सगळयाच नवीन येणाऱ्यांचे होते म्हणे. म्हणजे आपण तिकडे पृथ्वीवर काय काय मिस करत असतो नाही? इकडे माणसेच कमी म्हणून माणसांना माणसांची किंमत कळत असावी!

काम चांगलेच इकडे. साऱ्या ऑफिसेसमधल्या अकाउंट्सच्या फायली. सगळा रेकॉर्ड कॉम्प्युटरमध्ये. कृष्णन आणि त्यांच्याबरोबर एक पंजाबी साहेब .. मि.भैरोसिंग कैरो. त्यांच्याकडे पाहून पहिला प्रश्न पडला.. त्यांच्या त्या पगडीवर स्पेससूट त्यांना कसा फिट होत असेल? पण दोघे चांगले स्वभावाने. सगळे समजावून दिले दोघांनी आणि मी कामाला लागलो.

दुपारपर्यंत बिझी होतो मी. तसा माझा आवडीचा नि हातखंडा विषय. पण सारा रेकॉर्ड इतस्ततः पसरल्या सारखा. सगळ्याची व्यवस्था लावायची तर महिना पुरणार नाही.

मी तसे म्हणालो तर कैरो म्हणाले, "ओए पुत्तर, की जल्दी है.. ले ले अपना टैम.."

मी कामाला लागलो. खूप दिवसांनी असे काम करत होतो. हाताला काम आणि पगार सुरू. म्हणजे बहुतेक आयुष्य मार्गी लागलेच म्हणावे!

अशा विचारात असतानाच लंच टाईमची बेल वाजली. आणि सारे ऑफिस लंच हॉलकडे निघाले. कृष्णन सर म्हणाले, "सो, सेट?"

"यस सर.. "

"कम. आज तुला वेलकम लंच आहे.."

"थ्यांक्स सर.."

लंच हॉल मोठा होता खूप. समोर टेबलावर सारे मांडून ठेवलेले. आणि ती सारी व्यवस्था बघणारी

एक मुलगी होती.. तिच्या बॅजवर नाव होते.. मिस ब्रुनी.

"ब्रुनी, नाईस अरेंजमेंट.. ॲट शाॅर्ट नोटिस .." कृष्णन म्हणाले.

"थ्यांक्स. पण माझे कामच आहे हे.." ब्रुनी.

ही ब्रुनी सकाळी नव्हती. म्हणजे ऑफिसची स्टाफ नसणार. होती खूप छान. म्हणजे दिलकी तार क्षणार्धात छेडणारी अशी ..

"मीट अवर न्यू कमर.. हा अंबर राजपूत." त्याच्यासाठीच आज ही पार्टी आहे.

"हाय!"

तिने हात पुढे केला. तिचा हात हातात घेत म्हणालो, "हाय! ?"

चांगलाच मऊ होता तिचा हात. मृदू म्हणावा असा.

हाय! ब्रुनी! हीच ती जिला मी शोधतोय. हाय! आता हिची स्वप्ने पडणार ..? ही केटरिंगवाली मुलगी?

"अंबर ही ब्रुनी. मून अँड मून केटरिंग सर्विसेसची हेड अँड होल अँड सोल.."

"और पुत्तर .. हमारी अन्नदाता!"

हे अन्नदाता प्रकरण मला नंतर कळाले. चंद्रावर अन्नधान्य नि हे सारे नॉनव्हेज कुठून येत असावे? हा विचारच कधी आला नव्हता मनात तोवर. त्याचे उत्तर मला ब्रुनीकडूनच नंतर मिळाले. नंतर म्हणजे तिच्याशी ओळख झाली चांगली .. एकदा ती मुद्दाम भेटायला आली ऑफिसात.. तेव्हा. हे सारे जेवण म्हणे मूळ स्वरूपात म्हणजे अगदी सूक्ष्म रूपात पृथ्वीवरून येते. म्हणजे चिकन सेल्स येतात. किंवा वेगवेगळया भाज्यांच्या सेल्स येतात. मग ब्रुनी तिच्या लॅबमध्ये वाढवते त्या सगळया गोष्टी. बायोटेक्नाॅलॉजीचा वापर करून. अगदी प्रयोगशालेय शेती म्हणा. आणि चंद्रावर हे करणारी तिची कंपनी पहिलीच. आणि ही ब्रुनी त्यांची चीफ. बायोटेक मधली एक्स्पर्ट. चंद्रावर त्यानंतर एकदोन अजून आले फूड आंत्रप्रुनर. पण ब्रुनीसारखी तीच.

तर ही इकडची अन्नदात्री.

पार्टीमध्ये मी ब्रुनीकडेच पाहात होतो. ती सगळीकडे उत्साहात फिरत होती. हवे नको ते पाहात होती. रॉबिन असता तर ब्रेन मॅपिंग करत बसला असता. त्यात त्याला कळलेच असते मला ही आवडली ते. पण मला ब्रेन मॅपिंगची काय गरज? माझ्या ब्रेनच्या आतले तर मला ठाऊकच आहे!

ऑफिसातल्या दोन मुलांची ओळख झाली. एक बलविंदर. कैरो साहेबांच्या नात्यातला. नि दुसरा डॅनिअल. गोव्यातून इकडे आलेला. दोघे आऊटडोअरला असतात दिवसभर. हर्ली म्हणजे सगळया बॉसेसची पी.ए. हुशार नि कामसू. बाकी चार मुली याच बॉसेसच्या दूरच्या नात्यातल्या.

दुपारी पार्टी संपल्यावर सगळे कामाला लागले. मी पण ऑफिसात बसलो कामाला. आजचा दिवस खास म्हणावा. आज नोकरी तर मिळालीच.. बहुधा छोकरीपण मिळेल! कमीत कमी कोणी आवडली तरी. काही ना काही तरी व्हायला पाहिजे. इकडे तसे वातावरण मोकळे आहे. नि तशी लोकांची गर्दी ही नाही. त्यामुळे ब्रुनीशी पुढे ओळख वाढवता यायला हवी.. फक्त त्या माझ्या लाजाळू स्वभावावर मात करता यायला हवी.

रात्री घरी आलो. खूपच चांगला गेला आजचा दिवस. रॉबिन वाटच पाहात होता. आईबरोबर. बाबा परत ऑफिसच्या रेड अ‍ॅलर्टवर असल्याने घरी आले नव्हते. मी आलो नि आई तिच्या लिहिण्यात मग्न झाली.

"काय मग? हॅपी?"

"यस ब्रदर. ऑफिस इज गुड. आणि स्टाफ चांगला आहे."

"तुला सांगू, इकडे आले ना की लोक बदलून जातात. इथे लोकं कमी आहेत म्हणून असेल. एकेका माणसाची किंमत असते इकडे. मी आलो चार वर्षापूर्वी, काही गोष्टी बदलल्या.. काही तशाच आहेत. पण माणसं एकमेकांना धरून राहतात इकडे."

"वा! बराच अभ्यास दिसतोय रॉबिन .. माणसाच्या स्वभावाचा!"

"अरे, तुला माहिती नाही .. इथे येण्याआधी ट्रायल म्हणून मी पृथ्वीवर होतो. एक वर्ष. पीपल आर व्हेरी मीन आऊट देअर! ऑलवेज आऊट टू पुट समवन डाऊन. आणि इकडे त्याच्या उलट! ते जाऊ देत.. कुणी दिसली की नाही?"

"मी काय त्या कामासाठी गेलेलो? रॉबिन तू बिघडलायस.. मला दुसरे काही सुचत नाही का?"

"हा! हा! लूक हू इज टॉर्किंग! बरं जाऊ देत.. दोन दिवसांनी वेलकम पार्टी तुझी .."

"अजून एक?"

"येस.. दिस टाईम वर्किंग मेन्स असोसिएशन इज कॉलिंग यू!"

"कुठे?"

"त्यांचा हॉल आहे तिकडे. कांदळगावकरांचा आज मेसेज आला घरी. मी पण येईनच. आपापले प्रायव्हेट रोबोज येऊ शकतात त्या पार्टीला."

"छान. तू येच. क्युरीला पण बोलव!"

"ती? कशाला?"

"तुला कसे करमेल तुझ्या गर्लफ्रेंड शिवाय?"

"पाहिलंस.. ऑलवेज थिंकिंग ऑफ गर्ल फ्रेंड.. आणि म्हणतोस दुसरे काही सुचत नाही का!"

एकूण काय अजून एक पार्टी बाकी आहे. दिवसभराच्या कामाने दमलेलो थोडा.. लवकर झोपलो. तुम्हाला वाटेल स्वप्नात आली ती ब्रुनी.. पण तसे काहीच नाही झाले. सरळ दुसऱ्या दिवशी सकाळीच उठलो.. परत पाऊले चालती ऑफिसची वाट म्हणत!

१०

## *पुन्हा ब्रुनी!*

दोन दिवसांनी संध्याकाळी कृष्णन सरांनी बोलावून घेतले.

"यंग मॅन.. अजून गेला नाहीस?"

"सर इट्स जस्ट फाईव्ह ओ क्लॉक.."

"आय नो. पण तुझी ती पार्टी आहे ना?"

"यस सर.. पण तुम्हाला कसे माहिती?"

"इट्स मून यार. सगळ्यांना सगळे माहिती असते इथे. मि. कांदळगावकर इज माय गुड फ्रेंड. ही इज अ यंग टॅलेंट इन द गव्हर्नमेंट जॉब. आहे एंटरप्रायझिंग अगदी. हीज वाईफ मस्ट बी व्हेरी लकी टू गेट समवन लाईक हिम!"

बिचारे कृष्णन.. किती सीधेपणाने सांगत होते! तेही वर्षाबद्दल. आणि माझ्यासमोर. इथे जुन्या मराठीत 'हाय रे दैवा' म्हटले असते कुणी. पण काय गंमत बघा.. माझ्याच ( वन वे म्हणजे एकतर्फी ) एक्सच्या नवऱ्याचे गुणगान माझ्यासमोर माझ्याच कानांनी ऐकतोय मी आणि तिच्याच नवऱ्याने अरेंज केलेल्या पार्टीसाठी माझा बॉस मला आग्रह करून पाठवतोय! पण रॉबिनला प्राॅमिस दिलेय मी. वर्षाचे नाव कटाप. म्हणजे ते गाणे आहे ना जुने पुराणे.. जब याद कभी तुम आओगे सोचेंगे तुम्हे चाहा ही नहीं.. आणि.. राहोंमें कभी मिल जाओगे.. सोचेंगे तुम्हें देखा ही नही.. थोडक्यात काय.. जिस राह पर तुम चलती हो उस राह पे चलना छोड देंगे आणि काय! त्यामुळे अगदी रिकाम्या आणि कोऱ्या करकरीत मनाने पार्टीला जायला निघालो मी.

घरी येऊन तयारी करून आम्ही दोघे निघालो. म्हणजे रॉबिन आणि मी. हॉल थोडा दूर असल्याने रॉबिन यान घेऊन निघाला. त्यात जाण्याचा पत्ता फीड करून जाता जाता पार्टीसाठी टिप्स देऊ लागला.

"ब्रो.. लिसन.. कांदळगावकर असणार म्हणजे वर्षा पण असणार.."

"सो?"

"सो काय? अँज इफ तुला माहिती नाही मी काय सांगतोय ते..'

"माहिती आहे.."

"काय?"

"तेच. तू म्हणालास त्या दिवशी. ज्या गावी जायचेच नाही, त्याचे तिकिट काढू नये! जय जय रॉबिन समर्थ!"

रॉबिन त्याच्या मशीनीत समर्थचा अर्थ शोधू लागला! कितीही समर्थ ट्रान्सलेटर सर्विस असो, ती असे सगळे कसे भाषांतरित करू शकणार होती?

"ओ के.. सो आय अॅम पॉवरफुल!"

वा! या मशीनीत जय जय रघुवीर समर्थचे भाषांतर उद्या 'हेल रघुवीर पॉवरफुल' होईल! पण रॉबिनला त्याबद्दल काही न बोलता म्हणालो, "यार रॉबिन.. डोन्ट वरी. मी सारे हँडल करीन. तू फक्त तुझ्या क्युरीची काळजी घे म्हणजे झाले!"

"तुला येऊन जाऊन क्युरीच दिसते कारे?"

"सॉरी, अजून कोण आहेत? हॅझल की मार्था?"

"सोड, नीट वाग, उगाच तोंड पाडून बसू नकोस.."

"तुला गंमत सांगू, लहानपणीची आठवण आली. आई असेच सांगायची, नीट वाग, मस्ती करू नकोस.. मला कुठल्याच तक्रारी नकोत टीचर कडून! रॉबिन, आईबरोबर राहून तूही हे शिकलायस वाटते!"

"थोडक्यात अंबर बाळ मोठा झाला नाहीय तर.. आणि तरीही.."

"तरीही काय?"

"काही नाही ब्रो.. जाऊ देत.."

आम्ही हॉलवर पोहोचलो आणि अगदी आगमनाच्या द्वारावरूनच परीक्षा सुरू झाली. क्रिकेटमध्ये एखाद्या तळाच्या बॅट्समनला पहिलाच बॉल बाऊन्सर मिळावा तसे झाले माझे. कारण स्वागताला खुद्द श्री आणि सौ. कांदळगावकर उपस्थित होते. अगदी प्रवेशद्वारावर. पण मी मनोमन ब्रुनीचे स्मरण केले आणि वर्षा विचारास मागे ढकलले. नामस्मरणाचा महिमा असा असावा हे सांगूनही एरव्ही पटले नसते मला! त्यामुळे झाले इतकेच .. जे रॉबिनलाही मान्य करावे लागले.. माझ्या ब्रेन मॅपिंगमध्ये मी वर्षाला पाहून बिलकुल विचलित झालो नव्हतो. याचे श्रेय ब्रुनीचे हे मात्र त्या बिचाऱ्या रॉबिनला कसे कळणार?

"वेलकम मि.अंबर राजपूत. आपल्या वर्किंग मेन्स असोसिएशनमध्ये तुझे स्वागत आहे.." कांदळगावकारांनी असे स्वागत केले माझे.

"वा! काही दिवसांत दुसऱ्यांदा भेटतोय आपण!" वर्षा मान वेळावत म्हणाली. मोठया कष्टाने तिला हिंदीत नजरअंदाज म्हणतात ना तसे करत मी परत ब्रुनीचे नामस्मरण केले मनातल्या मनात नि म्हणालो,

"थ्यांक्स! मला देखील इकडे येऊन आनंद झाला फार."

आम्ही आत गेलो. फंक्शन सुरू व्हायला वेळ होता म्हणून गप्पा मारत बसलो. रघुवीर कांदळगावकर.. ऊर्फ मिस्टर वर्षा काळे समोर बसलेला. माणूस खरेच चांगला होता. कुठल्याशा चांद्र भारतीय सरकारी ऑफिसात होता नोकरीस. आणि हे असोसिएशनचे काम. त्यांची वार्षिक संमेलने असतात म्हणे. आणि इतरही काही काम. आणि वर्षा चक्क हाऊस वाईफ! असेल.. त्याचे काय आता..

"वर्षा सांगत असते तुझ्याबद्दल.." रघुवीर म्हणाला.

"होपफुली चांगलेच सांगत असावी.." मी विनोदाने म्हणालो.

"यस्स. यू वेअर व्हेरी स्टुडियस इन कॉलेज म्हणाली ही."

"अरे हो ना. रघु तुला सांगू, ही वॉज व्हेरी पॉप्युलर अमंग अस. पण गंमत माहितीय.. ते त्यालाच माहिती नसणार. हा आपला लायब्ररीत बसलेला सदा अभ्यास करत. नाहीतर असा पोहोचला नसता इकडे!"

हिला काय माहिती लायब्ररीत मी तिलाच बघत बसायचो..

"असा म्हणजे?"

"असा म्हणजे? सिंगल! अरे आमच्या गृपच्या किती मुली होत्या.. पण हे साहेब आपल्यातच मग्न!"

मला ही न्यूज इतक्या उशीरा मिळावी? कदाचित वर्षा पण त्यात होती की.. नाही हा विचार हद्दपार आता.. लुक फॉरवर्ड! कदाचित नशिबात ब्रुनीशीच जोडी लिहिलीय त्या तिकडे, म्हणून हे सारे घडतेय..

मग पार्टी सुरू झाली. वर्षाने वेलकम साँग म्हणून कुठले गाणे म्हणावे?

'हमको था जिनका इंतजार.. वो आज आके बैठे हैं महफिल में..

मालूम नहीं क्यूं उनको.. लिए फिरते हैं उनको हम दिलमें!'

हे जुन्या पुराण्या हिंदी सिनेमातल्यासारखे तर नाही ना? म्हणजे तिकडे हिरॉइनचे लग्न लागतेय दुसऱ्या कुणाशी नि हिरो हृदय पिळवटून गाणे गातोय.. मुबारक हो सबको समा ये सुहाना.. असेल किंवा नसेल ही. ब्रुनी नामाचा विचार करावा नि हा विचार मागे ढकलावा! वर्षा गाते फार सुंदर त्यामुळे तिच्या गाण्याला टाळया पडल्या खूप. वन्स मोअर पण झाले. चार लायनी ती परत गायली. पुढे अजून काही कार्यक्रम झाले. डान्सेस झाले. एक छोटे नाटुकले झाले..

असोसिएशनमध्ये सारे तरूण सदस्य त्यामुळे जुजबी भाषणांव्यतिरिक्त अजून भाषणं नाहीत. साराच कार्यक्रम खेळीमेळीचा. मला आवडले ते. नाहीतर अख्ख्या कार्यक्रमात भाषणं फार नि लोक जांभया आवरत बसलेले असलेच दृश्य दिसत असते. पण इथे ते नव्हते. फक्त जेवणानंतर एक सरप्राइज आयटम होईल अशी घोषणा झाली आणि सगळे जेवायला लायनीत उभे राहिले!

जेवण छान होते. रघुवीर जातीने मला हवे नको ते पाहात होता. सगळे पोटभर चापून जेवत असताना अचानक मला आठवले.. आमच्या ऑफिसात पार्टीचे जेवण ब्रुनीच्या कंपनीने अरेंज केलेले .. इथे कोण असावे? जेवता जेवता रघुवीरला विचारणार मी तोच ब्रुनीच स्वतः येताना

दिसली नि काळजाचा ठोकाच चुकला माझा. हे कमी की काय तर येऊन माझ्या पुढे उभी राहिली नि म्हणाली, "हाय अंबर!"

"हाय! नाईस टू सी यू हिअर ब्रुनी!"

"वॉव! यू हॅवन्ट फरगाॅटन माय नेम!"

मी म्हणणार होतो.. हाऊ कॅन आय.. पण नाही म्हणालो. प्रगट फक्त म्हटले, "वुई मेट द अदर डे.. अँड यू टू रिमेंबर माय नेम!"

शेवटचे वाक्य हे माझ्या वाढत्या आत्मविश्वासाचे द्योतक होते! फक्त त्याला ब्रुनीचे उत्तर अगदी कोरडे म्हणावे असे होते..

"ऑफकोर्स, वुई डोन्ट फरगेट अवर क्लायंट्स सो फास्ट!"

फक्त क्लायंट! मला हात दाखवून अवलक्षण झाल्यासारखे वाटले उगाच. खरेतर माझी अपेक्षाच चुकीची होती. याशिवाय वेगळे उत्तर तिने काय दिले असते?

"ओह! तुम्ही भेटलायत आधी?" रघुवीरने विचारले ..

"होय ऑफिसच्या पार्टीत."

"अंबर, ही ब्रुनी.. तू ओळखतोस.. चांगले आहे. फार हुशार आहे ही. ब्रुनी नाही ब्रेनी नाव हवं होतं हिचे.."

"काय हे रघुवीर .. पाय ओढायला कुणी भेटले नाही तुला सकाळपासून?"

"बघ. अंबर बघ. किती परफेक्ट मराठी बोलते ही. तिला आपल्या जगातील खूपशा भाषा येतात ज्यांची आपल्याला नावे पण ठाऊक नाहीत.. शी हॅज सुपर आय क्यू.. आणि हिच्या कंपनीचे जेवण.. शी इज टू गुड!"

"खरंय!" मी भीड चेपल्यासारखा बोललो, "ऑफिस लंच वॉज टू गुड ब्रुनी. आणि हे पण!"

"थँक्स.."

"पण ब्रुनी तू पण जेव आमच्याबरोबर.. जॉईन अस."

"असे म्हणतोस? ओके.."

रघुवीरने कुणाला तरी हाक मारून एक डिनर कुपन मागवले नि ब्रुनी आमच्या बरोबर जेवणात सामील झाली. थोड्या वेळात वर्षा पण येऊन बसली जवळ. माझी अवस्था विचित्र झाली.. एक एक्स आणि एक.. नशिबात असेल तर फ्युचर.. दोघी आजूबाजूला माझ्या. मी गप्पांत रंगलो. ब्रुनी पण बोलण्यात हुशार. आणि वर्षाचा तर प्रश्नच नाही. वेळ कसा गेला मला कळलेच नाही. पण रॉबिनचे मात्र दूरून बारीक लक्ष होते! माझ्याकडे! हे मला त्यानेच नंतर सांगितले.

जेवणाच्या निमित्ताने का होईना ब्रुनीशी ओळख झाली चांगली. मुलगी चांगलीच आहे. हुशार आहे. आणि एकदम मोकळ्या मनाची आहे.. मी पण आता कात टाकून स्मार्ट व्हायचे ठरवतोय.. म्हणजे कदाचित ये रिश्ता पक्का हो जाएगा? मनात मांडे खायची माझी सवय कधी जाणार कुणास ठाऊक. कॉलेजची इतकी वर्षे वर्षाला पाहात गेली आणि आता ह्या ब्रुनीला पाहात की काय?

जेवण झाले. आता सरप्राईज प्रोग्रामची घोषणा झाली. रघुवीर बोलायला उभा राहिला ..

"आपल्याकडे आज दोन सरप्राईज घोषणा आहेत..

एक .. लकी ड्रॉ.. सगळ्या डिनर कूपन्समधून एक विजेता घोषित होईल. आणि त्याचे किंवा तिचे प्राईझ असेल..बिईंग अवर स्पेशल गेस्ट फॉर पिकनिक टू द नॅचरल पार्क.. अलाँग विथ अवर न्यू गेस्ट.. ॲज पर अवर ट्रॅडिशन. धिस विल बी अनाउन्सड लेटर.."

हॉलमध्ये थोडा गलका झाला. तो शांत झाल्यावर परत रघु बोलता झाला..

"आणि दुसरे सरप्राईज.. जुन्या हिंदी गाण्यांत गिटारवर एक प्रसिद्ध गाणे आहे.. चुरा लिया है तुमने जो दिल को.. आज आपल्याकडे एक स्पेशल गिटारिस्ट आहे.. त्याच्या बोटांत जादू आहे.. वाजवण्यात लय आहे.. त्याच्या सुरांच्या या जादूचा अनुभव सगळयांनाच घ्यायला आवडेल.. सो ही विल प्रेझेंट.. चुरा लिया..ऑन गिटार.. एनी गेसेस.. हू इज ही?"

जमलेल्या लोकांत थोडा आवाज झाला. मी मागे वळून पाहिले .. वर्षा ब्रुनीबरोबर उभी होती. हात उंचावत म्हणाली, "कॅन आय गेस?"

माझी उत्सुकता ताणली गेली. गिटारीला कित्येक दिवसांत हात नव्हता लावला. मी माझी गिटार आणली असती तर? त्यातही हे 'चुरा लिया है तुमने जो दिलको' गाणे माझे कॉलेज वीकमध्ये प्रसिद्ध होते.. आज इकडे कोण वाजवतोय .. हा विचार करेतोवर वर्षाचा आवाज आला..

"अंबर राजपूत!"

आणि पाठोपाठ रघुवीरची घोषणा.. "यस.. अवर न्यू गेस्ट हिअर इज अ गिटारिस्ट. गिव्ह हिम अ बिग हॅंड!" त्यावर टाळयांचा कडकडाट झाला..

मी शहारलो. वर्षा हे देखील विसरले नव्हती म्हणजे. पण मी वर्षाला विसरणारच होतो.. समोर ब्रुनी होती आणि हे प्रसंगाला अगदी अनुरूप गाणे!

मी स्टेजवर आलो. गिटार हाती घेतली. थोडी ट्यूनिंग केली.. आणि ब्रुनीकडे पाहात वाजवू लागलो..

'चुरा लिया है तुमने जो दिल को

कहीं नजर ना चुराना सनम..'

गाणे मस्त जमले माझे. एक माहोल निर्माण झाला असावा. कारण एक झाले, पाठोपाठ दुसरे, तिसरे झाले. फर्माइशीवरून. गिटार नि मी तिकडे .. म्हणजे पृथ्वीवर असताना अभिन्न असल्यासारखे होतो. आज खूप वर्षानी हाती आलेली ती. भरपूर वाजवून घेतली.

आता फक्त ती लकी ड्रॉची घोषणा बाकी होती. माझ्या इतक्या वर्षांच्या जुन्या सिनेमांचा अभ्यास सांगत होता.. ती लकी व्यक्ती ब्रुनीच असेल! आणि ती तीच असेल तर खरा लकी मी असेन! खरेतर काहीही करून हिरोला हिरॉइन मिळवून द्यायला सिनेमात शोभतात या गोष्टी. पण रियल आयुष्यात?

सगळ्या कार्यक्रमात मी हा असा होतो. सगळ्या कार्यक्रमाचा भाग असूनही अलिप्तपणे मनात विचार चक्रे चालू होती सतत.. आणि घोषणा झाली कुपन नंबराची.. आणि तो कोणाचा निघावा.. तो नंबर ब्रुनीचाच होता!

आजचा दिवस खास होता काही. नक्कीच काही दैवयोजना दिसतेय! नाहीतर अगदी कुपन घेऊन स्वत: जेवण पुरवणारी.. अन्नदात्री कशाला आमच्याबरोबर येऊन जेवली असती? आणि तिचा नंबर पण पिकनिकला माझ्या बरोबर लागावा! काहीतरी सकारात्मक संकेत दिसताहेत .. नक्कीच!

११

## *एलियन!*

पार्टी खूपच छान झाली. ब्रुनीशी बऱ्यापैकी ओळख झाली त्या निमित्ताने. रात्री निघायला उशीर झाला पार्टीतून. रघुवीर आणि वर्षाचा निरोप घेऊन निघालो. त्या आधी ब्रुनीशी बोलणे झाले. तिला म्युझिकची आवड फार. त्यात गिटार प्रिय तिला. माझ्या गिटारवादनावर खूश झाली ती खूपच. म्हणाली, "तुझ्या बोटांत जादू आहे. इकडे जास्त कोणी वाजवत नाहीत गिटार."

वर्षा त्यात म्हणाली, "अगं ही वॉज फेमस फॉर हिज गिटार इन कॉलेज. आणि ते चुरा लिया है गाणं.. इट्स अ व्हेरी ओल्ड साँग.. बट ही युज्ड टू प्ले दॅट.."

"ही इज टू गुड अॅट दॅट.. पण आमच्याकडे नाहीच हे वाद्य!" ब्रुनी निघता निघता म्हणाली.

आमच्याकडे म्हणजे? मी म्हणालो होतो ना की इथे आलेले सारे पृथ्वीवरूनच तर येतात नि मून इंडियामधले सारे आपल्याच देशातून. मग ही 'आमच्या इकडे' का म्हणाली असावी? काहीतरी ऐकण्यात चूक असावी म्हणून मी सोडून दिले ते.. पण त्याचे उत्तर दुसऱ्या दिवशी मिळाले मला..

घरी यायला निघालो तर यानामध्ये रॉबिन शांत होता अगदी. मला वाटले दमला की कंटाळला असेल. पण रोबोज् कसले दमतात.. की कंटाळतात? पण घरी येईतोवर नि घरी आल्यावरही.. रॉबिन गप्पच होता.

मी म्हणालो ही त्याला, "छान झाली ना पार्टी .."

त्यावर "हुं" हे एवढेच उत्तर त्याचे! आई नि बाबा वाट पाहून झोपी गेलेले. रॉबिनही गुड नाइट म्हणून निघून गेला. रॉबिन असा विचित्र का वागत असावा? ब्रेन मॅपिंग करत बसला असेल तर त्याला वर्षाबद्दल काहीच दिसले नसणार .. पण ब्रुनीबद्दल? ते तर दिसलेच असणार. पण त्यामुळे रॉबिन अपसेट का होईल? असल्या विचारात झोप लागली मला. सकाळी परत ऑफिसात निघून गेलो मी.

संध्याकाळी निघायच्या वेळी रॉबिन आला  ऑफिसात भेटायला.

"तू इथे?"

"चल.."

"कुठे?"

"जस्ट कम अलाँग.."

यानातून आम्ही निघालो.. वाटेतही रॉबिन गप्पच. आम्ही त्या कृत्रिम बागेत जाऊन बसलो.. बाग तशीच होती. मी काही म्हणणार तोच रॉबिनच्या चेहऱ्याकडे लक्ष गेले ..

"व्हॉट्स द मॅटर रॉबिन?"

"सांगतो.."

"हे बघ समज मी वर्षाला वर्षापूर्वीच विसरून गेलोय.. तू कन्फर्म केलेच असशील .."

"हुं. तेवढेच नाही.. आणखीही दोन गोष्टी केल्यात मी कन्फर्म.. "

"आणखी दोन..?"

"यस. ऐक. एकतर ती ब्रुनी.."

"तिचे काय?"

"उगाच वेड पांघरून पेडगावी जाऊ नकोस.."

"मराठी सुधारतेय तुझं रॉबिन .."

"ते असू देत.. ऐक.. ती ब्रुनी तुला आवडलीय. मी कन्फर्म केलेय.. तू नाकबूल करू नाही शकत.."

"होय रॉबिन. शी इज टू गुड यार.."

"ते असेल. पण दुसरी गोष्ट मी कन्फर्म केलीय. ती जास्त महत्त्वाची आहे याहून.. तुझ्या फ्युचरकरता.."

"नाऊ डोन्ट टेल मी.. शी इज ऑल्सो बुक्ड?"

"ऑल्सो? एनी वे.. नेव्हर माइंड. पण ते तसे नि तितके सोपे नाहीये ब्रदर. मी त्या ब्रुनीची साग्रंसगीत  माहिती काढलीय."

"हुं.. इथे चकलास नि चुकलास तू डिअर.. रॉंग युज.      ऑफ साग्रंसगीत .."

"तेही जाऊ देत. तुला ठाऊक आहे व्हॉट यू आर अप टू?"

"काय? ब्रुनी इज गुड. खूप हुशार आहे ती. आणि महत्त्वाचे म्हणजे पहिल्या झटक्यात दिलके तार छेडनेवाली.."

"तेच सांगतोय .. ती सुपर इंटलिजंट आहे.. ती अशी नि तशी आहे.. पण ती आहे कोण ठाऊक आहे तुला?"

"म्हणजे?"

"म्हणजे हेच की शी इज.. पृथ्वीवरची नाही ती.."

"मग? नसणारच.. ते गाणंय ना ते मी काल वाजवले .. ये जहां की नहीं है तुम्हारी आंखें.. आसमांसे ये किसने उतारी आंखें.. तशीच आहे ती."

"ऐक. तसे नाहीये ते. शी इज ॲन एलियन.. नीट ऐक. मी काल रात्रभर खात्रीलायक माहिती गोळा केलीय. आणि त्या माहितीत चूक नाही होत माझ्याकडून. तुला काल पार्टीत पाहिले नि आय वॉज वरीड .. हे सगळे कसे पार पडणार. अ ह्युमन मॅरींग ॲन एलियन .."

"एलियन?  म्हणजे? व्हेअर फ्रॉम?"

"म्हणजे शी इज फ्रॉम टायटन."

"टायटन?"

"यस्.. दॅट्स द मून ऑफ सॅटर्न. तिकडे प्रचंड हुशार आणि प्रगत संस्कृती आहे. त्या प्रदेशातील आहे ही. टायटॅनियन."

"टायटॅनियन?"

"होय. आणि तुमची जोडी कशी जमेल याची चिंता आहे मला."

"पण इकडे ही एलियन पोहोचलीच कशी? इकडे तर फक्त इंडियन .."

"ब्रो.. तेच. तेच कन्फर्म करेपर्यंत थांबलो होतो मी. पण दिस इज फॉर शुअर. मी सारी हिस्टरी सर्च केली. आणि आता ही माहिती फायनल आहे.."

"काय आहे..?"

"अरे, मून इंडिया सरकार आणि टायटॅनियन सरकार यांच्यात काही वर्षांपूर्वी एक करार झाला. त्यात कल्चरल एक्स्चेंज.. म्हणजे सांस्कृतिक देवाणघेवाण म्हणून काही टायटॅनियन इकडे पाठवण्यात आले. आणि इकडून काही तिकडे गेले. त्यात ब्रुनी आणि तिची फॅमिली आली. हर फादर इज अ सायंटिस्ट अँड अ फूड टेक्नॉलॉजिस्ट. ब्रुनी त्यांच्याकडून वारसा घेऊन आल्यासारखी फूड इंडस्ट्रीत आली. शी इज व्हेरी इंटलिजंट. तिला कित्येक भाषा येतात आणि शास्त्रातल्या कित्येक संकल्पना सत्यात आणण्याचे प्रयोग ती लीलया करते. ती चांगली आहे यात वादच नाही पण हे असले संबंध कधी आजवर जुळून आले नाहीत. त्यामुळे आय ॲम अ बीट वरीड .. बीट कसला .. रियली वरीड ब्रो.."

"त्यात काय रे रॉबिन .. तू हिंदी सिनेमा पाहिला असशील जुन्या जमान्यातला.. तर त्यात असते ना.. सच्चा प्यार अगर सच में सच्चा हो तो सचमुच उसे कोई भी रोक नहीं पाता!"

"थांब. जरा डी कोड करू देत.." म्हणत रॉबिन मशीनीत त्या वाक्याचा अर्थ शोधू लागला.

"हुं.. ते असेल पण हिअर थिंग्स विल बी इंटरप्लॅनेटरी अँड डिप्लोमॅटिक डिअर!"

"रॉबिन तू काहीही म्हण, आय हॅव लाइक्ड हर.. पुन्हा जुना सिनेमा आठवून सांगतो.. हम दिल दे चुके सनम!"

"अंदाजाने अर्थ लावेन मी. तशी ब्रुनी चांगलीच आहे रे.. इफ इट मटेरियलायझेस.. टिल इट्स लॉजिकल एंड "

"मग काय.. सगळ्यांना जेवण घरच्या घरी मिळेल.."

मी हसत म्हणालो ते रॉबिनचे टेन्शन कमी करण्यासाठी. मोहब्बत की राहों में अडथळेच फार असे काहीतरी  वाचलेले आठवले मला. एकतर आई बाबा मानतील की नाही .. आणि मग हा रॉबिन म्हणतो तसे काही आंतरग्रहीय संबंध वगैरे काही? पण हे सारे जर तर.. अजून ब्रुनीशी फक्त ओळख झालीय. तिला मी आवडेन याची गॅरंटी काय? परत तिच्या घरचे ह्या पृथ्वीवरच्या मुलासाठी तयार व्हायला हवेत. थोडक्यात अडथळे ही अडथळे हैं सब जगह! पण बघू.. होप फॉर द बेस्ट!

घरी आलो तर एक मोठे सरप्राईज माझी वाट पाहात होते!

१२

## *तोच चंद्रमा नभात!*

घरी आलो तर आई वाटच पाहात होती.

"उशीर झाला रे?"

"हो ना! अगं हा रॉबिन आला होता ऑफिसात. त्याच्या बरोबर बागेत गेलो.. गप्पा मारत बसलो तर थोडा उशीर झाला."

"असू देत. तुझे बाबा आज बाहेर गेलेत. त्या मून चायनाच्या मून इंडिया काऊन्सलेटमध्ये. मग तिकडे उशीर झाला तर कदाचित उद्या सकाळी येतील. आणि तू आलास ते बरे झाले.. पुस्तक लिहून झालेय माझे एकदाचे. पहिला ड्राफ्ट. वाच एकदा. मग अजून सुधारेन.."

"वा! बघू.. वाचतो लवकरच."

"जेवून घे आधी नि मग.. रॉबिन .."

"यस मॅडम.. डिनर मॅडम."

"हुं.. अंबर थकलेला दिसतोय .."

एरवी रॉबिन काही न काही गंमतीदार बोलला असता यावर.. खास करून कालच्या त्या पार्टीनंतर. पण आता तो अतिच गंभीर मूडमध्ये आहे.. म्हणजे ह्युमनॉईड्सना पण मूड्स असतात?

जेवण झाल्यावर आईने ते बाड हाती दिले. ते घेऊन मी जाऊन बसलो आपल्या खोलीत. खरे सांगतो, कालचा मूड आज बदलला होता. काल या वेळी ब्रुनीसोबत होतो मी. काल तिच्याकडे पाहात बसलो होतो नि आज तिच्या टायटॅनिक ओळखीने हललो होतो. म्हणजे मला त्या परग्रहावरील ओरिजिनने फरक पडत होता असे नाही पण त्यामुळे सारे काही कसे होणार, किंवा होणार की नाही याचे टेन्शन. रॉबिन म्हणाला ते दुर्लक्ष करण्यासारखे नव्हते हे खरे. त्यामुळे पुस्तक वाचण्याचा मूड नव्हता हेही खरे. ते बाजूला ठेऊन झोपलो डोळे मिटून. झोप लागेना. कालची ब्रुनीची आठवण.. मंतरलेल्या संध्याकाळचे ते क्षण. तिची नि माझी गप्पा मारता मारता झालेली ओळख .. माझे गिटारवर खरेतर तिच्यासाठी आणि तिलाच उद्देशूनच 'चुरा लिया है तुमने जो दिलको' वाजवणे.. आणि माझ्या गिटार वादनाबद्दल तिने कौतुकाने बोलणे.. आणि अगदी शेवटचे ते शब्द.. आमच्याकडे गिटार हे वाद्यच नाही हे सांगणे.. आणि कळस म्हणून आज रॉबिनने ती परग्रहावरून आलेली आहे हे सांगणे! चोवीस तासांत काय उलथापालथ झालीय माझ्या मनात. वर्षाला मी माझ्याच शामळूपणाने गमावलेले.. पण तेव्हा वय कमी होते माझे. आता ही चूक करून चालायचे नाही. ज्या पद्धतीने वर्षा बोलत होती काल, थोडा लाजाळूपणा सोडला असता तर आज आम्ही दोघे कदाचित पृथ्वीवर असतो किंवा ती मिसेस राजपूत म्हणून आज इथे असती माझ्यासमोर. थोडक्यात काही हातपाय हलवायला हवेतच. सुनर दॅन लॅटर .. फॉर इट टू मॅटर!

झोप काही येईना नि बघू आईने काय लिहिलेय म्हणून ते बाड उघडले मी. पुस्तकाचे नाव होते.. 'तोच चंद्रमा नभात..' एकूण आई इकडे आली त्यानंतर चंद्रावर सुचलेले कथानक असावे .. आणि त्यात चंद्र तितकाच महत्त्वाचा असावा! प्रस्तावनेत तेच म्हटलेले.. इथे येऊन एक वर्ष झाले.. आता ह्या वर्षात आजूबाजूस पाहून सुचलेली ही प्रेमकथा!

प्रेमकथा! हे वाचताच मी उडालो. मला वाटले काही गंभीर कथानक असेल.. तर ही निघाली लव्हस्टोरी! वाचलीच पाहिजे म्हणत मी वाचायला लागलो ..

रात्री जागून वाचून काढली कादंबरी. छान. म्हणजे कथानक घडते ते चंद्रावरती. एक तरूण मुलगी येते चंद्रावर रहायला. ती इकडे कुठलीतरी नोकरी शोधत येते. चंद्रावर तशी नोकरी मिळतेही. इकडे चंद्रावरच्या एकूणच वातावरणाचा आढावा होता. ती तरूण मुलगी कशी जुळवून घेते तिकडे याबद्दल सगळे वर्णन होते.. पुढे प्रेमकथा म्हटले तर अर्थातच तिला कुणीतरी भेटतो चंद्रवासी. दोघांच्या आणाभाका होतात. पण दोन्ही घरून विरोध .. दोघांनाही. कधी चंद्रावर कायमची राहिल मुलगी याबद्दल आक्षेप.. तर कधी चंद्रावरच्या संस्कृतीवर.. किंवा तिच्या अभावावर आक्षेप. त्यात जात वेगळी असणे, भाषा भिन्न असणे वगैरे नेहमीचे यशस्वी मुद्दे तर आहेतच.. पण दोघेही खमके निघतात .. प्रेमाला कसलाच अडसर नाही ..'चंद्रावरीलच काय.. उद्या कुणी परग्रहावरून आलेल्या व्यक्तीच्या प्रेमाचा पण स्वीकार करीन मी..' ती नायिका बाणेदार उत्तर देत राहते.. आणि गंगेत घोडे न्हाते! 'ना उम्र की सीमा हो.. ना जन्म का हो बंधन.. जब प्यार करे कोई तो देखे केवल मन..' या नोटवर पुस्तक संपवलेले.

म्हटली तर साधी प्रेमकथा.. त्यात चंद्रावरील वातावरण.. मुलगा चंद्रावरचाच.. आणि पुढे कधी घडले हे तर.. कुण्या परग्रहावरून आलेल्याच्या प्रेमकथा ही घडू शकतात ही भविष्यातली एक हिंट!

याहून जास्त योगायोग कुठला असू शकतो? ब्रुनीशी ओळख होणे.. मग ती एलियन असणे ज्या दिवशी कळावे त्याच रात्री या पुस्तकात अशी प्रेमकथा वाचायला मिळणे.. आणि एकूण लिखाणातून किमान आईचा त्याला विरोध नसावा असे वाटणे.. मी मनातून खूश झालो. किमान

ब्रुनी एलियन आहे म्हणून तरी तिला घरून नकार मिळणार नाही. मनावरचे एक ओझे उतरले माझ्या. याहून मोठे सरप्राईज कुठले मिळणार मला?

रात्रीचे तीन वाजले असतील. हळूच रॉबिनला बोलावून सारे सांगावेसे वाटले. बाहेर आलो तर आई जागीच होती..

"झोपली नाहीस अजून?"

'अरे, लिहून झाले ना.. एकदम रिकामे वाटतेय. झोपच नाही येत.."

"हुं. खूप दिवसांपासून लिहित होतीस ना?"

"हो ना. आपण लिहितो ना तर ती पात्रे तेवढे दिवस आपल्या विचारांचा एक भाग बनतात बघ. पात्रे काल्पनिकच पण मनात जिवंत वाटायला लागतात. कधी तर आपणच त्यांच्याशी बोलतोय असे वाटायला लागते. आणि आता हातावेगळे झाले लिखाण तर .. वन स्टार्टस मिसिंग देम. झोपच येत नाही .."

मी ही संधी हातची घालवणार थोडीच होतो..

"मी वाचले ते पुस्तक .."

"अख्खे?"

"होय. माझा स्पीड ठाऊक आहे तुला.."

"कसे वाटले तुला?"

"मस्त! अगदी छान भाषा आहे आई तुझी. एकाचवेळी खेळकर नि गंभीर भाष्य करणारी."

"हुं. पण गोष्ट कशी आहे?"

"छानच. फक्त तू म्हटलेस ते एलियन्स बद्दल .."

"म्हणजे?"

"म्हणजे एलियन्स आहेत हे ठाऊक आहे तुला?"

"नाही रे. पण असणारच .. किती पुढे गेलोय आपण! अरे माझ्या लहानपणी मी चंद्र दुर्बिणीतूनही नव्हता पाहिला. मी कॉलेजात असताना ही चांद्रयाने जायला यायला लागली. तेव्हा कुणी सांगितले असते की मी एक दिवस याच चंद्रावर येऊन राहिन.. तर पटले असते कुणाला? तसेच हे. असणार कुणी ना कुणी परग्रहावर. पाहिले नाहीत म्हणून नाही का म्हणावे?"

"पण अगदी कुठल्या पृथ्वीच्या रहिवाशाशी लग्न करण्याबद्दल .."

"ते एकूण माणसाच्या भेदाभेद करण्याच्या वृत्तीबद्दल रे. आणि मला सांग, जर समजा असतील एलियन्स पण माणसासारखे .. म्हणजे वागणुकीत नाही हां.. तर एकूण दिसायला, असायला माणसासारखे तर का होऊ नयेत असली लग्नं? थोडा हायपोथेटिकल वाटेल कुणाला पण.. वसुधैव कुटुंबकम् म्हणजे तरी दुसरे काय? तुला काय वाटते?"

"मला? मला काय वाटायचंय!"

आईची हायपोथेटिकल सिच्युएशन लवकरच सत्यात येणार हे आईला कुठे ठाऊक होते? अर्थात हे सारे ब्रुनीचा होकार गृहित धरून म्हणत होतो मी! पण एक झाले, कमीत कमी आईची बाजू तरी कळली. आता बिनघोर घोरायला.. म्हणजे झोपायला हरकत नाही! रॉबिनला न जागवता मी जाऊन झोपी गेलो. पुढचे पुढे!

१३

## *भेट ब्रुनीची..*

सात आठ दिवस गेलेमध्ये. ऑफिसच्च्या कामाचा डोंगर उभा समोर. इतक्या वर्षांत अकाउंटचे उंट कसे हाकावेत याची माहिती नसलेल्या कुणी मेन्टेन केलेली बुक्स. त्यातून हवी ती माहिती काढून तिची व्यवस्था लावणे कर्मकठीण. त्यामुळे ती शिस्त लावेतोवर मान मोडून कामाला पर्याय नव्हता. आणि माझ्या आवडीचे काम ते, त्यामुळे मी तसा खूश होतो. मी सारे हिशेब सांभाळण्यात सारे विसरून गेलो की काय असे वाटले एका क्षणी. रॉबिनशी पण जास्त बोलणे नाही नि ब्रुनीबद्दलही फारसा विचार नाही. रात्री येईपर्यंत थकायला होई नि मी जास्त विचार न करता ताणून देई. बिचाऱ्या रॉबिनशीही फारसे बोलणे झाले नव्हते.. त्यामुळे त्याला काय वाटेल असा विचार आला नि क्षणभर तो ह्युमनॉईड असल्याचा विसर पडल्याचीही गंमत वाटली मला!

दुपारी खूप दिवसांनी काम आटोक्यात आलेसे वाटून कॉफी पित बसलो तर समोर ब्रुनी उभी! मला आश्चर्य वाटले. ब्रुनी अशी ऑफिसात आधी कधी आली नव्हती आणि आज अचानक!

"वॉव! तू! कधी आलीस?"

"जस्ट नाऊ डियर! तुम्हाला आठवण येत नाही मग वुई नीड टू कम हियर!"

माझ्या कानांवर विश्वास बसेना! ही असे बोलतेय म्हणजे. पण मागे ती मला क्लायंट म्हणालेली, तेव्हा हे तसेच काही असेल तर?

"बस. हॅव कॉफी!"

"यस. शुअर. तू म्हणतोस तर बसतेच. आयॅम नॉट इन अ हरी!"

"आम्ही देखील घाईत नसलो की हरी हरी करतो!"

मला वाटले या परग्रहवासिनीला कळणार नाही पीजे .. पण नाही. कळला तिला तो. आपले सुंदर दात दाखवत हसली ती मस्त. आणि त्या पीजेचे सार्थक झाले जणू"

"आय केम टू सी यू.."

मला वाटले तिला विचारू.. एनी पेमेंट पेंडिंग? पण नाही विचारले. ती खरंच मला भेटायला आली असेल तर? उगाच कुणाला दुखवणे स्वभावातच नाही माझ्या.

"थ्यांक्स. मी पण तुझाच विचार करत होतो.. त्या दिवशी पार्टी मस्त झाली नाही?"

"हो ना! धिस कांदळगावकर्स डू इट व्हेरी वेल. म्हणून मी पण आले मुद्दाम पार्टीला. नाहीतर केटरिंगवाले स्वतःच जेवायला येतील का?"

"हुं. नाइस ऑफ यू टू जॉइन अस. आय कान्ट गेट ओव्हर दॅट इव्हिनिंग. थ्यांक्स टू यू ब्रुनी!"

"इव्हन मी. आय लाइक्ड युवर गिटार सो मच! वॉव! हाऊ डू यू डू इट यार?"

मनात मी एक जुने पुराणे गाणे म्हणत कॉफीचा कप तिच्या समोर ठेवला.. 'तू कहे अगर जीवनभर मैं गीत सुनाता जाऊं..' ती हातात कप घेऊन बसली समोर ..

"एकदा ना आपण गिटारचा प्रोग्राम करूयात .. हाऊ'ज द आयडिया?"

"एक्सलंट! गिटार म्हटले की आयॅम ऑलवेज रेडी.. कुठे नि कधी बोल फक्त.."

"वुई विल अरेंज.."

"यस.. आणि माझ्यासाठी गिटार पण कर अरेंज. आय कुडन्ट गेट इट फ्रॉम इंडिया."

"बघू. करूयात काहीतरी. पण आय टेल यू.. दॅट प्रोग्राम विल बी फॉर लिमिटेड पीपल.. लिमिटेड.. मे बी वुई बोथ ओन्ली."

"तू म्हणशील तसे.. ब्रुनी. द वे यू विश!"

लोक काय नजरेत प्रेमबिम वाचतात. मला काय असले वाचता आले असते तर.. तिच्या बोलण्यात काही हिंट मिळत असावी असे वाटत होते.. एकाएकी मनात आले.. रॉबिन .. ही शुड मॅप हर ब्रेन .. जमत असल्यास. एलियन्सचे ब्रेन मॅपिंग त्याच्या प्रोग्राममध्ये फीड केले असेल का?

"कॉफी इज नाइस. आज काय काम नाही वाटते .. बसलास नुसता.. "

"नाही गं. गेला आठवडाभर आय वॉज बिझी. आज दुपारी जरा वेळ मिळाला .."

"आणि आय टुक अवे दॅट.."

"नो नो ब्रुनी.. इट्स सो प्लेझंट टू हॅव यू अराऊंड. तू आलीस, मला खूप बरे वाटलेय.. थ्यांक्स फॉर कमिंग!"

"हे अंबर, आय हॅव अ सजेशन डियर.. लेट्स् बी फ्रेंडस.. म्हणजे ना हे थ्यांक्यू नि प्लीज कॅन बी डिबार्ड .. व्हॉट से?"

"ओह! तू किती छान बोलतेस ब्रुनी!"

"थ्यांक्स.."

"दॅट्स अ नो बॉल ब्रुनी.."

"व्हॉट?"

"तूच म्हणालीस ना लेट्स् बी फ्रेंड्स.. अँड नो थ्यांक्स.."

"येस .. बट वुई हॅवन्ट साइन्ड द एमओयु.. आॅफ फ्रेंडशिप!"

"ओह! तुला ऑफिशियल लेटर हेड वर हवेत?"

"यस्.. अँड अ शेकहँड इज इनफ!"

असे म्हणून तिने हात पुढे केला. तिचा तो मऊ मुलायम हात हातात घेत म्हणालो,

"खरं सांगू आजवर तुझ्या इतकी हुशार मुलगी पाहिली नाहीये मी. आणि खरं सांगू तर सुंदर ही."

"बट यू मस्ट बी हॅविंग अ गर्लफ्रेंड.."

"मी? नाही गं. नेव्हर हॅड वन.."

"व्हाय?"

"माझी कोण होणार गर्लफ्रेंड.. बट यस.. वुड लाइक टू हॅव वन!"

मी बऱ्यापैकी कात टाकली होती .. माझे मलाच जाणवले बोलण्यातून. ब्रुनी पण तशी मोकळी बोलण्यात त्यामुळे आपोआप शब्द येत गेले ..

"सो.. सर्चिंग फॉर वन?"

"खरं सांगू.. वॉज सर्चिंग फॉर वन.. प्रोबॅबली हॅव फाऊंड हर.."

"वॉव! द लकी वन!"

"तुला खरंच वाटतं असं?"

"हो. दॅट वर्षा हॅड ऑल प्रेझ फॉर यू. कॉलेजात तू हुशार होतास फार म्हणाली ती."

"मी? असेन पण तुझ्या इतका नाही. तुझ्या नुसत्या हसण्या नि बोलण्यात जाणवते, धिस ब्रुनी इज सुपर ब्रेनी! तू ब्रुनी नाहीस .. ब्रेनी आहेस!"

"वा! हरभऱ्याच्या झाडावर चढवतोस मला? पडेन ना मी खाली!"

मला वाटले तिला तिच्या ह्या सुपर ब्रेनचे रहस्य विचारावे. पण कदाचित विषय तिच्या एलियन असण्याकडे वळेल. आणि इतक्यात तो विषय नकोच!

"हा! हा! बाय द वे.. ती नॅचरल पार्कची पिकनिक कधी आहे? लकीली तू लकी विनर आहेस त्याची!"

"तुला सांगू .. नॅचरल पार्कमधल्या पिकनिकला मला नाही जावेसे वाटत.."

"बाप रे! मग मी कसा जाणार?"

"अरे नाही.. पण मी येणार आहे .. तू जातोयस तर मी ही येईन.. अंबर."

माझा माझ्या कानांवर विश्वास बसत नव्हता. ब्रुनी खूपच ओपन होती. आणि तिच्या बोलण्यात चांगलाच आत्मविश्वास होता.

"थ्यांक्स."

"सी.. नो बॉल अगेन.. ते लोक कळवतीलच. दॅट रघुवीर इज व्हेरी सिस्टमॅटिक. तो चुकत नाही कधीच! इनफॅक्ट असा पृथ्वीवासी मी क्वचितच पाहिलाय."

ब्रुनीने स्वत: एलियन असल्याचे सांगितले नव्हते मला.. पण ते माहिती असावे असे बोलत होती ती. तिला ती एलियन असल्याचे ना अप्रूप असावे ना गंड. एखादी साधी बाब असल्यासारखा तो उल्लेख परत आला तिच्या बोलण्यात. त्यातला एलियन असण्याचा मुद्दा माझ्यासाठी किती महत्त्वाचा ठरणार कुणास ठाऊक पण तिच्या वागण्यात तरी ते महत्त्वाचे नाही एवढेच जाणवत होते.

"आणि हाऊ डू यू फाइंड इट हिअर?"

"अगं सध्या इतका बिझी आहे ना की वेळ नाही, पण इथे आधी कंटाळा यायचा .. आता आयॅम फिलिंग लाइक ॲट होम! इस्पेशियली टुडे!"

"व्हाय टुडे?"

"गेस.."

"बिकाँज आय केम हिअर?"

"आय वोन्ट टेल यू ब्रुनी!"

"ओके .. ऐक एक.. एकदा कम टू माय होम!"

ब्रुनी मला तिच्या घरी बोलवत होती. हीच ती वेळ आहे का तिच्याबद्दल जाणून घ्यायची. मला वाटले नाही ..

"यस.. ऑफकोर्स. तू म्हणशील तेव्हा.."

"आता काय घरी निघणारेस?"

"यस ब्रुनी. आजचे काम संपवले. निघेन नंतर. तुला जायची घाई नाही ना?"

इथवर संभाषण एखाद्या स्वप्नात घडावे तसे घडले. आणि तिचा फोन वाजला.. ती बोलत असताना मी तिच्याकडेच पाहात होतो. क्यूट शी इज. पृथ्वीवर कुणाशी तुलना होईल हिची? खरेतर आपल्याला फक्त सिनेमातल्या हिरॉइन्स ठाऊक असतात .. तेही त्यांचे कितपत सौंदर्य नैसर्गिक असते कुणास ठाऊक! ती बोलेपर्यंत एक निष्कर्ष काढला मी.. ब्रुनी सारखी ब्रुनीच! फोनवर बोलून झाले न ती म्हणाली,

"मला जावे लागेल डिअर.. कॉल फ्रॉम द ऑफिस"

"ओह! शेवटी काम लागलेच मागे! ही कॉफी संपवून जा!"

"हो ना!"

ब्रुनी कॉफी पित बसलेली आणि इतक्यात रॉबिन आत शिरला.

"अंबर.."

"अरे रॉबिन .. ये ना!"

रॉबिन ब्रुनीला बघून थबकला असावा.. तो आत आला..

"ब्रुनी.. हा माझा खास दोस्त .. रॉबिन. आणि रॉबिन .. ही ब्रुनी. मून अँड मून केटरिंगची ब्रेन.. ब्रुनी .."

रॉबिनने हात पुढे केला. ब्रुनी हस्तांदोलन करत म्हणाली, "नाइस टू मीट यू रॉबिन.. मी निघते अंबर. विल कॅच अप लेटर.."

ती निघून गेली. आणि रॉबिन म्हणाला, "तुला रोज उशीर का होतो ते कळले आता!"

हे म्हणजे अति होते.. रोज रात्ररात्र जागून काम केलेले मी.. सारा गृहपाठ पूर्ण करावा नि वर्गात गृहपाठाची वही न्यायला विसरावी तसे झाले माझे.. टीचर म्हणणार.. नुसते खेळायला हवे.. हुंदडायला हवे..

"नाही रे. आज पहिल्यांदाच आली ती."

"असेल. पण छान आहे."

"थ्यांक्स!"

"तू कशाला थ्यांक्स बोलतोयस.. कॉंप्लिमेंट इज नॉट फॉर यू डियर!"

"खरंय. तर कसा काय आलास?"

"कसा म्हणजे? का आलास विचारतोयस का? नाही इफ आय हॅव डिस्टर्बड यू.. बोथ.."

"रॉबिन तू.. बोल."

"काही नाही. बरेच दिवसात बातचीत नाही. मॅडम इज वरीड. मॅडम म्हणाल्या, काय भानगड आहे पहा म्हणून!"

"रॉबिन, डोन्ट टेल मी, आईने भानगड शब्द वापरला आणि.. तू ती सांगितलीस.."

"दोन्हीचे उत्तर एकच.. एन् ओ.. नो. मी माझ्या प्रोग्राममध्ये बदल केलेला सांगितलं होते तुला .. सो डोन्ट वरी!"

"अरे, तुला आईशी बोलणे झालेले सांगितले नाही मी.."

"तू नाही सांगितले पण मला माहितीय. मॅडमनी माझ्याशी पण डिस्कस केले.."

"काय?"

"हेच ब्रुनी अँड ऑल!"

"म्हणजे?"

"अरे, मॅडम वॉज आस्किंग.. एलियन्स असतात का? आणि मी कधी पाहिलेय का कुणाला?"

"मग? तू ब्रुनीबद्दल सांगून टाकलेस?"

"अंबर ब्रो.. तुला काय वाटते?"

"मला काय वाटते त्यापेक्षा तू काय केलेस ते सांग!"

"तर ऐक.. मी माझे सारे लिंग्विस्टिक स्किल वापरून उत्तर दिले .. त्याला काय म्हणतात.. एक मिनिट .. हां नरो वा कुंजरोवा!" रॉबिन त्याच्या मशिनीत पाहात म्हणाला.

"अरे मी सांगितले, एलियन्स असणारच.. पण त्यांना एलियन्स म्हटल्याने ते अलायनेट होतील! आणि कीपिंग ब्रुनी इन माइंड.. मी माझ्या कल्पनेतली एलियन ही डिस्क्राइब केली! सुपर ब्रेनी! आणि विथ ऑल फीचर्स ऑफ ब्युटी!"

"आणि उद्या आई ब्रुनीला भेटेल तेव्हा?"

"उद्या? यू आर टू सुपर फास्ट!"

"उद्या म्हणजे पुढे केव्हा तरी. डोन्ट टेक लिटरल मिनिंग यार.."

"ते कळले मला, पण तुझे कसेय ना.. जस्ट अ मिनिट .." तो मशिनीत पाहात म्हणाला पुढे,

"महाभारतात अर्जुनाला फक्त पोपटाचा डोळा दिसत होता ना तसा तुझा ब्रुनीवर डोळा आहे!"

"पण अर्जुनाला तो डोळा फोडायचा होता.."

"हुं.. नाऊ इट्स युवर टर्न ब्रो.. डोन्ट टेक लिटरल मिनिंग.. तर मी इन जनरल सांगितले मॅडमना. त्यांनी मला त्यांच्या पुस्तकाची स्टोरी सांगितली. त्यात मी एक बदल करायला सांगणार होतो.. फ्रॉम माय एक्सपिरियन्स.."

"काय?"

"हेच.. लेट द हिरो बी ॲन एलियन!"

"तू सांगितले नाही ना?"

"अजून नाही .. पण सांगेन!"

"यू नॉन सेन्स.. डोन्ट मेक मी टेन्स."

"अरे, एक चांगली गोष्ट आहे, युवर मदर इज ओपन फॉर एलियन्स .. चल. जाऊ घरी. बाकी मला तुझ्या लव्हस्टोरीतले डिटेल्स सांगत जा.."

"व्हाय? हिअर आयॅम क्युरीयस अबाऊट क्युरी .. पण तू कुठे सांगतोस तुझी स्टोरी?"

"चल. उगाच डोन्ट मेक मी जेलस.. विश आमच्यात ही फॅकल्टी डेव्हलप होईल .."

"रॉब, हल्ली सीरियल्स फार पाहतोयस.. आय थिंक धिज सीरियल्स हॅव बिकम युवर स्टेपल डाएट सिरियल! बिघडत चाललाहेस तू!"

"तुझ्या सारखा? पण आय टेल यू, नथिंग मोअर ब्युटीफूल दॅन टू सी .. दोन प्रेमी जीव! वॉट्स दॅट कॉल्ड.. युगुल!"

"वा! तू आता कविता करशील की काय?"

"असेल प्रोग्राममध्ये तर करीनही!"

१४

## *नॅचरल गार्डन*

मध्ये दोनचार दिवस गेले असावेत.मध्ये वाटले की ब्रुनी येईल कधी, तर नाही आली ती. तिचे आॅफिस कुठेय ठाऊक नव्हते मला. नि असते तरी मी गेलो असतो की नाही कुणास ठाऊक. अशा बाबतीत पुढाकार घ्यायचा स्वभावच नाही माझा. त्यामुळे मी बदललो कितीही तरी किती बदलणार होतो? ऑफिसाच्या कामांना अंत नव्हता हे खरे. बिल्डरचे ऑफिस, त्यात बिझी प्रोजेक्ट्स. हिशेब असणारच मोठमोठे. त्यात ब्रुनीची आठवण आली तरी वेळ कुठला मिळायला. असाच कंटाळून बसलेला असताना अशातच मला रघुवीरचा फोन आला..

"कसं काय? ॲडजस्टिंग वेल?"

"हुं."

"काय गप्प एकदम .."

"गप्प नाही, थोडा कामात बिझी.."

"ओके शुड आय कॉल अगेन .."

हा फोन त्या नॅचरल पार्कच्या पिकनिकसाठी असणार. मी झटकन विचार केला .. ब्रुनीने प्राॅमिस दिलेय येण्याचे .. म्हणजे ही संधी महत्त्वाची.

"अरे नाही, नाही. आता बोल. ही फाइल क्लोज करत होतो.." मी समोरच्या रिकाम्या टेबलाकडे पाहात म्हणालो. बरंय, व्हिडिओ कॉल नाही केला याने..

"अरे त्या पिकनिक टू नॅचरल पार्कचे डिटेल्स द्यायचे होते.."

"वा! आयॅम एक्सायटेड. कधी आहे?"

"कमिंग सॅटर्डे.."

"पण माझे  ऑफिस?"

"यू डोन्ट वरी."

"नो यार, सॅटर्डे इज इम्पाॅर्टंट."

"ठीक. पण कृष्णन इज माय फ्रेंड."

"पण तरीही .."

"आणि ब्रुनी फक्त शनिवारीच असते मोकळी."

"ओह! मग तर शनिवारीच जायला हवे! नाही म्हणजे तीच लकी विनर होती ना.."

"खरंय. कमिंग सॅटर्डे. आणि यू कॅन गेट युवर रॉबिन."

"तू कसा ओळखतोस रॉबिनला?"

"त्या दिवशी भेटलो ना आम्ही.मध्ये भेटत असतो कधी. हल्लीच भेटलेला. सांगत असतो रिसेंट डेव्हलपमेंट्स.."

"म्हणजे .."

"म्हणजे इकडतिकडच्या बातम्या! एनी वे मेलिंग यू द डिटेल्स. शनिवारी भेटू. तू तर येशीलच.. बीकॉज.. नाही.. अँड ब्रुनी हॅज प्रा ॅमिस्ड, शी इज कमिंग!"

हा शेवटचा इनपुट रॉबिनची करामत तर नाही? रॉबिन्या तसा चांगला आहे. मनाने चांगला म्हणावे तर त्याला मनच नाही. पण हल्ली अजून इव्हॉल्व झाल्यासारखा वागतो. डू दे रियली इव्हॉल्व? पण नक्कीच याने रघुवीरला ब्रुनीबद्दल सांगितले असणार. कळलाव्या म्हणावे तर रॉबिन त्यातला नाही. कुठेतरी विषय निघाला असावा. तसाच विषय आईकडे निघाला तर?

पिकनिकचा दिवस म्हणजे मोठी तयारी जणू. नॅचरल पार्क. चंद्रावर कृत्रिम सारे आहे. म्हणजे झाडे नि गवत, फुले नि पाखरे, छोटे छोटे प्राणी.. पण या पार्कात फक्त नैसर्गिक सारे. त्यात बघण्यासारखे काय असावे? चंद्र म्हणजे मोठमोठाली विवरं नि उंच सखल भाग. सगळीकडे धूळ. नि समुद्र म्हणवणारी लाव्हारसाची थिजलेली लांबलचक पठारे. दिवसा अति उष्ण नि रात्री अति शीत तापमानात चंद्र दररोज वितळत नि गोठत असावा अशी हवा. उगाच नाही या चंद्राला डेड सॅटेलाईट का असे काही म्हणतात. टायटनवरची हवा कशी ठाऊक नाही मला पण ब्रुनी नॅचरल पार्कात यायला तशी उत्सुक नसावी कारण हेच असणार. त्याच दगड धोंड्यांना काय पहायचे. पण म्हणजे मी येणार हे अट्रॅक्शन तिच्यासाठी? मी मनोमन खूश झालो. ब्रुनीबरोबरच जायचेय तर तो चंद्राचा इतिहास नि भूगोल कशाला हवा? आणि त्या असोसिएशनच्या कृपेने आपोआप होतेय पिकनिक! याहून जास्त काय हवे?

पण मूळ पिकनिक मात्र नैसर्गिक ठिकाणी असली तरी इंटरेस्टिंग होती. म्हणजे दगड धोंडे नि धूळ असली तरी पार्कमध्ये छोटेछोटे तंबू होते ज्याच्यात जाऊन बसू शकत होते लोक. एक दोन छोटेखानी डोंगर होते ज्यावर गिर्यारोहण करण्यासाठी मुद्दाम पायऱ्या केलेल्या होत्या. लाव्हाच्या

समुद्रात मनसोक्त फिरण्याच्या पायवाटा होत्या.. आम्ही सारे खूप भटकलो. साधारण दहा पंधरा जण. त्यात मी नि ब्रुनी दोघे. वर्षा नि रघुवीर. बाकी सारे सदस्य त्या असोसिएशनचे. रॉबिन नि दोन त्याचे मित्र आलेले.. केविन आणि आर्टेमिज. त्या तंबूंत जाऊन फोटो काढून घेतले आम्ही. वर्षा नि रघुवीरला जणू ब्रुनी नि माझी जोडी जमावी असे वाटावे असे वागणे होते त्यांचे. नक्कीच ही रॉबिनची करामत असणार.. कारण संधी दिसताच ते आम्हा दोघांना एकटे सोडत होते.. आमचे फोटोही दोघांनी काढले खूप.. ते डोंगर छोटे असले तरी धुळीच्या साम्राज्यातून त्यावर चढणे अवघड होते. मला वर चढायला मदत करायला ब्रुनी होतीच.. पण त्या अवजड स्पेससूटाला सांभाळून ते करणे जरा कठीण होते.. त्यात लक्षात इतके आले की टायटनवरच्या लोकांनी बनवलेले सूट्स कित्येक पटींनी कमी जड होते. त्यामुळे तिला ते लीलया जमत होते. जाता येता ब्रुनी आपल्या ग्रहावरच्या गोष्टी सांगत होती. 'ग्रह' म्हणजे प्लॅनेट नाही खरा पण टायटनवरचे सांगताना तिचे डोळे सुटातूनही चकाकताना दिसत होते. आपल्या घराला सोडून इकडे कशी आली ती? तर तिचे वडील मूळ शास्त्रज्ञ. त्यात तिकडचे सरकारी अधिकारी, त्यामुळे राजनैतिक अधिकारही त्यांना. जगातील इतर सिव्हिलायशेन्सशी परिचय व्हावा म्हणून टायटनने खास मोहीम आखलेली. त्यात पृथ्वीवर येण्यास पृथ्वीवरच्या विविध सरकारांनी नकार दिलेला. चांद्रभारत सरकार मात्र राजी झाले नि त्याबरोबर एक युरोपा म्हणून गुरूग्रहाचा चंद्र आणि शुक्रावरील मानवी वस्ती यांवर पोहोचले ते. त्यात ब्रुनी आपल्याकडे राजदूत असतात तशी शुभेच्छादूत म्हणून टायटनहून येऊन इथे राहणारी. तिने इकडच्या फूड इंडस्ट्रीची सूत्रे हाती घेतलेली. अजूनही तिचा आवाज आपल्या घरच्या आठवणी सांगताना कातर होताना जाणवला मला. एकूण टायटनवरची संस्कृती बरीच पुढारलेली असल्याचे जाणवत होते.. आम्ही अशा खूप गप्पा मारल्या. तिला पृथ्वीवरच्या गोष्टी म्हणजे माझ्या लहानपणच्या नि कॉलेजच्या आठवणी सांगितल्या. पिकनिकपेक्षा तिच्या बरोबर असण्यानेच दिवस असा सुंदर गेला हे मला जाणवले. तिला ही तसे वाटले असावे, निघताना म्हणाली,

"आय हॅड कम हिअर बिफोर. पण इतके आवडले नव्हते तेव्हा हे पार्क.."

"पण मला आवडले पहिल्याच फटक्यात.."

"आहे छान. नॅचरल .."

"आणि नॅचरली तू बरोबर असल्याने आवडले असणार मला.."

मी बोललो तशी ती लाजली असल्यासारखे वाटले मला. तिच्या त्या सुटातून चेहरा स्पष्ट दिसत होता.. फक्त बाकी देहबोली म्हणजे बॉडी लँग्वेज कळायला मार्ग नव्हता.

"खरंय यार अंबर. आय थिंक कंपनी मॅटर्स! खूपच मजा आली पिकनिकला. वुई शुड थ्यंक कांदळगावकर्स .."

हे म्हणतोवर वर्षा समोर आली..

"थ्यांक्स वर्षा.. पिकनिक वॉज टू एंजॉयेबल.."

"हो ना. छानच. रघुवीर कुठेय?"

"तो? सगळी अरेंजमेंट पाहात असणार. ही इज टू मेटिक्युलस.. त्याच्या अरेंजमेंटमध्ये चुकीला वाव नाही .. बिझी असणार तो. काय ब्रुनी हाऊ वॉज द डे?"

"आॅफकोर्स एंजॉइड वर्षा. ग्लॅड आय केम. मी येणार नव्हते आधी. पण आले."

"आणि हा गिटारिस्ट?"

"अगं हो.. वर्षा.. ती गिटार हवी आहे एकदा .. त्या फंक्शनला होतो ती.." मी म्हणालो.

"का रे?"

"असेच!"

मी ब्रुनीने बोललेले विसरलो नव्हतो.. ती, मी आणि गिटार !

"असेच? नाही म्हणजे तू वाजवणार असशील तर आम्हीपण येऊ ना!"

"चालेल.. पण प्रॅक्टिस साठी थोडा वेळ हवा ना मला .."

"ओ के. पाठवते. पण आम्हाला बोलवायला विसरू नकोस हां.. ब्रुनी."

वर्षाने ब्रुनीला हे सांगावे? आमचे वागणे जास्त आॅब्व्हियस तर होत नाहीय ना? कुणी तरी म्हटलेय ना.. प्रेमी जीवांची अवस्था म्हणजे डोळे मिटून दूध पिणाऱ्या मांजरासारखी. तिला वाटते कुणी बघत नाही तसे? असेलही. ब्रुनी आता माझ्या विचार प्रक्रियेचा भाग झालीय.. म्हणजे थाॅट प्रोसेसचा.

घरी आलो ते मंतरलेले क्षण आठवत. रॉबिनला म्हणालो, "काय कशी झाली पिकनिक?"

रॉबिन म्हणाला, "आम्हाला काय.. नॅचरल पार्क म्हणजे दगड आणि धोंडे.. तुझ्यासाठी तेच अगदी मऊ मुलायम गालिचे अंथरल्यासारखे असणार .. कंपनी मॅटर्स यार.."

"तू ब्रुनी बोलली ते ऐकत होतास?"

"नो.. पण ब्रुनीपण म्हणाली असे? वा! म्हणजे आग दोन्ही बाजूंनी लागलीय दिसते .."

"रॉब, तू बिघडत चाललायस.. टीव्ही जास्त बघू नकोस.."

"ब्रो, आयॅम ओन्ली टाॅकिंग.. खरा बिघडला तू आहेस. एवढी पिकनिक झाली.. दोन चार वाक्ये सोडून ब्रुनी शिवाय कुणाशी बोललास तरी का? आय वॉज ऑब्झर्विंग डियर!"

हे असे झाले असणार. ब्रुनी समोर असताना मला इतर काहीच सुचत नसणार, मग इतरांशी काय बोलणार मी. हे असे सगळ्यांचेच होते की काय? असेल .. असणारच!

घरी आलो तर बाबा खूप दिवसांनी घरी आलेले. इमर्जन्सी म्हणे! यावेळेस भांडण नाही कुठल्या देशाचे पण टायटनशी राजनैतिक काहीतरी देवाणघेवाण होती म्हणे! शिष्टमंडळे नि मिटिंग्स.. टायटन! लवकरच राजनैतिक असो की नसो, तरी वैयक्तिक देवाणघेवाण होण्याची शक्यता आहे टायटनशी याचा त्यांना कुठे पत्ता होता!

## १५

## *टायटॅनियन भेट*

टायटन आणि आमच्या घरचे काय नाते असावे? टायटनचे शिष्टमंडळ ऑफिसच्या कामासाठी आलेले. त्यांनी वाकडी वाट करून आमच्या घरी यायचे काही कारण नव्हते खरेतर. पण बाबांना दुसऱ्या दिवशी सकाळी कॉल आला त्यांचा. इकडच्या लोकांशी संबंध जोडणे म्हणजे डिनर डिप्लोमसी आली! आईने आजवर टायटनचे नावही ऐकले नव्हते! खरेतर त्यांची ही पहिली भेट नव्हती चंद्रावर पण आईला ते माहिती असायचे कारण नसावे..

"हे टायटन काय आहे हो? कुठल्या देशात आहे?"

"ओळख?"

"मी काय ओळखणार.. फार पूर्वी म्हणजे मी कॉलेजात असताना टायटन नावाची घड्याळे असायची एवढीच माहिती आहे मला. मला माझ्या बाबांनी बक्षीस दिलेले एक बीए झाले तेव्हा."

"रॉबिन .. डझ एनीवन नो हिअर व्हेअर इज टायटन?"

"सर.. अंबरला ठाऊक आहे.. इन फॅक्ट.." शेवटचे वाक्य तोंडातल्या तोंडात बोलला तो.. "त्याला एक टायटॅनियनही ठाऊक आहे!"

मी चेहऱ्यावरचे भाव न बदलता म्हणालो, "अगं आई, टायटन हा शनिचा चंद्र आहे! म्हणजे सॅटेलाईट ऑफ सॅटर्न! फार प्रगत आहे म्हणतात.."

"आणि तिकडचे लोकही सुंदर असतात खूप.. म्हणजे अंबर सांगत होता."

"बापरे! आणि मला पत्ता ही नाही अजून! आणि मी एलियन्स असतात का कुठे याचा विचार करत बसलेय इथे!"

"अगं एलियन्स नसायला काय झाले. हे टायटनवाले सुपर हुशार आणि महत्त्वाचे म्हणजे कल्चर्ड लोक आहेत. प्रगत म्हणजे सुसंस्कृत! आता येतील तेव्हा बघशीलच तू!"

"हो ना!"

"आणि त्यांच्याकडची एक ब्रुनी म्हणून मुलगी आहे इकडे.. ती पण येणार आहे संध्याकाळी."

मी शक्य तेवढा चेहरा सरळ ठेवत म्हणालो, "कधी येताहेत ते?"

"आज संध्याकाळी!"

"मी येतो लवकर. आयॅम इगर टू मीट देम."

मी हे बोलताना रॉबिन माझ्याकडे बघून हसत होता! जणू 'मीट देम' नाही 'मीट हर' म्हणत असावा तो! ब्रुनी अशी ऑफिशियली घरी येईल याचा विचारही केला नव्हता मी. अगदी न प्लॅन करता ब्रुनी आई बाबांना भेटणार .. आजच! रॉबिन म्हणाला ते खरंच.. सारे काही सुपर फास्ट!

मला वाटले ब्रुनीला फोन करून सांगावे .. बाई आज तुझ्या सासरी येणारेस तू.. पण म्हटले सरप्राईज द्यावे तिला. आज त्या सगळयांबरोबर ती येईल तर काय गंमत होईल! ऑफिसचे काम जितक्या लवकर संपेल तेवढे संपवून बसलेलो तर फोन वाजला.. चक्क ब्रुनी होती लाइनवर.

"हाय! काय करतोयस?"

"काही नाही. निघणार आहे आज लवकर."

"वा! म्हणजे काम संपले.."

"यस. येतेस इकडे?"

"वुड लव्ह टु.. पण आज एका ठिकाणी जायचेय.."

"ते संध्याकाळी ना?" मी बोलून गेलो.

"हाऊ डू यू नो?"

"मी? नाही जनरली लोक संध्याकाळीच जातात ना म्हणून!"

"वा! वॉट अ लॉजिक!"

"पटलं ना? आयॅम आॅलवेज राइट! येतेस तर ये पटकन् .."

"नो यार! नो सच लक. वेळ नाही .."

"बट शुड आय बेट..?"

"काय?"

"की वॉट एव्हर हॅपन्स .. तू आज मला भेटणारेस.. तेही संध्याकाळीच!"

"नो चान्स डियर.. आय हॅव अ डिप्लोमॅटिक ड्युटी टुडे!"

"अँड स्टिल इफ आय से.. बेट.. यू आर मीटिंग मी?"

"देन यू आर क्रेझी अंबर.. नो.. वेट अ मिनिट .. अंबर.. राजपूत .. राइट.."

"काय राइट?"

"आय नो.. मला ठाऊक आहे तू का बेट लावतोयस ते.. आयॅम व्हिजिटिंग युवर हाऊस टुडे.. राजपूत'स रेसिडेन्स.. द टायटॅनिक डिप्लोमसी डिनर!"

"वॉव! हुशार आहेस.. सो मीटिंग इन द इव्हिनिंग?"

"ऑफकोर्स. माय प्लेझर!"

"पण आता रिकामी आहेस तर ये ना.."

"नो डियर.. लॉट टू डू हिअर. सी यू इन इव्हिनिंग. इगर टू मीट युवर पेरेंट्स.. बाय."

तिने फोन ठेवला. कदाचित इगर टू मीट इन लॉज म्हणता म्हणता चुकली की काय! आणि दहा मिनिटांत ब्रुनी माझ्या ऑफिसात माझ्या समोर होती!

तू इथे?

"का आले असेन एनी गेस?"

"सी, वुई अर्थ पीपल आरन्ट ॲज इंटलिजंट यार!" मी हसत बोललो. त्याच क्षणी लक्षात आले माझ्या .. ती एलियन असल्याचे तिने प्रत्यक्ष न सांगता मी तिला सांगत होतो!

"तुझं काहीतरीच अंबर! पण मी आले ते सांगायला ..

काय?"

"आय वुड बी अ पार्ट ऑफ डिप्लोमॅटिक टीम. तर मी तुझी फ्रेंड असल्याचे तिथे कुणाला लक्षात येणार नाही माझ्या वागण्यातून. आय वुड बी ॲज डिस्टंट ॲज एनी अदर पर्सन टू यू. उगाच तुला वाटेल ही अशी काय वागतेय.. पण डिप्लोमसी रूल्स पाळावे लागतील मला तिथे!"

"पाळ की! पण तू येतेस आयॅम हॅपी! आणि तेवढयासाठी आलीस?"

"यस. तुला वाटेल ही अशी विचित्र का वागतेय?" "आणि तूही जास्त ओळख दाखवू नकोस.."

"ओके मॅम. ॲज पर युवर ऑर्डर! आलीस तर कॉफी पिऊन जा.."

"आय वुड लव्ह टू.. पण निघते मी. खूप काम बाकी आहे यार. संध्याकाळी भेटू.."

"यस. अँड कम एम्प्टी स्टमक.. माझ्या आईच्या हातचे जेवण खाऊन बघ. शी इज ॲन अमेझिंग कुक.."

"ओके.. डिअर. धिस केटरींग पर्सन विल्बी डेफिनेटली इंटरेस्टेड.. सी यू."

ती निघून गेली. मला गंमत वाटली तिची. तिचे टायटनवरचे असणे म्हणजे काही वेगळे असावे असे तिला वाटतच नव्हते की ती ते दाखवत नव्हती. तसे नसावे. तिच्या वागण्यात एक पारदर्शीपणा होता. नाहीतर ती अशी फक्त एवढेच सांगायला आली नसती वेळ काढून.

संध्याकाळी ते टायटॅनियन आले घरी. त्यांच्याबरोबर ब्रुनीही. आईने स्वतः खास बनवलेले महाराष्ट्रीय पद्धतीचे जेवण. अगदी पुरणपोळी, कटाची आमटी, अळूवडी आणि डाळिंबी! त्या शिष्टमंडळात तीन जण अजून होते. सारेच वागण्यात अतिशय नम्र. अतिशय मृदू स्वभाव सगळयांचा. मला ब्रुनीच्या मृदू हातांची आठवण झाली. हा मऊपणा स्वभावातून येत असेल का हातात? चापून जेवणखाण करून नि जेवणाची स्तुती करून सारे निघून गेले. डिनर डिप्लोमसी प्रकार चांगला दिसतोय. जेवायला मिळणारी कुठलीही गोष्ट चांगलीच म्हणावी की नाही? आणि तिथे ब्रुनी स्वतः असावी! म्हणजे दुधात साखर. ती होती तेव्हा मी जास्त न बोलता तिच्याकडे पाहात राहिलो. तीहीमध्येमध्ये कटाक्ष टाकत राहिली. आजवर जेवढे बोलले नसू तेवढे त्यादिवशी न बोलता बोलले असू. म्हणजे हे जाणवले आम्हाला दोघांनाही पुढच्या वेळी आम्ही भेटलो तेव्हा. म्हणजे आई एक गाणे लावून बसते त्यात एक आहे.. 'शब्दांवाचून कळले सारे .. शब्दांच्या पलिकडले' तसे झाले खरे.

या डिनर डिप्लोमसीने अजून एक गोष्ट घडली.. जी मला रॉबिनने नंतर भर मध्यरात्री सांगितली.

मी पाय पसरून पडलेलो.. अर्धा झोपेत. आजच्या दिवसाचा रिकॅप पाहात. सिनेमात एक बरे असते, रिकॅपची सोय असते. फ्लॅशबॅक्स.. पण एकदा गेलेले क्षण .. ते नाही परत येत. माणूस कितीही प्रगत झाला तरी वेळेच्या मागे जाऊ शकत नाही नि पुढेही.. बाकी टाइम मशीन वगैरे नुसते विज्ञान कथांच्या विषयापुरता. तर असला मनातल्या मनात ब्रुनीला पाहात होतो.. तर हा आला..

"अंबर ब्रो, गेस न्यूज काय आहे?"

"अरे भर रात्री दोन वाजता न्यूज?"

"अरे बातमीच अशी भारी आहे म्हणून आलो.."

"काय? क्युरी हो म्हणाली ..?"

"यू आर व्हेरी नियर टू द सबजेक्ट यार.."

"ओह! मग रॉबिनभय्या कधी उरकताय शुभमंगल.."

"शुभमंगल? मला त्या मशीनीत तुझ्या बोलण्याचा अर्थ शोधण्यात वेळ नाही घालवायचा.. ऐक.. मॅडम हॅज गिव्हन ग्रीन सिग्नल .."

"कशाला?"

"तू आणि सायली..!"

"साय..ली? ती कुठून टपक..ली मिस्टर रॉबिन ली?"

"मला काय ठाऊक. त्या आता म्हणाल्या.. लवकरच बात आगे बढाई जाए!"

"टेन्शन यार!"

"का? ब्रुनी फायनलाइज्ड?"

"चूप.. तुला ठाऊक आहे. अजून काही नाही पण आय नीड टाइम बाबा. हे असे कुठलीही पोरगी पटवणे सोपे नसते बाबा. वेळ लागतो. तुला काय.. तू आणि तुझी मॅडम क्युरी.. काय बातमी आणतोस रे.. झोपमोड्या आहेस तू.."

"हुं.. झोप तर उडेलच तुझी पुढे ऐकलेस की.."

"बाप रे. अजून काय?"

"अजून .. जस्ट रिप्लेस द नेम सायली फॉर समवन विथ नेम स्टार्टिंग विथ बी.."

"ब्रुनी?"

"यस माय फ्रेंड. मॅडम म्हणाल्या, ही ब्रुनी एकदम आयडियल आहे अंबरसाठी.."

"गधड्या.. यू मेड मी स्कीप फ्यू हार्टबीट्स.."

"रॉंग इंग्लिश डिअर.."

"सोड. आई काय बोलली सांग ना.."

"म्हणजे ब्रुनी स्तुती? ब्रुनी चालिसा? की ब्रुनीची आरती?"

"रॉब .. यू आर ग्रेट. आणि ही बातमी खरीच आहे ना? की लपेट?"

"भरपेट खानेवाले लपेट नहीं मारा करते ब्रदर .. मॅडम म्हणाल्या, अशी मुलगी असेल तर अंबरची नैया पार होईल. नाहीतर वेंधळा आणि बावळट आणि धांदरट आहे तो.. ब्रदर, व्हॉट्स द मिनिंग ऑफ वेंधळा आणि ते बाकी ॲडजेक्टिव्हस?"

"गप रे रॉब. एवढी चांगली बातमी आणलीस, तुला शिव्यापण नाही घालू शकत.."

थोडक्यात हे असे झाले. त्या टायटॅनियन्सनी मार्ग मोकळा करून दिला. आणि आता मिशन ब्रुनी फक्त आईची इच्छा पूर्ण करण्यासाठी. आहेच मी तसा मातृभक्त श्रावण बाळ!

पण एकूण सारे पाहता एक खूपच जुना सिनेमा आठवला. त्यात शाहरूख खान नामक तेव्हाचा सुपर स्टार म्हणतो, 'जब कोई किसीको दिलसे चाहता है तो सारी कायनात जुट जाती हैं उन्हें मिलाने!' इकडे कायनात म्हणजे पृथ्वी.. तिचा चंद्र .. आणि शनि आणि त्याचा चंद्र एकत्र आलेले दिसत होते! एकूण ग्रहमान अनुकूल दिसत होते!

## १६

## *पुन्हा पुन्हा ब्रुनी!*

आता गोष्ट बरीच पुढे सरकली होती. विशेषतः ब्रुनी घरी आली न आमचे जे नेत्रकटाक्ष एक्सचेंज झाले त्यामुळे तर आम्ही अजून जवळ आल्यासारखे मनातून वाटत होते मला, काहीही न बोलता. तिलाही ते तसे वाटले हे मला नंतर कळाले. म्हणजे रॉबिन म्हणतो तशी आग दोन्ही बाजूंनी लागलीय तर..

ब्रुनी आणि ते टायटॅनियन्स निघून गेले त्या दिवशी. पुढे दोन तीन दिवस असेच गेले. ब्रुनी बिझी असावी. मला पण ऑफिसच्या रूक्ष हिशेबांत हे दिलाचे हिशेब मांडायला वेळ नाही मिळाला. मग एके दिवशी दुपारी वेळ मिळाला मला. आजवर ब्रुनीच इकडे येत होती मला भेटायला. आता माझी पाळी .. मीच देईन टाळी!

तिच्या ऑफिसात पोहोचलो मी. फोन न करताच. म्हटले सरप्राईज द्यावे .. तर ती माझ्याच ऑफिसात गेल्याचे कळले! दोघांनी एकमेकांना एकाचवेळी एकच सरप्राईज द्यावे? व्हॉट अ कोइन्सिडन्स! मी फोन लावला तिला.. म्हणालो,

"डिअर, वेट इन माय ऑफिस.. आयॅम कमिंग!" मी तुझ्याच ऑफिसात गेलोय हा तपशील टाळत!

ब्रुनी माझ्या केबिनमध्ये बसलेली. तशीच सुंदर दिसत होती ती. माझ्या छातीतली धडधड अचानक वाढली तिला पाहून ..

"जस्ट रीच्ड डिअर?"

"हो. खूप दिवसांत .. मी म्हणाले ना, तू आला नाहीस तर मला यावेच लागते ना ..?"

हीच ती वेळ तिला सांगायला हवे मी पण तिला भेटायलाच गेलेलो.. पण नाही सांगितले मी. मूळ स्वभाव कसा बदलणार?

"कशी आहेस?"

"मी मस्त. बिझी होते. आमची टायटॅनियन टीम गेली कालच परत. म्हणून आज मोकळी झाले. आणि आय वॉज इगर टू मीट यू."

"यस.. मी टू. पण म्हटले तू बिझी असणार."

"अरे, त्या दिवशी बोलता नाही आले आपल्याला.. जेवण फारच सुंदर .. अप्रतिम!"

"हो ना! माझी आई जेवण बनवतेच तसे. बोटे चाखतात खाणारे."

"आय वुड लाइक टू लर्न फ्रॉम हर.. व्हॉट कुकिंग! वॉव!"

"शिकवेल ती तुला.. घरी आलीस की!"

माझ्या मते मी तिला खूपच मोठी हिंट दिली!

"अरे, आमचे टायटॅनियन एवढे खूश झाले सांगू. अँड युवर पेरेंट्स आर सो नाइस.."

"थ्यांक्स.."

"नो वंडर.."

"काय?"

"काही नाही .."

"बोल ना.."

"आय मीन नो वंडर यू आर ऑल्सो सो नाइस.."

मी दीर्घ श्वास घेतला एक.. आणि तिच्या डोळ्यांत पाहात म्हणालो, "ब्रुनी माय मदर लाइक्ड यू सो मच! आजकाल पृथ्वीवर अशा मुली दिसत नाहीत जास्त .."

"अशा म्हणजे?"

"ब्युटी विथ ब्रेन अँड वेल नेचर्ड अँड.. आय रन आऊट ऑफ ॲडजेक्टिव्हस् डिअर.."

"ओह!" ती लाजत म्हणाली .."ॲक्चुअली आय हॅव टू टेल यू समथिंग.."

"बोल ना.."

"इथे नाही. लेट्स् मीट समव्हेअर एल्स.."

"दॅट गार्डन? आर्टिफिशियल वन?"

"चालेल ..आर्टिफिशियल गार्डन .. बट नो आर्टिफिशियल टाॅक.. आज संध्याकाळी .."

संध्याकाळी भेटलो आम्ही. त्याच गार्डनमध्ये.

येतायेताच म्हणाली ब्रुनी, "हे.. यू डिडन्ट टेल मी.. तू माझ्या ऑफिसात मलाच भेटायला गेलेलास मी आले तेव्हा .."

"यस डियर. तुझाच विचार करत होतो.."

"मग बोलला नाहीस तो?"

"तुला खरं सांगू,  खूपशा गोष्टी न सांगता जास्त कळतात .."

"तेच सांगायचेय मला तुला डियर.. त्यादिवशी तुझ्या घरी आले ना, आपण बोललो नाही काहीच जास्त .. पण आय थिंक आय नो यू बेटर आफ्टर दॅट.."

"मी तुला एक सांगू..?"

"बोल.."

"हेच.. तू त्यादिवशी येऊन गेलीस नि आय थिंक यू आर व्हेरी क्लोज टू माय हार्ट .."

"हुं. हेच मला तुला पण सांगायचं होते डियर.."

"थ्यांक्स डियर.."

"नाऊ यू आर ब्रेकिंग द रूल .. नो थ्यांक्स इन फ्रेंडशिप.."

"तसे नाही गं.. तू मला इथे बोलावलेस ना.. स्वतः .. म्हणून!  नाहीतर मला हे असे जमले नसते.."

"ओके.. आय अंडरस्टँड अँड ॲक्सेप्ट युवर थ्यांक्स.. आय थिंक इट्स हाय टाइम वुई मीट ॲट माय होम.."

"यस डियर.. छेडो दिलके तार विथ गिटार. यू नो ब्रुनी.. पहिल्यांदा पाहिले ना तुला तेव्हाच तू मला आवडलीस. यू आर टू गुड यार.. इट वॉज लव्ह ॲट फर्स्ट साइट .."

"वॉज?"

"हा! हा! रॉंग इंग्लिश .. पण भावनांकडे बघ.."

"बघते.. पण सेम हिअर डियर.."

"पण मग ते एकदा तू म्हणालेलीस.. आय डोन्ट फरगेट क्लायंट्स.. ते?"

"वेडा आहेस तू.. साध्या गोष्टी नाही कळत तुला.. तिथे अजून कुणी असताना मी काय बोलणार होते? आय थिंक बॉइज आर बॉर्न विथ लेस ब्रेन्स, आय मीन अक्कल ..आणि तू त्याचे उदाहरण आहेस जिवंत!"

"बोल! बोलून घे आता.."

"बट यू आर टू क्यूट अंबर.. आयॅम सो हॅपी.."

"विथ लेस ब्रेन? एनी वे तुझ्याहून मोठा मेंदू मला नाही वाटत कुणाचा असेल."

"बोलून घे तू आता.. मग कधी भेटायचेय?"

"एनी डे.."

"शनिवार?"

"डन .."

आधीच चंद्रावर तरंगत चालावे लागते त्यात अजूनच तरंगत पोहोचलो घरी मी. ब्रुनी बरोबरची ती संध्याकाळ आयुष्यभर न विसरण्यासारखी. घरी आलो तर रॉबिन माझ्याकडे पाहून हसत होता.

रात्री आला माझ्याकडे नि म्हणाला,

"सो.. कधी छेडतोयस दिलके तार विथ गिटार?"

"तुला काय ठाऊक?"

"या रॉबिनला सारे काही ठाऊक आहे ब्रदर अंबर, आजची त्या गार्डनमधली मुलाकात.. नि शनिवारी परत भेटणे.. आय नो इट ऑल.."

"तू काय जासूसी करत होतास बागेत?"

"नो ब्रो.. आय वॉज ट्राइंग टू डू व्हॉट यू यार ट्राइंग टू डू.. तू जे करतोयस तेच करायचा प्रयत्न .."

"म्हणजे?"

"सिंपल.. मी तेव्हा त्याच गार्डनमध्ये होतो.."

"कुणाबरोबर? "

"क्युरीबरोबर.."

"दिसला नाहीस तू?"

"तुझे लक्ष असेल तर दिसेल ना कुणी तुला.. ब्रुनी असताना काय.."

मी त्याला आयती दिलेली विकेट तो थोडीच सोडणार होता.. म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष करीत म्हटले,

"तू? आणि क्युरी?"

"यस्स.. तुझ्यामुळे यू नो.. लव्ह इज इन द एअर.. मी माझ्या प्रोग्रामिंगमध्ये बदल करून घेतला.. टू लाइक रादर टू लव्ह समबडी.. मग त्या नजरेतून मला आवडायला लागली क्युरी.. म्हणून तिला म्हटले बागेत बोलवावे."

"ओह! सो यू इन सेम बोट?"

"रॉंग इंग्लिश डिअर.. पण नाही, क्युरीकडे असा प्रोग्राम नाही .. मी तिला म्हटले, क्युरी आय लाइक यू व्हेरी मच.."

"मग ती काय म्हणाली?"

"ती म्हणाली, लाइक? म्हणजे काय? म्हणून तिने मशीनीत चेक केला शब्द तो.. तिला काय कळणार व्हॉट इज लव्ह.. मला पण नसते कळले तू नसतास तर.."

"आता?"

"आता काय? तुझ्यामुळे चावला मला हा लव्ह बग!"

काय गंमत आहे नाही .. आपल्या गावरान भाषेत याला इश्काची इंगळी म्हणतात नि हा रॉबिन त्याला लव्हबग म्हणतोय. थोडक्यात पृथ्वीच्या पाठीवर .. किंवा तिच्या बाहेरही जा कुठे.. ह्या प्रेम प्रकरणांचा कीडा सारखाच दिसतोय!

"मग आता पुढे काय?"

"तो प्रोग्राम डिलिट करणार मी!"

"नो! अरे.. लव्हबग असा तसा जात नाही.. महा चिवट असतो तो. आता तुझा काढण्याऐवजी तोच क्युरीमध्ये टाकायचा प्रयत्न कर रॉब!"

"यस्स.. दॅट्स बेटर! बघतो जमतेय का!"

"वा! तू अगदी फास्ट इव्हॉल्व होतोयस.."

"सारी कृपा तुझीच बरे.. आणि त्या बदल्यात मी ही केलीय एक कृपा.."

"कसली?"

"तुझी ती गिटार .."

"व्हॉट अबाऊट इट?"

"रघुवीर सरांचा फोन आलेला. तुला ती हवीय म्हणून .."

"वा! आणलीस गिटार?"

"यस्स.. होम डिलिव्हरी!"

"थ्यांक्स!"

"पण होम कुठले ते नाही विचारलेस?"

"का?"

"अरे, ट्रस्ट धिस फेलो.. तुझी गिटार ब्रुनीच्या घरी देऊन आलो मी!"

"तू? तुला कोणी सांगितले?"

"कुणी कशाला सांगायला हवे? मला माहितीय.. तू आणि ब्रुनी .. ॲन इव्हिनिंग विथ गिटार! मी म्हणालो रघुवीर सरांना.."

याने शनिवारचे काही सांगितले तर नाही ना.. भीती वाटत मी ओरडलो.. "काय?"

"हेच.. गिटारच्या प्रोग्रामला बोलावू जरूर .."

"शनिवारी?'

"नो डियर, नो हड्डीस इन कबाब.. नंतर केव्हा तरी. तसा मी हुशार आहे. मी सांगितलेय त्यांना, यू नीड टू प्रॅक्टिस .. एखादा महिना तरी!"

"रॉबिन्या, रोबो नसतास तर मुका घेतला असता तुझा.."

"फक्त एक .. तुझ्या गिटार प्रोग्रामला या फ्रेंडला बोलवशील ना?"

"चूप .. आता रॉबिन भाऊ.. शहाण्यासारखे जाऊन झोपी जा.. आणि शनिवार इज अ टॉप सीक्रेट .."

"ओके अंबर ब्रो.. गुडनाइट .. स्वीट ड्रीम्स"

"गुडनाइट .. स्वीट ड्रीम्स ऑफ क्युरी टू यू टू!"

लव्ह इज इन एअर.. गाणे गात रॉबिन गेला..

रॉबिन म्हणजे रॉबिन आहे. तो आहे म्हणून किती आयुष्य सुसह्य झालेय इकडे. आता तो ही हे प्रेमाचे प्रयोग करणार की काय? व्हाय नॉट! नेक्स्टेस्ट जेन ह्युमनॉईड्स!

आजच्या दिवसाचा आढावा घेत झोपलो. कॅमेरासारखे मन असायला हवे.. त्यात सारे रेकॉर्ड करून ठेवता यायला हवे.. म्हणजे आपल्या नातवंडाना दाखवयाला बरे.. नातवंडे .. पतवंडे! ती पण या चंद्रावर की पृथ्वीवर? की टायटनवर? हा प्रश्न कठीण होता.. तो ऑप्शनला टाकून मनातल्या मनात गिटारचे कॉर्ड्स हाताळत झोपी गेलो.. रिहर्सल म्हणा! शनिवारी वाजवायची गाणी.. स्पेशली फॉर ॲंड ओन्ली फॉर माय डियर ब्रुनी!

१७

## *जुळले सूर..*

रस्ता आता सरळसोट दिसत होता. मी आणि ब्रुनी .. तिला ही मान्य आहे.. माझा तर प्रश्नच नाही .. घरून माझ्या तरी काहीच प्रॉब्लेम नाही. तिच्याकडे? देवास ठाऊक, पण कॅन बी मॅनेज्ड. आता फक्त तिला गिटारीवर तिच्यासाठी म्हणून खास गाणी वाजवून दाखवणे.. आणि हिंदीत म्हणतात ना तसे चुपकेसे तिच्या दिलमें उतरणे! म्हणजे आधीच उतरलोय पण अजून ठाण मांडून बसणे! म्हणजे मुक्काम ठोकणे!

माझे काय.. ती आधीपासूनच बसलीय माझ्या दिलमें.

शनिवार संध्याकाळ ही अजून एक आठवणीत राहिल अशी मंतरलेली संध्याकाळ असणार .. मी ती आणि माझ्या गिटारीचे सूर. त्यातून सारी प्रेमगीते ऐकवणार मी तिला..

मी गेलो तर ब्रुनी वाटच पाहिल्यासारखी बसलेली लाल रंगाच्या गाऊनमध्ये. आधीच सुंदर ती.. त्या लाल रंगात अजूनच छान दिसत होती. ब्रुनीचे घर म्हणजे एक विस्तीर्ण तंबू होता. आत प्रशस्त खोल्या.. समोर एक झोपाळा. आजूबाजूला छोटी छोटी झाडे. काही फुलांची. एकाला तर चक्क लाल गुलाब लागलेले टपोरे.

"हॅवन, हा अंबर.. माय स्पेशल फ्रेंड.."

हॅवन पुढे आली नि तिच्या थंडगार हाताने हस्तांदोलन करून उभी राहिली.

"अंबर, ही हॅवन. माय कॅंपॅनियन.. फ्रेंड. ही आमच्या टायटनवरची खास ह्युमनॉईड आहे.

"ओह!"

"किती स्पेशल असावी? तुला गंमत सांगते, मी इकडे आले ना तर तिच्यात माझ्या मम्मीने आईचा स्पेशल प्रोग्राम टाकून घेतलाय. इफ आय वाँट माय मदर अराऊंड एनी टाइम .. तो प्रोग्राम रन केला ना की अगदी ममासारखी वागते ती.."

"ओह!"

"आणि आज मी तो प्रोग्राम मुद्दाम बंद करून ठेवलाय डियर!" ती थोड्या खोडकरपणे म्हणाली .. मला कळलेच ते. मी तरी कुठे आईला सांगून आलोय इथे?

"ओह.." पुढे थ्यांक गा ॅड म्हणणार होतो मी!

"ही माझी खास मैत्रीण आहे लाइक युवर फ्रेंड रॉबिन. हॅवन, कॉफी आणशील?"

"यस मॅडम. मी आणते."

"हिला पण सगळ्या भाषा येतात?"

"अरे नाही रे. तू भेटलास ना.. त्यानंतर मी मराठी फीड केली तिच्या प्रोग्राममध्ये. वुई टायटॅनियन्स स्पीक डिफरंट लॅंग्वेज देअर. मी इथे आले ना तेव्हा शिकले इंडियन भाषा. त्याशिवाय इतरही जगातील भाषा शिकले मी."

"हो ना भाषा उपयोगी पडतात .."

"खरंय.. डियर. तू भेटलास नि आय ॲम कन्विन्सड.. भाषा उपयोगी पडतात.. बरे झाले शिकले मी मराठी .. तुला सांगू, आम्ही लोकांनी पृथ्वीचा अभ्यास केला. मग भाषा शिकलो. लंग्वेज कनेक्टस इन्स्टंटली.."

"खरेय तुझे ब्रुनी .."

हॅवन कॉफी घेऊन आली. समोर मग ठेवत म्हणाली, "ब्रुनी डियर, कॉल मी व्हेन नीडेड. मी आत आहे."

पाहिलंस किती समजूतदार आहे ही.. मला वाटले असे काही म्हणेल ब्रुनी ..

"नाइस हाऊस यार.."

"हुं. थ्यांक्स.. आणि ही झाडे खरीखुरी आहेत.. आमच्या टायटनवर हे टेक्निक आहे. माय फादर इन्व्हेंटेड इट.. बाकी तुला झाडे नाहीत दिसणार इकडे चंद्रावर."

"वॉव ग्रेट यार.. तेही रेड रोज!"

"यस, रोजेस, फ्रुट्स अँड ऑल.. ही इज अ ग्रेट सायंटिस्ट."

"ते नाही आले कधी इकडे?"

"येऊन गेले.. ही वॉज अ पार्ट ऑफ टायटॅनियन डिप्लोमॅटिक मिशन. कॉफी इज गुड?"

"होय.. एक्स्ट्रा शुगर.."

"मला ठाऊक आहे ते.."

"कसे काय?"

"तुझ्या घरी आलेले मी.. तेव्हा ऐकले मी.. म्हणजे रॉबिन म्हणाला ना.."

"बरेच बारकाईने लक्ष होते म्हणायचे.."

"हुं.. माझे दुसरीकडे कुठे लक्षच नव्हते ना.. तुला सांगू त्यादिवशी न बोलता आपण जे बोललो ना.. आय रियलाइज्ड .. अंबर.. दॅट यू आर द वन.. आय रियली फील लकी टू हॅव मेट यू.."

"सो यू टायटॅनियन्स बिलिव्ह इन लक?"

"सॉर्ट  ऑफ.. बोलण्याची पद्धत असते एक.. पण बघ ना, थेट पृथ्वीवरून तू इथे आलास काय नि आपण भेटलो काय.. हे सारे तसे घडणे कठीण वाटत नाही तुला?"

"खरंय तुझे..आणि आयॅम ऑन क्लाऊड नाईन ..नाऊ."

"मी टू.. थ्यांक्स टू यू अंबर.."

"तुला गंमत सांगू .. आमच्याकडे ना हे सगळे मुलांना करायला लागते.."

"हे सगळे म्हणजे?"

"म्हणजे हे सगळे सांगणे नि मग ही हॅज टू प्रपोज टू द गर्ल.. बेन्डिंग ऑन द नीज.. तुमच्याकडे बरेय ब्रुनी .. गर्ल्स टेक द इनिशिएटिव्ह.."

"नो नो.. अंबरबाबू.. चुकताय तुम्ही. आम्ही काहीच वेगळे नाही बरे या बाबतीत तरी .. बॉइज स्टिल हॅव टू प्रपोज, पण काही वेळा रूल्स हॅव एक्सेप्शन्स .. रादर करावे लागतात अपवाद परिस्थितीनुसार.."

"म्हणजे .."

"म्हणजे वाघाचे पंजे! आय हॅव बीन वॉर्नड.."

"कशाबद्दल?"

"तू आणि तुझा शायनेस.. बाय हर हायनेस.. "

"कोण?"

"दॅट यू गेस.. मी नाही सांगणार ते.. पण मग मी ठरवले मला असेच म्हातारी होईपर्यंत थांबायचे नसेल तर मलाच हलवायला हवेत हातपाय .. म्हणून.. पण माझी अजून अपेक्षा आहेच..

मला एक राजकुमार येऊन मागणी घालेल गुलाबाचे फूल देत.. मी लाजत त्याला हो म्हणेन नि घोड्यावर बसून मी जाईन त्याच्याबरोबर.."

"हे ब्रुनी .. तू काय अमर चित्रकथा वाचायचीस की काय? पण तुला सांगू .. इट्स इझी टू प्रपोज व्हेन वन नोज द आन्सर.. म्हणजे पेपर फुटतो ना परीक्षेत तसा.. त्यामुळे मी करीन तुला प्रपोज.."

"डियर अंबर, तू ॲझ्युम करतोयस माझे उत्तर .. "

ती खट्याळपणे हसत म्हणाली.

"बघ तुझ्या रॉबिनने गिटार आणून ठेवलीय.."

"रॉबिन ना.. दीड शहाणा आहे तो.. शुड आय प्ले नाऊ..?"

"व्हॉट्स द टाईम? ओह.. थांब. ये तुला काहीतरी दाखवते.. "

तिच्या मागे मी आत गेलो. तंबूत एका पारदर्शक खिडकीजवळ टेलिस्कोप होता मोठा.. त्याच्यातून तिने पाहिले .. आणि म्हणाली, "बघ."

मी वाकलो पहायला ..

पाठून तिची कॉमेंट्री सुरू झाली..

"तो दिसतोय ना तो टायटन.. माय होम.. इकडे आले मी, पण रोज माझ्या घरची आठवण येते.. मी रोज संध्याकाळी पाहते यातून .. तिकडे आता दिवस उगवत असतो ना.. हा टेलिस्कोप आम्हीच डेव्हलप केलाय. आहे मोठ्या रिझोल्यूशनचा. त्यामुळे तुला तिकडची घरे, रस्ते वगैरे दिसत असतील. इतक्या अंतरावरून सुद्धा."

"खरेय गं. दिसताहेत सगळे.."

"अरे थोड्या अजून मॅग्निफिकेशनची बनवली ना दुर्बिण तर माणसं पण दिसू शकतील. माय फादर इज वर्किंग ऑन इट!"

"ओह! ग्रेट."

"यातून दिसतेय ना तेच माझे गाव. अ‍ॅज सच टायटन इज वन कंट्री. पृथ्वीसारखे देश नाहीत तिकडे. ही जागा अशी शोधलीय ना टेलिस्कोपची की तिकडून आमचे गाव दिसेल."

"वा! असे काही असेल तर इकडून पृथ्वीवरचे पण दिसायला हवे!"

"यस्स .. आणि ते अंतर तर टायटनहून खूपच कमी आहे.. पण जस्ट अ वॉर्निंग.. तसा प्रयत्न करू नकोस कधी. पृथ्वीवरच्यांना ते आवडत नाही .. रादर दे फील अनसेफ.."

"व्हाय?"

"ते जाऊ देत.. पाहिलंस ना गाव माझे .. तोमध्ये रस्ता दिसतोय ना त्याच्या एका कडेला घर आमचे.. अजून चांगली दुर्बिण मिळाली ना तर आईला पाहू शकेन मी. रोजच!"

"आणि युवर फादर?"

"हुं.. इफ ही इज आऊट ऑफ हिज लॅब एव्हर!"

"पण तू त्यांच्याकडेच शिकलीएस ना?"

"यस्स. जेनेटिक इंजिनियरींग, अ‍ॅस्ट्रोबायोलॉजी.. वगैरे."

"छानच दिसते तुझे गाव."

"आहे ते तसे. अख्खा टायटन तसा सुंदर आहे. बघशील तू एकदा.."

"हुं.. असा सुंदर असेल टायटन तर टायटॅनियन पण तशीच असणार ना?"

"सो क्यूट  ऑफ यू अंबर.. थांब. मला एकदा पाहू देत.. मग आपण जाऊयात."

ती दुर्बिणीतून पाहात होती शनिच्या चंद्राकडे आणि मी पाहात होतो जवळून या चंद्रमुखीला!

आम्ही आलो परत नि ती झोपाळयावर बसली..

"चल सुरू कर तुझी गिटार .. आज मन भरेपर्यंत ऐकणार मी.."

"यस्स डियर.. मी थोडे प्रेझेंटेशन तयार केलेय.. इट विल हॅव सम टाॅक इन बिटवीन.. आणि मूळ गाणे ऐकवीन तुला.. "

"यस.. मी ऐकतेय .."

मी खरेतर काहीच ठरवू शकलो नव्हतो. ब्रुनी  दुर्बिणीत बघताना मलाच ती चंद्रमुखी वाटलेली. त्यावर मी माझे उत्स्फूर्त प्रेझेंटेशन सुरू केले..

"डियर ब्रुनी, आमच्या येथे म्हणजे पृथ्वीवर चंद्र हा सौंदर्याचे मोजमाप आहे. पृथ्वीच्या वरून दिसणारा चंद्र.. शीतल.. कलेकलेने वाढणारा नि घटणारा.. कुठल्याही प्रियकराला त्याची प्रिया प्रथम चंद्रासारखीच वाटते.. आता तू मला वाटलीस तशी.. चंद्रमुखी! किंवा कोणाला प्रियतमा हवी असेल तर त्याच्या तोंडून ही हेच शब्द येतात .. चांद सी मेहबूबा हो मेरी कब ऐसा मैंने सोचा था.. "

त्यानंतर ते गाणे मी माझ्या मोबाईलवर चार ओळी ऐकवून गिटारवर सुरू केले..

गाणे संपले तसे तिने टाळया वाजवल्या.. उठून माझ्या बाजूला उभी राहिली ती..

"वॉव, ग्रेट यू आर!"

"थ्यांक्यू.. तर तूही तशीच आहेस .. तुला पाहून चांद आहे भरेगा.. फूल दिल थाम लेंगे.. आज ही मस्त हवा आहे.. मी तुझ्या शोधात पोहोचलो इथवर ..

म्हणत.. मेरे सपनोंकी रानी कब आएगी तू.. आई रूत मस्तानी कब आएगी तू.."

या गाण्यानंतर ब्रुनी खूश झाली फार..

मी पुढे सुरू ठेवली गाणी.. सगळी जुनीपुराणी गाणी म्हणजे भूले बिसरे गीत.. थोडी कॉमेंटरी.. थोडे गाणे नि मग गिटार वर धून.. त्यात मग 'जाने मन जाने मन तेरे दो नयन' झाले, 'तुमसे ओ हसीना जो मोहब्बत तो न मैंने करनी थी' झाले.. 'तोच चंद्रमा नभात.. तीच चैत्र यामिनी' झाले.. अजूनही काही गाणी वाजवली मी. ती माझ्याकडे कौतुकाने पाहताना मी तिलाच पाहात होतो.. वेळ कसा चालला होता ते कळत नव्हते.

"आता थांबू?"

"नो.. नॉट विदाऊट चुरा लिया.. "

"ओह! दॅट डेज' साँग.. तुला सांगू ब्रुनी, ते गाणे मी तुलाच पाहात तुझ्यासाठीच वाजवलेले.."

"आय नो!"

"हाऊ डू यू नो?"

"तुला आम्ही मुली इतक्या ढ वाटतो की काय? पण आज त्याला वन्स मोअर.. फ्रॉम मी.."

"ऑफकोर्स डियर .."

मी गिटारच्या तारांवर हात फिरवला.. 'चुरा लिया है तुमने जो दिलको.. नजर नहीं चुराना सनम.. बदलके मेरी तुम जिंदगानी.. कहीं बदल ना जाना सनम..'

"वॉव! यू आर सिंपली ग्रेट .."

"आणि नाऊ इफ इट्स ओके टू प्लक दॅट रोज .. प्लीज .."

"व्हाय..?"

ती हो म्हणण्याची वाट न पाहता मी पुढे होत ते लाल गुलाबाचे फूल तोडले नि गुडघ्यावर वाकून तिला ते देत म्हणालो, "डियर ब्रुनी, माझी होशील का?"

ती लाजली ..

आणि ..

काही बोलणार तोच तिच्या दरवाजावरची बेल वाजली ..

"हु'ज इट ॲट धिस टाइम?"

तिने दरवाजा उघडला तर दरवाजात एक कुणी केक घेऊन उभा..

"हा केक? कुणी पाठवलाय?"

"आय डोन्ट नो मॅडम. धिस इज द डिलिव्हरी ॲड्रेस .."

तिने तो केक हाती घेतला..

"इट मस्ट बी रॉबिन .. आय टेल यू.. रॉबिन.." मी म्हणालो .. "रॉबिनच असणार तो.. "

मी मोठ्याने म्हणालो तसा "यस सर" म्हणत रॉबिन आत आला..

"रॉबिन तू?"

पाठोपाठ कोण यावे? मिस्टर आणि मिसेस कांदळगावकर!

"टू अवर व्हेरी फर्स्ट मून कपल.. विथ बेस्ट विशेस.."

वर्षाने पुढे येत म्हटले नि रघुवीर माझ्याशी शेकहँड करायला पुढे आला.

"आणि तू .. तू प्रॉमिस दिलेलेस.. गिटार फॉर ऑल.. यू ब्रोक द प्रॉमिस अंबर.."

"काय हे वर्षा .. तुला कशाला बनायचे होते हराभरा कबाब में कढीपत्ता?"

"खरंय.. पण अरे, ऐतिहासिक क्षण आहे हा.. चंद्रावरची पहिली जोडी.. आणि पृथ्वी आणि टायटनवरचीही पहिलीच.. सेलिब्रेट तर करायलाच पाहिजे की नाही? आता गिटार वगैरे नंतर कधीतरी.."

समोर हार्ट शेपचा केक होता.. एका बाजूला मी आणि ब्रुनी .. समोर रॉबिन नि वर्षा नि रघुवीर ..

"हॅवन.. ये बाहेर.. तुझ्या मॅडमचा केक खायला.."

रॉबिनने जोरात हाक मारली तशी ती ही येऊन उभी राहिली ..

"सी हॅवन.. नाइस कपल नो? मी म्हटले होते तुला.. मुलगा चांगला आहे.. "

रॉबिनने हॅवनला ही सांगितलेले.. नि वर्षा नि रघुवीरला ही! फक्त माझ्या घरी सांगितलेले की काय ते ठाऊक नव्हते!

"काय हे रॉबिन, तू सगळ्या जगाला सांगत सुटलास.."

"यस डियर ब्रदर, माझ्या प्रोग्राममध्येच आहे हे.. डिस्ट्रीब्युट द हॅपीनेस.. हो की नाही हॅवन.."

"वा! उंदराला मांजर साक्ष .."

"म्हणजे काय..?

रॉबिन त्याच्या मशीनीत त्याचा अर्थ शोधायला लागला..

मग साग्रंसगीत केक कापणे झाले.. वर्षा नि रघुवीर ने ऑफिशियली अभिनंदन केले.. ते जायला निघाले तसा रॉबिन म्हणाला, "मी थांबू की जाऊ ब्रो?" आणि हसत तो निघून गेला ..

"व्हॉट ॲन इव्हिनिंग ब्रुनी .. अँड आय डीड प्रपोज. "

"हो.. बट आय हॅव नॉट यट आन्सर्ड.. इफ यू रिमेंबर सिक्वेन्स ऑफ इव्हेंट्स राईट.."

"ओह! सो?"

"आय वोंन्ट टेल यू.." ब्रुनी हसत म्हणाली.

"आता झोप उडवशील तू माझी ब्रुनी .."

घरी आलो. रॉबिन वाट पाहात होता. आई बाबा झोपून गेलेले. मला आश्चर्य वाटले. असे होत नाही कधी .. आईतरी जागी असतेच.. अगदी खूपच उशीर होणार नसेल तर.

"रॉबिन, आई कधी झोपली?"

"अरे, मीच सांगितले तिला.."

"काय?"

"जे झाले ते.. "

"म्हणजे?"

"म्हणजे जे झाले तेच.. "

"नीट सांग.. तू सांगितलेस नि ती झोपली?"

"अरे ब्रदर, रॉबिन नेव्हर लाइज, मी सांगितले खरे.. तुला इमर्जन्सी मिटिंग असल्याचे.. म्हटले मॅडम तो हिशेब मांडतोय तिकडे. उशीर होईल. आता नक्की कसला हिशेब हे मॅडमनी नाही विचारले मग मी कशाला सांगणार? ते त्या दिवशी म्हटले ना तसे.. काय ते.. नरो वा कुंजरोवा उत्तर दिले मी.."

"रॉब, यू आर अ डार्लिंग .. पण मग ते सारे रघुवीरला का सांगितलेस.."

"अरे ब्रो.. ब्रुनीबद्दल रघुवीरला मी नाही सांगितले .. ते सांगितले वर्षा मॅडमनी.. त्यांना आधीच अंदाज आला.. ते काय म्हणतात ना.. मांजर डोळे मिटून दूध पिते.. तिला वाटते कुणी बघत नाहीये.. पण दिसत सगळ्यांनाच असते ते.."

"बरं बरं.. खूपच शिकलायस भाषा.. पण आजची आमची भेट आणि केक..?"

"देअर आयॅम गिल्टी.. म्हणजे फक्त टाईम आणि व्हेन्यू सांगण्यापुरता.. केक मॅडमनी पाठवला .. खरेतर मॅडम नि सरांना म्हणजे तुझ्या आईबाबांना पण बोलावणार होतो आम्ही.."

"रॉबिन .. चावटपणा नकोय.. "

"नको तर राहिला.. झोप आता. येईल ना झोप की स्वप्ने पाहणार उघड्या डोळ्यांनी?"

"तू जा.. आणि पहा क्युरीची स्वप्ने .. गुड नाइट .."

मी झोपलो खरा पण विचित्र स्वप्न पडले.. कुठलेसे फंक्शन होते.. सारे जमलेले .. कुणीतरी भाषण करतेय.. वेलकम टू द मून कपल.. एक पृथ्वीचा चंद्र नि एक शनिचा चंद्र.. त्यात चंद्राहून सुंदर ही ब्रुनी .. ब्रुनी लाजतेय.. मी कौतुकाने पाहतोय.. समोर मोठाला केक आहे.. मग कुठून काय होतेय ते कळण्याच्या आत सायरन वाजतोय .. चार पोलिस येतात नि तो केक उचलून घेऊन निघून जातात .. मी झोपेतून जागा झालो घाम सुटून.. लक्षात आले.. हे स्वप्नच तर आहे.. सुटकेचा निश्वास टाकला नि परत झोपी गेलो..

१८

## *ब्रुनीची होम व्हिजिट*

सकाळ सकाळी उठलो.. सुट्टीचा दिवस माझा. कालच्या रात्रीतले सारे आठवत होतो.. नि मी ब्रुनीला माझ्याच नकळत फोन लावला .. अर्धवट झोपेत असावी ती..

"हाय ब्रुनी!"

"हाय.."

"स्टिल स्लीपी? झोपेत आहेस?"

"यस.."

"कालची संध्याकाळ किती छान गेली ना?"

"यस.."

"मी गिटार छान वाजवतो ना?"

"हो.."

"रॉबिन आणि हॅवन ग्रेट आहेत ना?"

"हो.."

"वाटत नाहीत रोबोसारखे.."

"हो ना.."

"केक पण छान होता.."

"हो ना.."

"रघुवीर आणि वर्षा आर ग्रेट .."

"यस्स.."

"मी तुला काल विचारलेला प्रश्न.. त्याचे उत्तर.."

"यस्स .."

"थ्यांक्स ब्रुनी .. आता तू म्हणू नाही शकत की मी प्रपोज केले नि तू उत्तर ही नाहीस दिले.."

"व्हॉट .. यू चीटर.. मला झोपेत पाहून तू असे करावेसे.. झोप मोडलीस माझी.."

"दॅट्स द ट्रिक .. पण तुझे उत्तर नसल्याने माझी झोप उडालेली त्याचे काय? तेव्हा तुझे उत्तर हवे तर.. याला गनिमी कावा म्हणतात डियर.."

"कावेबाज.."

"ऐक ना ब्रुनी .. कम ओव्हर टुडे टू माय होम.."

"आज?"

"यस्स .. लेट मी इंट्रोड्युस यू टू माय होम.. नाऊ दॅट यू हॅव ॲक्सेप्टेड माय प्रपोजल.."

"मी? कधी?"

"आताच ॲक्सेप्ट केलेस.."

"ते नाही स्टुपिड.. घरी कधी तुझ्या?"

"ब्रुनी .. आज.."

"पण मी आलेले आताच तर.."

"आलेलीस.. पण आता इन नॉन डिप्लोमॅटिक वे.. म्हणजे नुसती ब्रुनी म्हणून ये.."

"ओके.. संध्याकाळी."

"आणि उठ आता .. किती झोपशील?"

"नाही रे.. तू गेलास ना मग मी हॅवनचा मम्मी मोड सुरू केला.. एवढी महत्त्वाची गोष्ट आईला सांगायला हवीच ना? त्यात खूप उशिरा झोपले मी ना म्हणून.."

"मग काय म्हणाली आई तुझी?"

"ती खूश झाली खूप.. पण फक्त मुलगा थोडा अजून चांगला असता तर बरे झाले असते असे म्हणाली ती.. आणि तुला माहिती आहे.. ममा'स वर्ड आर सुप्रीम .. आता रे काय?"

"ब्रुने, तू चांगलीच जागी झालीयस.. पण तू आता शब्द फिरवू नाही शकत.."

"हा! हा! पण आई तसे खरेच म्हणाली ना.."

"एक काम कर.. तो मम्मी मोड बंद कर.. आणि फॉर हेवन्स सेक हॅवन मोड सुरू कर.. येतेस ना संध्याकाळी?"

"यस डियर.. येते."

"वेटिंग.."

हे सारे मी बोलत होतो नि रॉबिन माझ्या मागेच उभा होता.

"रॉबिन .."

"बोल ब्रो.. काय मदत हवीय?"

"मदत? मी तुला फक्त मदतीसाठीच बोलवतो की काय?"

"नाही .. पण आजच येणार ब्रुनी तर घरी तुझी बातमी फोडावीच लागेल .. त्यासाठी हू बेटर दॅन ओल्ड ट्रस्टेड आणि फेथफुल रॉबिन?"

"चोरून ऐकायची सवय वाईट ब्रदर रॉबिन .."

"ब्रो, उघड्यावर बसून प्रेमगप्पा मारणे चांगली सवय आहे? मी कधीपासून उभा आहे इथे आणि यू डिडन्ट इव्हन नोटिस .. आता ये पाया पडायला तेव्हा पाहातो.."

"रॉब, मला येऊन किती दिवस झाले रे इकडे?"

"व्हाय?"

"मला वाटते सहा महिने झाले सहज.."

"मग?"

"त्या सहा महिन्यात तू मराठीचा पंडित होण्याकडे मार्गक्रमणा करतोस असे वाटतेय .."

"जस्ट अ मिनिट .. मार्गक्रमणा.. नवा शब्द.."

तो मशीनीत शोधायला लागला..

"असेल.. तसेही असेल .. आणि तू? सहा महिन्यात काय काय केलेस.. पराक्रम .. त्यात हे ब्रुनी प्रकरण शेवटचे.. लास्ट स्ट्रॉ ऑन द उंट!"

तो हे बोलायला नि आई आत यायला एकच गाठ पडली..

"रॉबिन, हे ब्रुनी प्रकरण काय रे? ब्रुनी म्हणता ती तीच ना.. टायटॅनियन?"

"होय मॅडम .." रॉबिनने हळूच माझ्याकडे पाहिले. बहुधा माझे ब्रेन मॅपिंग करून अंदाज घेत असावा ..

"अरे, चांगली मुलगी आहे. तुला काय वाटते अंबर?"

"मला? मला काय वाटायचे आहे?"

"मग ते प्रकरण वगैरे काय म्हणत होता हा रॉबिन?"

"काही नाही .. त्याचे डोके फिरलेय.."

"हुं.. रॉबिनचे डोके कधीच फिरत नाही .. तो असे म्हणतोय म्हणजे पाणी मुरतेय नक्कीच कुठेतरी .."

"मॅडम एक सेकंद .." त्याने पाणी मुरतेयचा अर्थ पाहण्यासाठी मशीनीत डोके घातले..

"नो लिकेज मॅडम.. नो सिपेज.. आय चेक्ड .."

"अरे, पाणी मुरतेय म्हणजे भानगड काहीतरी वेगळीच आहे म्हणतेय मी रॉबिन .."

"हां.. भानगड.. म्हणाल तर ती आहे.."

"म्हणजे?"

"हा अंबरच सांगेल ना.."

"काय रे? हे ब्रुनी प्रकरण आणि भानगड काय आहे?"

मी एकाएकी ध्यैर्य गोळा केले .. मनातल्या मनात ब्रुनी स्मरण केले.. ब्रुनीकडे हॅवनचा मम्मी मोड बंद करायचा ऑप्शन आहे.. तो माझ्याकडे नाही. आई जर रागावली तर काही खरे नाही ..

पण तिने आधी ब्रुनीला सँक्शन केलेय.. म्हणजे तसा धोका नाही .. म्हणजे आता सांगून टाकू.. पण ऐन वेळी जीभ चिकटली माझी..

"काही नाही गं. उगीच याच्या अकलेचे एकेक तारे.."

"हो ना? मग ठीक. ब्रुनी खूप चांगली मुलगी आहे. मला आवडली ती. पण आता काही भानगड नाही म्हणतोस तर.. सायलीच्या घरी एकदा भेटते जाऊन .. तशी चांगलीय ती.. पण मला ब्रुनी आवडलेली.. एवढी हुशार मुलगी शोधून नाही सापडायची. सायलीकडे जायला तुला कधी वेळ आहे?"

"मॅडम, आज संध्याकाळी जाता येईल. हो की नाही अंबर? तसा फ्री आहे तो.."

"चालेल. रॉबिन एकदा फोन कर त्यांच्याकडे लगेच.. फिक्स करून टाक.."

"यस मॅडम.."

"रॉबिन, यस मॅडम काय..? आज नको.."

"कां कुणी येणार आहे?"

आता माझ्या धैर्याची परीक्षा आहे.. धीर एकवटून म्हणालो, "होय, आई आज संध्याकाळी ब्रुनी येतेय घरी!"

"कशाला? ते टायटॅनियन्स गेले परत.. तुझे बाबाच त्यांना सोडून आले स्पेस स्टेशनवर .."

"अगं ती तशी नाही येत आहे."

"मग कशी येत आहे?"

"जशी तुला हवी होती ना तशी .."

"म्हणजे मॅडम, ब्रुनी प्रकरण नावाचे प्रकरण ही आहे नि भानगडही."

"म्हणजे रॉबिन म्हणाला ते खरेय.."

"काय म्हणाला रॉबिन?"

"हेच, वरून साधी दिसणारी मुले आतून बदमाष असतात .. कशाचा थांगपत्ता लागू देत नाहीत .."

आई रॉबिनकडे पाहून हसत होती. मला वाटले रॉबिन ने कालच तिला सांगितले असणार म्हणून ती माझी वाट न पाहता झोपून गेली असणार.. काही असो, घरची आघाडी सांभाळली गेली या रॉबिनमुळे.

दोघांनी मिळून मला चांगलेच कात्रीत पकडले..

संध्याकाळी ब्रुनी आली घरी. दिवसेंदिवस ती मला अजूनच सुंदर वाटत होती. येताना ती स्वतः केक बनवून घेऊन आलेली..

"गुड इव्हिनिंग .." ब्रुनी आत येत म्हणाली ..

"हाय! ब्रुनी इज हियर.." रॉबिन जणू जगाला अनाऊन्स करत असावा असे बोलला.

आई आणि बाबा बाहेर आले.. नि मी ही.

ब्रुनी बसली.. तिच्या टायटनवरच्या गोष्टी ऐकवल्या तिने. आपल्या आईबद्दल सांगितले नि टायटनवरच्या एकूण रहाण्याखाण्याबद्दल. आईने आपल्या आईपणास जागत माझ्या बावळटपणाच्या नि धांदरटपणाच्या गोष्टी ऐकवल्या तिला.. दोघांनीही त्या गोष्टी ऐकताना एकमेकांना टाळया दिल्या! मग छान जेवण झाले. ब्रुनीने आईकडून चक्क रेसिपीस ऐकून लिहून घेतल्या.. दोघांच्या गप्पा रंगल्या खूप..

बाबा खरे बोलके आमच्यात पण ते जास्त काही बोलले नाहीत. त्यांना ब्रुनी पसंत नव्हती की काय कोणास ठाऊक? पण तसे नसावे. मुळातच ब्रुनीत न आवडण्यासारखे काय मिळणार होते त्यांना?

जाता जाता ब्रुनी आईला सांगून गेली, येईन परत..

मी म्हटले यावे तर लागेलच ना! ती गेली नि आई म्हणाली, "छान आहे ही मुलगी, आपल्याकडे नाही मिळणार अशी एखादी .. हो की नाही हो?"

"खरंय तुझे .." बाबा म्हणाले नि परत गप्प झाले..

बाबा गप्प गप्प का होते हे मला रात्री रॉबिनने सांगितले. म्हणजे माझ्या त्या स्वप्नात पोलिस येऊन केक घेऊन गेलेला तसे काही होणार काय?

रात्री मी बसलेलो. लोक डायरी लिहितात तसा मी दिवसाच्या शेवटी असा दिवसाचा मनातल्या मनात अगदी सचित्र आढावा घेतो. त्यात अर्थातच जास्त भाग ब्रुनीने व्यापलेला होता. इतक्यात रॉबिन आलाच. चेहऱ्यावर नेहमीचे हसणारे भाव नव्हते त्याच्या.

"हाय अंबर ब्रदर.."

"बोल. असा गंभीर का? एनी प्राॅब्लेम विथ युवर प्रोग्रामिंग?"

"नो डियर. ते मी ऑटो रिपेअर करून घेतो.. इट्स समथिंग टू वरी अबाऊट .."

"म्हणजे?"

"अबाऊट ब्रुनी .."

"काय? आणि कोण म्हणाले तुला? आई की बाबा?"

"सर टोल्ड मी.. धिस.."

"काय? ब्रुनी बद्दल?  पण ते तर म्हणाले ब्रुनी इज अ नाइस गर्ल.."

"ते खरेय. त्याबद्दल त्यांना नाही प्रॉब्लेम. ही इज वरीड .. इट्स डिप्लोमसी.. इंटरप्लॅनेटरी मॅरेज झाले नाही अजून कधी .."

"मग?"

"मग हे की, त्यांना नाही ठाऊक की दोन्ही देशातली सरकारे हे सर्व घडू देतील का?"

"म्हणजे?"

"अरे, नुसत्या इंटरनॅशनल लग्नांत किती कॉम्प्लिकेशन्स असतात. हे तर इंटरप्लॅनेटरी. इथे नुसतेच इंडियन गव्हर्नमेंट नाही तर बाकीचे पृथ्वीवरचे देश पण इन्व्हॉल्व्ह होतील. आणि त्यात काय होईल कुणीच सांगू नाही शकत.."

"म्हणून बाबा असे गप्प होते?"

"यस, ही इज वरीड.. पुढे कसे काय होणार? मॅडम म्हणाल्या त्यांना, प्रेमात कसली आलीत अशी बंधनं.. ती सर्वात शुद्ध भावना आहे.."

"मग?"

"सर म्हणाले, ते असेलही. पण डिप्लोमसीत हे कितपत अ‍ॅक्सेप्ट करतील कोणास ठाऊक.. मी तुला आज नव्हतो सांगणार हे, पण मलाच इतके टेन्शन आलेय ना.. आयॅम ऑल्सो वरीड अ लॉट. म्हणून तुला सांगायला आलो.."

"हुं."

"आणि तुला आठवतेय, तुला ब्रुनी बद्दल पहिल्यांदा बोलताना मी हेच सांगितले होते तुला.. कसे पार पडणार सारे कुणास ठाऊक.. मी पाहिलंय पृथ्वीवर असताना .. तिकडे लोक खूपच काय म्हणावे.. इनसिक्युअर असतात."

मला इथे प्यार की ताकत वगैरे डायलॉग आठवला. प्यार की कोई सीमा नहीं वगैरे आठवले.. पण या आंतरराष्ट्रीय की आंतरग्रहीय राजकारणात त्याची किंमत शून्यच असावी बहुधा. रात्र अशीच गेली विचारात. पुढे काय होणार?

ब्रुनीला बोललो नव्हतो मी हे अजून. कदाचित तिला आधीच माहिती असेल की काय? कोणास ठाऊक!

पुढचे काही दिवस मी नॉर्मली बोलत राहिलो तिच्याशी. ती पण तशीच तिच्या मंजूळ आवाजात बोलत राहिली. जणू काही होणारच नव्हते ..

आणि एके दिवशी जे होऊ नये ते झालेच..

१९

## *पहिले पत्र*

एके दिवशी सकाळी उठलो तर फॅक्स आलेला.. चांद्रभारत सरकारचा. बॉम्बच म्हणाना. तो ही माझ्या नावाने. इकडची सरकारी व्यवस्था थोडी वेगळी. त्यामुळे पत्र आलेले ते अगदी डिटेलमध्ये. पृथ्वीवरच्या सरकारांची पत्रे सरकारी भाषेत नि अगदी मोजक्या शब्दांत येतात. हे पत्र आपल्याकडे असते तर..

प्रति,

श्री. अंबर श्रीराम राजपूत,

विषय:

पृथ्वीवर परत पाठवणे बाबत

चांद्रभारत सरकारच्या आदेशानुसार आपणांस सरकार विरोधी कारवायांना अनुलक्षून आपणांस पृथ्वीवर परत का पाठवणेत येऊ नये या संबंधात सक्षम अधिकारी यांचेसमोर वरील पत्राचे दिनांकापासून दहा दिवसांत उत्तर देणेचे निर्देश वरील सरकार देत आहे. याची तातडीने अंमलबजावणी न झाल्यास आपणास पृथ्वीवर परत पाठवणेचे आदेश सक्षम अधिकारी यांचेकडून तातडीने देणेत येतील.

असे काही असते ते. पण इकडे सगळे मोकळे ढाकळे. त्यात आदेश वरचाच होता पण त्यामागची कारणे होती.. इतरही काही विवेचन होते. एकूण सरकारी पत्र कसे नसावे याचा नमुना होता तो.

त्याचा मूळ मजकूर इंग्रजीत होता..

आमच्या सरकारी गुप्तचत विभागातून आलेल्या अहवाला नुसार :

१. श्री. अंबर श्रीराम राजपूत, मूळ पृथ्वी निवासी, येथील चांद्रभारत देशात सध्या स्थायिक, यांच्या दैनंदिन हालचाली संशयास्पद आढळून आल्या आहेत. वरील व्यक्ती व परग्रहावरून चांद्रभारत देशात स्थानिक एका तरूणी वरचेवर दिसत असतात व भेटत असतात असे आम्हाला आढळून आलेले आहे.

२. सदर तरूणी श्रीम. ब्रुनी बर्नेटो ह्या मूळ टायटन वासिनी असून इंडो टायटन राजनैतिक वाटाघाटींनुसार चांद्रभारत देशात अस्थायी स्वरूपात वास्तव्य करून आहेत. त्यांचे श्री. अंबर श्रीराम राजपूत यांच्याशी मधुर संबंध असल्याचे आढळून आले आहे.

३. सदर संबंधांचे वैवाहिक संबंधात रूपांतर होणार असल्याची खात्रीलायक माहिती सदर कार्यालयाकडे आहे. परग्रहवासियांनी इकडील कुणाशी असे संबंध जोडणे हा इंडोटायटन राजनैतिक संबंधातील अलिखित आचारसंहितेचा भंग आहे. सदर संहिता अलिखित असून अशी कुठलीही घटना घडण्याची पूर्व कल्पना चांद्रभारत सरकारने केली नसल्याने त्या बाबीची नोंद नाही. परंतु पूर्वलक्षी आदेश व निर्देशांनुसार ही नोंद करण्यात येत आहे. तेव्हा श्री. अंबर श्रीराम राजपूत यांनी या आचारसंहितेचा भंग केल्याचे आढळून आले आहे.

४. टायटन आणि इतरही काही परग्रहवासी संस्कृती पृथ्वीवर येण्यास उत्सुक असल्याचे पृथ्वीवरील विविध देशांच्या ध्यानात आले आहे. त्यांच्या पृथ्वी प्रवेशास सगळया आंतरराष्ट्रीय पृथ्वी समुदायाने सदोदित विरोध केलेला आहे. चांद्रभारत व इतर चांद्रदेशियांनी याबाबत उदार धोरण ठेवत त्या संस्कृतींशी संबंध ठेवला आहे. असे असले तरी चंद्रावरील विविध सरकारे व देश यांची धोरणे पृथ्वीवरील देशांच्या धोरणाधीन असतात. आपल्या ह्या प्रकरणाचा सविस्तर उहापोह पृथ्वीवरील सरकारशी करण्यात आलेला आहे.

५. परग्रहवासी संस्कृती पृथ्वीवर येऊन येथील भूभाग व संस्कृती यांच्यावर कबजा करण्याची शक्यता आहे. हे मत पृथ्वीवरील बहुतांश देशांच्या सरकारांचे आहे. त्यामुळे आपला टायटनवासीशी संबंध हा आंतरग्रहीय कटाचा एक भाग असल्याचा निष्कर्ष आमच्या सरकारांनी काढला असून इतर पृथ्वीवरील देशांचे त्यास अनुमोदन आहे. त्या अनुषंगाने चांद्रभारत सरकारचे मत असे झाले आहे की टायटनवासी श्रीम.ब्रुनी बर्नेटो यांच्यासोबत पुढे संबंध वाढवणे हे पृथ्वी संस्कृतीस घातक पाऊल ठरेल. श्री. अंबर श्रीराम राजपूत यांचा वापर करून पुढेमागे पृथ्वीवर पाऊल टाकण्याचा टायटनवासियांचा डाव मुळापासूनच मोडून काढण्याचे निर्देश या सरकारने दिलेले आहेत.

६. त्या अनुषंगाने तत्संबंधीची माहिती टायटनवरील दूतावासास देण्यात आली आहे. श्रीम.ब्रुनी बर्नेटो  यांच्याबद्दल कारवाईचे निर्देश सदर दूतावासाने द्यावेत अशी मागणी करण्यात आलेली आहे.

७. वरील कारवाईस अनुलक्षून श्री.अंबर श्रीराम राजपूत यांस तातडीने पृथ्वीवर रवाना का करू नये अशी कारणे दाखवा नोटिस बजावण्यात येत आहे.

८. या करिता त्यांस दहा दिवसांची मुदत देण्यात येत असून सदर वेळात त्यांच्यावर चांद्रभारत गुप्तचर विभाग सक्त लक्ष ठेवून असेल. त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर न

मिळाल्यास त्यांची रवानगी तातडीने पृथ्वीवर करण्यात येईल. सदर वेळेत त्यांनी चांद्रभारत सरकार समोर उपस्थित रहाणे गरजेचे आहे.

९. या पत्राची प्रत टायटन दूतावासात पाठवण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

पत्र हाती पडले नि माझ्या तोंडचे पाणी पळाले. बाबांना वाटणारी भीती खरीच होती. रॉबिनलाही अंदाज आलेला त्याचा. त्या चांद्रभारत सरकारच्या नोटिशीला काय उत्तर देणार होतो मी? पृथ्वीवर साध्या आंतरराष्ट्रीय लग्नांनाही असे युद्धाचे स्वरूप येऊ शकते.. तर हे आंतरग्रहीय विवाह कसे व्हावेत?

मी पत्र वाचेतोवर बाबा बाहेर आलेले. माझ्या चेहऱ्याकडे पाहात म्हणाले, "काय झाले रे?"

त्यांच्या हाती पत्र दिले मी.. वाचून म्हणाले, "याचीच भीती होती मला. यातून मार्ग निघणे कठीण. कारण मुद्दा फक्त आपल्याच सरकारचा नसून संपूर्ण पृथ्वीवरील देशांचा आहे. काय होईल कुणास ठाऊक.."

"पण मी चंद्रावरच राहिलो तर?"

"तरी पण हा इंडियन मून आपल्या देशाचाच एक भाग आहे.. त्यांना मूळ सरकारी आदेश बंधनकारकच राहिल.."

ब्रुनीला फोन लावला मी.

ती नेहमीसारखीच बोलत होती. म्हटले, "अर्जंट भेटायचेय तुला."

थोड्याच वेळात ती आली माझ्या आॅफिसात. माझ्या रंग उडालेल्या चेहऱ्याकडे पाहात ती म्हणाली,

"काय झाले रे?"

तिच्या हाती ते पत्र देत मी गप्प बसून राहिलो..

तिने वाचले ते नि म्हणाली, "यात टेन्शन घेण्यासारखे काय आहे?"

"म्हणजे यात काहीच नाही?"

"तसे नाही रे, माझ्या मनात असले काहीच नाही. नि आमच्या टायटनवरच्या लोकांच्याही. आणि आपले प्रेम खरे असेल तर आम्ही टायटनवासी हेच मानतो.. खऱ्या गोष्टींना कधीच मागे वळून पाहावे लागत नाही.."

"म्हणजे सत्यमेव जयते?"

"होय. आमचा ठाम विश्वास आहे त्यावर. त्यामुळे आपल्याला भिण्याचे कारण नाही .."

"पण दहा दिवसांत त्यांनी मला पाठवून दिले तर?"

"तर ना? असे काहीच होणार नाही. आणि झालेच तर मी असेन तुझ्याबरोबरच.."

"म्हणजे आपण आताच लग्न करून टाकायचे?"

"नाही, अंबर चोरून लपून करतात तो गुन्हा. आपण काहीच चुकीचे केले नसताना भ्यायचे कशाला?"

"तू म्हणतेस ते ठीक आहे गं.. पण आमच्या पृथ्वीवर असेच होते असे नाही. सत्यमेव जयते आमचे पण बोधवाक्य आहे पण त्यातून हवा तोच बोध घेतला जाईल नेहमीच असे नाही. त्यामुळे ह्या सगळ्यांबद्दल काळजी वाटते मला.."

"नो टेन्शन अंबर. फक्त एक सांग.. यू आपर शुअरली विथ मी नो?"

"ऑफकोर्स डियर. एनी टाईम.. एनी पार्ट ऑफ द वर्ल्ड .. आय कान्ट इमॅजिन लाइफ विदाऊट यू.."

"ओके देन..काहीना काही होणारच.. आणि चांगलेच होणार .. आय हॅव डीप फेथ इन वन्स बिइंग राईट ऑर रॉंग. आपले बरोबर असेल तर शेवटी आपलीच जीत होणार .."

"हो ब्रुनी .. पण तू पृथ्वी पाहिली नाहीस ना म्हणून

अ म्हणतेस असे.. वुई ह्युमन्स आर नॉट नेसेसरीली ऑलवेज विथ ट्रूथ.. आम्हाला सोयीचे ठरेल ते नि तसे सत्य असते आमच्यासाठी.. तुला सांगू आता पृथ्वीवर काय सुरू असेल?"

"काय?"

"वेगवेगळया जगातील चॅनेल्सवर टायटनकडून पृथ्वीवर ताबा मिळवण्याची योजना कशी आखली जात आहे याच्या बातम्या असणार. त्यात तू नि मी व्हिलन. मी तर जास्तच कारण मी पृथ्वीवासी. कोणत्या मोहाला भुललो मी आणि टायटनशी संबंध जोडतोय याच्याबद्दल छातीठोक माहिती देत असणार ते."

"तू म्हणतोस ते खरे असेलही. पण हॅव फेथ इन ट्रूथ.. इन लव्ह.. अँड मी अ‍ॅज वेल. यू आर टू प्रेशस फॉर मी टू लूज.. अँड टेक इट फ्रॉम मी, वुई विल ऑलवेज बी टुगेदर. मॅरेज इज जस्ट अ रिच्युअल अँड इट इजन्ट नीडेड टू एन्डा ॅर्स धिस डियर.."

"तू म्हणतेस म्हणून धीर आला मला. पण सांगू तू घरी येऊन गेलीस ना तेव्हापासूनच बाबा टेन्शनमध्ये आहेत. ते म्हणाले होते, दिसते तितके हे सहज सोपे नाही. आणि हे घडू देणे पृथ्वीवर कितीजणांच्या पचनी पडेल सांगणे कठीण आहे.. पण आय थिंक तुला डिप्लोमॅटिक अनुभव जास्त आहे तर.."

"तसे नाही रे. आम्ही टायटनवासी असेच आहोत. जे सत्य ते सत्यच असते.. सो डोन्ट वरी.. आणि चल डियर. मी निघते."

"ओके.. बघूयात.."

ती निघाली तसे माझ्या लक्षात आले, बाहेर एक कोणी पाळत ठेवून होता आमच्यावर. तो तिच्या मागोमाग बाहेर पडला. जणू काही आम्ही मोठी चोरीच करणार होतो की दहशतवादी होतो!

२०

## *दुसरे पत्र*

पुढे दोन तीन दिवस असेच टेन्शनमध्ये गेले. आमच्या घराबाहेर नि ब्रुनीच्याही घराबाहेर पाळत ठेवत होते कुणी. ब्रुनी म्हणालेली, कर नाही तर डर कशाला .. त्यामुळे धीर येत होता. पण तिला पृथ्वीवरचे वास्तव ठाऊक नाही. इथे चोर सोडून संन्याशीही सुळावर चढवू शकतो आम्ही, सोयीचे असेल तर. त्यामुळे हे असेच होईल याची खात्री नव्हती. तशातच एकदा दुसरे पत्र आले. पूर्ण तपशीलवार होते ते..

ते पत्र टायटन वरून आलेले. टायटनच्या दूतावासातून. होते इंग्लिशमध्येच. आणि पृथ्वीवासियांच्या वागणुकीचे विश्लेषण होते त्यात..

प्रिय अंबर राजपूत यांस,

मूळ पृथ्वी निवासी आणि आता चंद्रावर स्थायिक असलेल्या आपणाबद्दलच्या सकारात्मक भावनांनी हे पत्र टायटन राजदुतावासातून पाठवण्यात येत आहे. आमच्या चांद्रभारतातील सदिच्छा दूत मिस ब्रुनी बर्नेटो यांजकडून आम्हाला तुमची साद्यंत माहिती मिळाली आहे. त्या अनुषंगाने हा पत्रव्यवहार करण्यात येत आहे.

त्या दृष्टीने काही सांगण्याअगोदर आम्हा टायटन वासियांची पृथ्वीसंबंधी, खरेतर पृथ्वीवरील मानवासंबंधीची काही निरीक्षणे नोंदवणे योग्य होईल.

टायटनवासी अखिल जगतात आपले सदिच्छा दूत पाठवून त्यांच्याशी संबंध जोडू इच्छित असतात. या प्रयत्नात आमचे संबंध कित्येक परग्रहांशी जुळले असून त्यांच्याशी आमचे राजनैतिक संबंधही आहेत. मात्र पृथ्वीवरील विविध देशांनी आमचे हे प्रयत्न कधीच पुढे जाऊ न दिल्याने आमचे हे संबंध चांद्रदेशांशीच मर्यादित राहिले आहेत. तरीही आमच्या पृथ्वीवरील मनुष्यप्राण्याचा अभ्यासातून निष्पन्न झालेली एकूण निरीक्षणे अशी:

पृथ्वीवासी स्वतःस अत्यंत असुरक्षित समजतात. त्यांनी आपली पृथ्वी विविध देशांत विभागली आहे.

या पृथ्वीवासी मनुष्याचा स्वभाव असा की, जे दिसेल त्याचे विभाजन करा. प्रत्येक भूभागावर मालकी सांगणे व राज्य करणे हा मनुष्याचा महत्त्वाचा उद्योग आहे.. प्रथम पृथ्वीचे तुकडे विविध देशात पाडले गेले. मग देशा देशात वैर ठेवून युद्धे खेळली गेली. एकेका भूभागाचा तसेच पृथ्वीवर मुबलक असलेल्या सामुद्रिक विभागाचा ताबा ठेवण्यासाठी मोठमोठया लढाया भूतकाळात करण्यात आल्या आणि अजूनही होत असतात. त्यात आपल्याच पृथ्वीवासी जनांच्या जिवाची पत्रास न ठेवणे हे एक मनुष्य प्राण्याचे लक्षण मानता यावे. त्यासाठी त्याने शास्त्रीय संशोधन विध्वंसक रीतीने वापरून अणुबॉंब तयार केला. त्यात एकच नव्हे तर पुढील कित्येक पिढ्यांचे भवितव्य धोक्यात आणले. स्वतःच्या शास्त्रीय प्रगतीचा अभिमान नि गर्वही या मनुष्यप्राण्यास असावा. पण तरीही ही प्रगती स्वतःच्या उत्कर्षासाठीच न वापरता आपल्या मर्यादित उद्दिष्टांसाठी म्हणजे साम्राज्य विस्तार, सत्ता बळकट करणे, कोणावर तरी सत्ता वाजवणे यासाठी वापरात आणली गेली आणि जात आहे. व पृथ्वीवासियांच्या एकूण वागणुकीवरून या नंतरही तो तसाच राहिल अशीच लक्षणे आहेत.

मानवप्राण्याची पुढची गंमत ही की देशविदेशात विभाजन करून त्याचे समाधान झालेले नसावे. भेदाभेद हा पृथ्वीवासियांचा आवडता उद्योग असावा. त्यामुळे आपल्याच देशात श्रेष्ठ कनिष्ठ, उच्च नीच असे विभाजन करण्यास मनुष्य कचरत नाही

मग कातडीच्या रंगावरून माणूस ओळखला जाऊ लागला. गोरे आणि काळे भेद आला. वंशभेद आला. धर्म नामक गोष्ट पृथ्वीतलावर आली. भाषा आल्या. पंथ आले नि जाती आल्या. सारे काही मानवजातीच्या भल्याकरता आले असे म्हणत त्याचाच वापर तीच उद्दिष्टे टाळण्याकरता हुशारीने करण्यात येऊ लागला. एक धर्म दुसऱ्यास, एक वंशीय इतरांशी, एक समुदाय इतरांशी, एक भाषिक इतर भाषिकांस, नि मग एक जण दुसऱ्यास .. स्वत:हून लहान समजून त्यावर वर्चस्व गाजवू लागला. त्यामुळे माणसाने दुसऱ्या माणसास किमान माणूस म्हणून वागवणेही कठीण मानले जाऊ शकते येथे.

असे नाही की इथे हे सारे मोडून काढण्याचे प्रयत्न झाले नाहीत. पण ते काही संत महात्म्यांपुरते मर्यादित राहिले. त्यांनी उपदेश केले. जीवनाची सत्ये समजावून सांगितली. बाकी मनुष्य प्राण्यांनी टाळया पिटल्या, भक्ती केली या सगळयांची नि या साऱ्यांस डोक्यावर बसवून ठेवले. माणसास आपल्या स्वतःच्याच डोक्यावरची गोष्ट दिसेल कशी. त्यामुळे त्या सगळया शिकवणुकींची आज ही पूजा होते. माणसाने यासाठी देवाचा शोध लावला. देव आणि दैव यांच्या आड लपून आपले अवगुण लपवत आता मनुष्य स्वतःला महान समजू लागला. आणि स्वतःस महान समजण्यासाठी इतरांना लहान. सारे जण एकच आहेत नि कुणी श्रेष्ठ कनिष्ठ नाही ही शिकवण तर याच संत महात्म्यांची. पण ती सोडून या संतांची फक्त पूजा बांधणे हा पृथ्वीवासियांचा उद्योगच आहे. या साऱ्यांमुळे मानव समाज विभागला गेला आहे, या सगळयांची परिणिती स्वतःस मोठे होता येत नसल्यास दुसऱ्यास लहान बनवणे यात झाली आहे. मग याबद्दलची सदैव असुरक्षितता त्याच्या मनात घर करून बसली आहे. कुणी आपले मोठेपण

बळकावून तर घेणार नाही ना यासाठी तो स्वतःच्या जिवास तोशीस पडली तरी सदैव जागरूक राहतो.

त्यातूनच हे टायटॅनियन्सना पृथ्वीवर फिरकूही न देण्याचे मानवाने ठरवले असावे. यात आमच्या येथील प्रजेस अजिबात आश्चर्य वाटत नाही. पण आमची भूमिका मर्यादित आहे त्यामुळे पृथ्वीवासियांबद्दल. आमची सदिच्छादूत मिस ब्रुनी बर्नेटो हिचे हितरक्षण करणे ही आमची जबाबदारी आहे. आमच्या राज्यात कोणाचेही अहित न होण्याचा आटोकाट प्रयत्न होत असतो. त्यास मिस ब्रुनी देखील अपवाद नसेल. त्यामुळे तिला आम्ही टायटनवर परत तातडीने बोलावून घेत आहोत. आमच्याच दुतामागे अविश्वासाने पाळत ठेवणे टायटनवरील आमच्या संस्कृतीत अमान्य आहे. तसेच पृथ्वीवासियांप्रमाणे आम्ही स्वतःस असुरक्षित समजत नसल्याने कोणत्याही पृथ्वीवासियाचे आम्ही खुल्या दिलाने स्वागतच करू. त्यामुळे पृथ्वीवासी सरकारे तुम्ही आणि ब्रुनी बर्नेटो यांच्यात अडसर म्हणून येत असल्याने तुमचे तुमच्या कुटुंबियांसह टायटनवर स्वागतच होईल. यात तुमची सुरक्षितता जपली जाईलच त्याबरोबर आमची टायटॅनियन मिस ब्रुनी हिची इच्छा देखील पूर्ण होईल. आशा आहे तुम्ही आणि तुमचे चांद्रवासी कुटुंबीय या आमंत्रणाचा स्वीकार कराल.

पत्र वाचले मी. आपल्याच पृथ्वीबद्दल असे लिहिलेले वाचणे क्लेशदायक तर होतेच. पण त्यातील मुद्दे मात्र दुर्दैवाने चुकीचे नव्हते हे खरे. त्यातही ब्रुनी आता परत टायटनवर जाणार .. म्हणजे मला ही टायटन निवासी होणे गरजेचे .. पृथ्वी आणि आपला देश सोडून परग्रहावर जाऊन राहाणे.. इतक्या वर्षांतील इकडचे संबंध कायमचे तोडून .. न जावे तर.. ब्रुनीला मुकावे लागणार.. काय करावे?

## उपसंहार

दहा वर्षे झाली आम्हाला टायटनवर येऊन. ब्रुनी आणि मी आणि आमची एक ब्रुनीइतकीच गोड छोकरी. टायटन म्हणजे एखादी आदर्श व्यवस्था कशी असावी याचे उदाहरण आहे. सारे काही आहे इथे. आर्थिक सुबत्ता आहे, सामाजिक उन्नती आहे. लोक चांगले आहेत. इतक्या वर्षात लोकांची भांडाभांड नाही की दंगेधोपे नाहीत. धर्म नि राजकारणाच्या नावाने शिमगा नाही. साधे सरळ आणि प्रगत विचारांचे लोक. टायटनवरच्या विकासाचे मापनच मुळी हॅपीनेस इंडेक्सने होते. सर्वजण किती खुशाल आहेत यावर समाजाची प्रगती नि विकासाचे मोजमाप होते. समाज म्हणून एकसंधता आहे. विविध भाषा आहेत, लोकांच्या चालीरीती वेगवेगळया आहेत.. पण कुणाचा द्वेष नाही. कुणी कुणाला लहान वा मोठे समजणे नाही. असा ही समाज असू शकतो? आजूबाजूस पर्यावरण सांभाळत झालेला 'विकास'.. आपल्याकडे विकास म्हणजे जंगलतोड करत बांधलेले रस्ते, फ्लायओव्हर्स नि वसवलेली शहरे.. नि नदी असेल तर गावेच्या गावे बुडवीत बांधलेली धरणे. तिथल्या लोकांना कायम देशोधडीला लावण्यास आपल्याला काही खुपत नाहीच.. देशोन्नतीच्या नि विकासाच्या नावे त्यांचे बलिदान आम्ही सहज करवून घेतो. आणि स्वत:स देशभक्त म्हणवतो. बाकी पूल आणि त्यावरील लांबलचक गाड्या, वेगवेगळया रेल्वे गाड्या नि उड्डाण घेणारी विमाने ही आमची विकासाची व्याख्या. त्यात तळागाळातल्या माणसाचा विचार नाहीच आणि तो तळ आणि गाळ जाऊन एकसंध समाज यावा याचा विचारही नाही. जंगलराज म्हणावे तर जंगलातील प्राणी देखील कधी इतक्या क्रौर्याने वागणार नाहीत असे कधी कधी काही जणांचे वर्तन. कल्याणकारी व्यवस्था म्हणून काही असते ह्याचे कागदोपत्री भान असणारे नि बोले त्याच्या अगदी उल्टा चाले असे ब्रीद असलेले राजकीय

धुरंधर.. काय काय आठवावे? टायटनसारखे राज्य पृथ्वीवर का नाही येऊ शकत..? आणि त्याच पृथ्वीवरील देशांनी उलट या परग्रहावरील लोकांचा संशय घ्यावा? चोराच्या मनात चांदणे याचे याहून उत्तम उदाहरण नसावे. कदाचित मनुष्यप्राण्यास अशी कुठे मिळाली संधी की तो त्याची गत पृथ्वीसारखीच करेल..

मला ती दहा वर्षांपूर्वीची गोष्ट आठवली. ते पत्र आलेले टायटन वरून. करावे तर काय? आपल्या घरचा मोह कोणाचा कसा सुटावा. तो दिवस अजून आठवतो..

घरी सगळयांनी वाचले ते पत्र. सर्वात पुढे आई होती..

"छान. प्रा ॅब्लेम सुटला एक.."

"म्हणजे?"

"म्हणजे काय काय? अरे टायटनवर जाणे.. हे श्रेयस्कर.."

"पृथ्वी सोडून?"

"तू पत्र नीट वाचलेच नाहीस.."

"वाचले की.."

"नाही. त्यातला आशयच हा आहे.. सारे जग .. किंवा विश्वच आपले घर आहे. आपल्याकडे ही कल्पनाच कुणाला पटत नाही. आणि त्यातून मग भांडणे सुरू होतात .. हे विश्व आपले घरच आहे. त्यात पृथ्वीवर येण्यास विरोध असेल त्यांचा .. तर आपणच टायटनवर जाऊन राहावे.."

"म्हणजे मी? तुम्हाला सोडून?"

"नाही, मी ह्या पॉलिसीच्या विरोधात राजीनामा देतोय.. तू मी आणि तुझी आई.." बाबा म्हणाले.

"आणि मी देखील .." रॉबिन म्हणालामध्येच..

"हो. आपण चौघे.. जाऊयात टायटनवर.."

आज एक दशकपूर्ती झाली त्या गोष्टीला. आईने इकडून अजून तीन पुस्तके लिहून तिकडे पृथ्वीवर प्रकाशित केलीत. बाबा आपले रिटायर्ड आयुष्य नातीबरोबर खेळत मजेत घालवताहेत. रॉबिनने आपल्या प्रोग्राममध्ये केलेला तो बदल इकडे येऊन वापरात आणलाय. इकडे नवीन ग्रेटा नावाची त्याची गर्लफ्रेंडही आहे .. आणि दोघेही खुशीत आहेत इकडे.

आणि ब्रुनी? ती सदाच आनंदात असते. तिच्या वडलांनी बनवलेल्या नव्या प्रचंड क्षमतेच्या दुर्बिणीतून आम्ही पृथ्वी ही पाहतो नि ज्या चंद्रावर भेटलो आम्ही तो चंद्र ही. मी अर्थातच ब्रुनीला सांगतो, पृथ्वीचा चंद्र नि शनिचा चंद्र एकत्र आले तरी सर्वात प्रिय मला तो तिचाच मुखचंद्रमा! ती अजूनही तशीच गोड हसत लाजते ..

पृथ्वीच्या चंद्रावर सुरू झालेली ही गोष्ट या इथल्या चंद्रावर सुरू आहे.. नभातून तोच चंद्रमा तसाच चमकत आमच्याकडे पाहात असतो नि आम्ही त्याच्याकडे ..

##########

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. नितीन मोरे यांचे हे बाविसावे पुस्तक.**

डॉ. नितीन मोरे हे ज्येष्ठ लेखक, आपली यशस्वी श्वसनरोगतज्ञ म्हणून लोकसेवा पार पाडत असतानाच कथा, नाटके, लघुनिबंधही लिहीतात. त्यांच्या खुसखुशीत विनोदी साहित्याचे व नाटकांचे चाहते आता जगभर पसरले आहेत. अनेक व्यावसायिक प्रकाशक त्यांना मानधन देऊन त्यांची पुस्तके प्रकाशित करायला तयार अहेत. पण डॉ. नितीनजी आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१६ पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (९ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२२ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), रत्नाकर महाजन (४ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (१० हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १२ पुस्तके), विनीता देशपांडे (६ पुस्तके), उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (७), डॉ. वृषाली जोशी(१२) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।